

माणूस
एप्रिल १९६४.







# IN THE FOREFRONT OF INDUSTRIAL PROGRESS


The engineering endeavour
that is the hallmark of dependability


## AIR-COMPRESSORS

PORTABLE ROTARY TWO STAGE
STATIONARY RECIPROCATING SINGLE STAGE
STATIONARY RECIPROCATING TWO STAGE
2 cfm. to 1000 cfm.
Also Rock Drills & Pneumatic Tools.

## REFRIGERATION COMPRESSORS

AMMONIA & FREON
Bore 160 mm x Stroke 110 mm.
2, 3, 4 & 6 Cylinders
for Comfort & Industrial Airconditioning,
Cold Storage, Ice Plants etc.





SEMISEALED SERVICEABLE UNITS
FOR PACKAGED

## AIR-CONDITIONERS

5 HP. & 7½ HP.

# KIRLOSKAR PNEUMATIC CO. LTD.

HADAPSAR INDUSTRIAL ESTATE, POONA - 13.

STUSA

वर्ष तिसरे : अंक अकरावा

*

एप्रिल १९६४

*

: संपादक :

श्री. ग. माजगावकर




## स्वरूपदर्शन



## या अंकांत

या महिन्याच्या २९ तारखेला पुणे येथे श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचा षष्ठ्यब्दिपूर्तिसमारंभ संरक्षणमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भव्य प्रमाणावर साजरा होत आहे. या शुभप्रसंगी आम्ही श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचे अभीष्टचिंतन करतो व त्यांच्या कर्तृत्वाचा लाभ अखिल भारताला यापुढे बराच काल मिळत राहील अशी आशा व्यक्त करतो.

पुण्याच्या औद्योगीकरणात श्री. शंतनुरावांचा स्वतःचा व किर्लोस्करसमूहाचा मोठा वाटा आहे. तेव्हा श्री. शंतनुरावांच्या समारंभाचे हे निमित्त साधून 'माणूस'ने 'महानगर पुणे' हा पुण्याच्या बदलत्या परिस्थितीचे चित्र रेखाटणारा एक सचित्र लेख या अंकात दिला आहे. या लेखासाठी ज्या ज्या व्यक्ती व संस्था यांनी आम्हाला माहिती पुरविली त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

गेल्या दोन अंकात प्रकट केल्याप्रमाणे प्रा. भीमराव कुलकर्णी यांची 'हरी नारायण' ही कादंबरीही या अंकात येत आहे. फक्त कादंबरीचा विस्तार अपेक्षेपेक्षा जास्त झाल्याने ती दोन भागात द्यायचा निर्णय घ्यावा लागला. जुन्या पुण्याचे सरस चित्र वाचकांना या कादंबरीत पाहावयास मिळेल.

— संपादक

मुखपृष्ठ :

श्री. शंतनुराव किर्लोस्कर


.........अनंत सालकर

आतील छायाचित्रे :

........ नंदकिशोर फोटो स्टुडिओ, पुणे

किंमत एक रुपया : वार्षिक वर्गणी आठ रुपये

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.
सर्व हक्क सुरक्षित



# महानगर पुणे

श्री. ग. माजगावकर

: १ :

पुणें हे बंडखोर शूरांचे शहर म्हणून इतिहासकालापासून प्रसिद्ध आहे. काही काल ही सरस्वतीभक्तांची आणि समाजसेवकांची कर्मभूमी म्हणूनही सर्वत्र गौरविली गेली. पण कधीकाळी या शहराकडे लक्ष्मीची पावले वळतील अशी कल्पनाही कोणास करणे कठिण होते. कारण पुण्यातील मुख्य लोकवस्ती सरकारी नोकरांची आणि विद्यार्थ्यांची. तसा पुण्याच्या पूर्वभागात व्यापारीवर्ग होता, खडकी-देहूरोड येथील संरक्षण कारखान्यांत काम करणारा कामगारवर्गही पुण्याचाच; हे खरे असले, तरी पुण्याच्या जीवनावर छाप होती नोकरपेशा मनोवृत्तीची. या नोकरशाही राज्यात लक्ष्मीचा संचार क्वचित् एखाद्या डॉक्टराच्या दवाखान्यात किंवा वकिलाच्या माडीवर होत असेल तेवढाच. एरव्ही चाकरीसाठी शिकावे, शिकून शक्यतो सरकारी चाकरी धरावी आणि मिळेल त्यात ठाकठिकीने संसार चालवावा असा येथील जीवनाचा परिपाठ निदान गेल्या ५०।६० वर्षांपासून तरी चालत आलेला आहे.


हा परिपाठ जरी आज फारसा बदलला नसला तरी पुण्याच्या जीवनाला एक नवी झिलई चढू पहात आहे, एक नवा ढंग त्याला प्राप्त होत आहे हे, एक धावता फेरफटका जरी संध्याकाळच्या वेळेस टिळक रोड, डेक्कन जिमखाना किंवा कँप या भागात मारला तरी कोणाच्याही चटकन् दृष्टीस पडेल. पॅरिसचे असे एक वैशिष्टच सांगतात, की संध्याकाळी रस्त्याच्या कडेला असणाऱ्या उपाहारगृहात बसून, दोन-चार मित्रमैत्रिणींच्या सहवासात, गरम वा थंड पेयांचा किंवा मद्याचा आस्वाद घेत रस्त्यावरची मौज पाहत तास दोन तास घालविणे, अनेक विषयांवर स्वैर वार्तालाप करणे ही पॅरिस नगरवासीयांची आवडती हौस आहे. पुण्याचे पॅरिस झाले नसले तरी पॅरिसची कळा पुण्याला चढत आहे हे पूनम-कॉफीहाउसमधील ती आदबशीर वर्दळ, ते वाहते रस्ते, तो दिव्यांचा झगमगाट, ती शोभेच्या वस्तूंची दुकाने, ते रंगीबेरंगी पोषाख, त्या नाजुक स्त्रिया आणि नखरेल पुरुष, ती धूम्रवलये आणि त्यात रंगणाऱ्या त्या वेल्हाळ गोष्टी यावरून कोणाच्याही ध्यानात येईल.

पुण्यात कधी फुलांची प्रदर्शने भरल्याचे ऐकिवात होते का? हे मोगली पीक पुणेकरांच्या काटकसरी प्रकृतीत न बसणारे. पण अलिकडे गुलाबपुष्पांची प्रदर्शने येथे भरतात व कँपातील सधन पारशी-ख्रिश्चन कुटुंबेच नव्हेत तर सदाशिव-नारायण पेठांतील अस्सल पुणेरी मंडळीही हौशीने या प्रदर्शनात भाग घेतात. 'सकाळ'मधील बागकामाचे सदर वाचकांकडून सतत मागणी आल्यामुळे पुन्हा सुरू झाले ते याच कालावधीत. दोन नवी वर्तमानपत्रे येथे सुरू झाली आणि 'केसरी' दैनिक झाला हीहि गेल्या ५।७ वर्षांतलीच वाढ. 'अलका', 'हिंदविजय' ही दोन नवी चित्रपटगृहे उभी राहिली; शिरीन, पॅरॅमाऊंट, वसंत या चित्रपटगृहांचे नूतनीकरण झाले, 'प्रभात'चे होऊ घातले आहे, आणि येत्या

२।३ वर्षांत नव्या ३।४ अलिशान चित्रपट-गृहांची पुण्यात भर पडण्याची शक्यता आहे. खेळांची संख्याही वाढली. पूर्वी मॅटिनी हा प्रकार फक्त रविवारी असे व तोहि इंग्रजी चित्रपटांचा. आता रोज मॅटिनीज् आहेत व तेही इंग्रजी-मराठी-हिंदी या सर्व चित्रपटांचे. ' अलका 'सारखे चित्रमंदिर तर केवळ इंग्रजी चित्रपटांवरच आज चालू आहे.

पुण्यातील स्नोपावडरींचा, सुवासिक तेला-साबणांचा आणि शुभ्र धुलाईच्या नव्यानव्या चूर्णांचा खप झपाट्याने वाढत आहे; सायकलीं-साठी प्रसिद्ध असणारे पुणे वेगाने स्कूटरयुगात प्रवेश करीत आहे. पुण्यातील रेडियोंची संख्या पाच वर्षांत सहा हजारांवरून चौदा हजारांवर गेली हे कशाचे द्योतक ? आहारात मांसाशनाचे प्रमाण वाढले, गोल्ड स्पॉट – कोका कोला अशांसारख्या श्रीमंती पेयांची चलती सुरू झाली. विहारातही तोच खर्चिक थाट. पुण्यातील जुन्या तालमी आणि आखाडे ओस पडत आहेत आणि टेनिस–बॅडमिंटन कोर्टांवर पुणेकरांची गर्दी वाढत आहे. त्या फुलासारखेच हलके व्हावे, बागडावे, नटावे, मुरडावे, काहीसे बाहेरख्याली बनावे ही पुणेकरांची आजची मनःस्थिती आहे. ते जुने ' असंतुष्ट ' पुणे लयास जात आहे आणि नवे संतुष्ट सुखासीन पुणे आकारास येत आहे.

पुण्याच्या सभोवती निघालेल्या कारखान्यांत पुणेकरांना नोकऱ्या मिळू लागल्या आणि त्यांच्या जीवनात समृद्धीच्या या नव्या मनूने




नव्या पुण्याचे दर्शन घडविणारा हा जंगली महाराज रस्त्यावरील एक कोपरा. वेळ सूर्यास्ताची—जेव्हा ' पूनम ' मध्ये प्रवेश मिळाला तरी जागा मिळणे कठिण असते, आणि ' हिंद विजय ' चा दुसरा खेळ संपल्यामुळे रस्ता माणसांनी नुसता फुलून गेलेला असतो. पलीकडेच नव्याने उभी राहिलेली हिंद विजयच्या मालकांची ' जोशी इस्टेट्स ' ची उंच हवेली, तिच्याचसमोर नुकतेच सुरू झालेले एअर कंडिशन्ड ' क्वालिटी रेस्टॉरंट '—या पुण्याच्या नव्या समृद्धीच्या आणखी काही निशाण्या.

' पूनम ' चे लिमये म्हणत होते, " हॉटेलिंग करणाऱ्यांची संख्या वाढली त्या प्रमाणात हॉटेल्स वाढली नाहीत; म्हणून ही गर्दी. "

' अलका 'चे धारप सांगत होते, " सर्वसामान्य पुणेकर पूर्वीपेक्षा चित्रपट अधिक पाहू लागला. प्रमाण दहा वर्षांत निदान दुप्पट. "

आणखी काही आकडेमोड :

१. पुण्यातील सौंदर्यप्रसाधनांची विक्री ५५-५६ मध्ये एक लाख सत्तावन्न हजार रुपये; ६३–६४ मध्ये दोन लाख सदुसष्ट हजार.

२. पुण्यातील केवळ स्वस्तिक ऑइल मिलसच्या मालाची विक्री ( डेट, स्वे, सॅपोटॅक्स, कॅस्टर ऑइल इ. ) सालीना वीस टक्क्यांनी वाढत आहे. पाच वर्षांत तीन लाखांवरून सहा लाख. त्यातही साबणापेक्षा नव्याने बाजारात आलेल्या सॅपोटेक्ससारख्या पावडरींचा वापर अधिक. कारण टेरेलिन आणि नायलॉन यांनी साध्या कापडाची जागा घेतली आणि कमी तासात अधिक शुभ्र धुलाई. समृद्धतेमुळे कष्टाची गरज कमी होत जाते आणि हळुहळू सवयही. कठिण काबाडकष्टाकडून मृदु कोमलक्रियेकडे सुधारणेचा असा प्रवास नेहमी सुरू असतो.

३. ५६–५७ मध्ये पुणे महापालिकेला पेट्रोलवाहन कराचे उत्पन्न दोन लाख पंधरा हजार होते. ६३–६४ मध्ये चार लाख.


* *

प्रवेश केला. नोकरीच्या मागं असणारा सर्व-सामान्य पुणेकर बदलला नाही. पण नोकरीच्या जागा बदलल्या, पगार वाढले, त्यामुळे वातावरण निराळे झाले. ओघानेच पुण्यातील या नव्या स्थित्यंतराचे श्रेय जाते ज्यांनी नोकरीच्या या नव्या जागा निर्माण केल्या त्या कारखानदार-उद्योगपतींकडे. त्यांतल्या त्यातहि किर्लोस्कर मंडळींचा वाटा या श्रेयात मोठा आहे. कारण दुसरे महायुद्ध संपताच पहिला कारखाना पुण्याजवळ निघाला तो श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचा खडकीचा ऑइल इंजिन्सचा कारखाना होय. तसे पुण्यात कारखानदारी वाढविण्याचे प्रयत्न फार पूर्वीपासून सुरू आहेत. पण ते यशस्वी होऊ शकले नव्हते. गेल्या शतकाच्या अखेरीस येथे रेशीम-उत्पादनाचे प्रयोग झाले, कागदगिरण्या निघाल्या. काहीसे यश लाभले ते 'राजाबहादुर मोतीलाल मिल्स'च्या प्रयत्नालाच. 'केसरी'-कारांनी स्वतंत्र अग्रलेख लिहून या घटनेचे त्यावेळी कौतुक केलेले आढळते. सर जमशेटजी जिजीभाई यांच्या हस्ते दि. २७-२-१८९३ या दिवशी गिरणीच्या उदघाटनाचा समारंभ झाला आणि दि. २८ च्या 'केसरी'त 'पुण्यातील पहिली चिमणी' या शीर्षकाखाली लिहिलेल्या अग्रलेखात टिळक लिहितात—

**पुण्यातील पहिली चिमणी**

"सुमारे शंभर वर्षांपूर्वी आमच्या शहराचा दक्षिणेतच काय, पण साऱ्या हिंदुस्थानभर मोठा नावलौकिक होता. त्या काली वीरश्री, वैभव, देशाभिमान आणि धर्माभिमान इत्यादि गोष्टी या शहरात जितक्या जागृत होत्या तितक्या हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याही भागात नव्हत्या; त्यामुळे व्यापार आणि संपत्ती हीही येथेच वास करावयास आली होती......पुण्याचे हे वैभव अर्थातच पेशवाईबरोबर लयास गेले आणि काही दिवसपर्यंत येथे घरमोडीचा व्यापार उत्तम समजला जात होता......कै. माधवरावजी कुंटे हे असे म्हणत असत, की पुण्याच्या आसपास जेव्हा शेकडो चिमण्या उभ्या राहतील तेव्हाच पुण्यास पूर्वीचे वैभव आता प्राप्त होईल. माधवरावजी कुंटे यास त्यांच्या मनोदयानुरूप उभारलेल्या फारशा चिमण्या दृष्टीस पडल्या नाहीत. कागदाची गिरणी त्यावेळी स्थापन झाली होती व ती येथील लोकांच्याच उद्योगाचे फल होते; पण ती गिरणी येथून बरीच लांब असल्याने पुणे शहरात लागून असलेल्या मैदानातून जो देखावा नजरेस यावा असा माधवरावजींचा मानस होता, तो परिपूर्ण झालेला त्यांच्या दृष्टीस पडला नाही. ते काम आमचे शहरातील प्रसिद्ध व्यापारी हिंदुमल बालमुकुंद व त्यांचे स्नेही आणि इतर भागीदार यांचे हातून व्हावयाचे होते."

गिरणीचे वैशिष्टच सांगताना केसरीकार पुढे लिहितात — "अशा तऱ्हेचा समारंभ पूर्वी पुण्यास कधीही झाला नव्हता. गिरण्यासारखी कामे मुंबईतील श्रीमंत भाटचे अगर पार्शी लोकांनीच करावी अशी आज-




पार्ले पेयांचा पुणे व आसपासच्या भागातील १९५८ मधील खप दोन लाख बाटल्या होता. १९६३ मध्ये तो वीस लाख बाटल्या झाला.


कारण पार्ले पेये 'उंची' असतात.

अपुरा पाणीपुरवठा आणि विजेची अशाश्वती या अडचणी नसत्या तर यापेक्षाही अधिक प्रगती गेल्या पाच वर्षांत झाली असती असे कंपनीच्या चालकांचे मत आहे.

पर्यंत समज होती; पण गुदस्ता नागपूर येथे व यंदा पुण्यास ज्या गिरण्या सुरू झाल्या त्यांच्या योगाने ही कामे मध्यम स्थितीतील लोकास आपले थोडे थोडे भांडवल एकत्र करून करिता येण्याजोगी आहेत असे आता निर्विवाद सिद्ध झाले आहे. याकामी शेठ हिंदुमल बालमुकुंद, शेट शिवलाल मोतीलाल यांचे साहाय्य तर खरेच; पण रा. रा. रामनारायण अमरचंद व आमचे स्नेही रा. रा. माधवराव बल्लाळ नामजोशी यांनी जर अविश्रांत खटपट केली नसती तर स्टेशनाजवळ आगगाडीच्या बंबातल्या धुराखेरीज दुसरा कोणताही धूर आज नजरेस पडला नसता. अशा दृष्टीने पाहिले म्हणजे रा. रा. महादेव बल्लाळ नामजोशी यांनी आपले लक्ष इतर व्यवसायांतून काढून औद्योगिक विषयाकडे लावले हे एक सुचिन्ह समजले पाहिजे."

**पुणे महानगर झाले**

कुंटे–टिळक–नामजोशी यांना पुण्याजवळच्या मैदानातून जो देखावा दृष्टीस पडावा अशी अपेक्षा होती तो दुसऱ्या महायुद्धाअखेर मात्र निर्माण होऊ शकला नाही. देश परतंत्र होता; महत्त्वाकांक्षी व दीर्घोद्योगी तरुणांना राजकारण, समाजसेवा या क्षेत्रांचे जेवढे आकर्षण होते तेवढे व्यापार-उद्योगधंद्यांचे त्या काळी नव्हते, ही कारणे असावीत. पण महायुद्धानंतर परिस्थिती पालटली. देश स्वतंत्र होऊन व्यापार-उद्योगधंद्यांचे क्षेत्र खुले झाले; सरकारी धोरणेही अनुकूल होती. त्यामुळे देशात सर्वत्र कारखानदारी वाढली. या वाढीत पुण्याला स्थान मिळवून देण्याचे मोठे कार्य शंतनुरावांच्या हातून पार पडले, कारण खडकीचा त्यांचा कारखाना यशस्वी होईपर्यंत पुणे हे उद्योगधंद्यांना अनुकूल क्षेत्र आहे याची जाणीवच फारशी कोणास नव्हती. पेन्शनरांचे आणि विद्यार्थ्यांचे शहर एवढीच पुण्याची ख्याती शिल्लक उरली होती. पण शंतनुरावांचे अनुकरण हळूहळू सुरू झाले व सरकारने जेव्हा विकेंद्रीकरणाचे धोरण निश्चित करून मुंबईला नवीन कारखाना-वाढीसाठी परवानग्या देणे बंद केले तेव्हा सर्वांनीच पुण्याकडे धाव घेतली. ५८ नंतर तर हा वेग भलताच वाढला हे पुण्याच्या आसपासच्या जमिनीच्या वाढत्या किंमतीवरून सहज ध्यानात येईल.




**पुण्यातही टोलेजंग इमारती उठू लागल्या**

घरबांधणीचा वेग पुण्यात गेल्या पाच वर्षांत बराच वाढला आहे. ५८ साली रोज एक घरबांधणी पुण्यात सुरू होत होती. आज रोज तीन घरांना महापालिकेकडून परवानगी दिली जात आहे. (Commencement Certificate)

ही बहुतेक घरे नव्याने उदयास आलेल्या सुखवस्तू मध्यमवर्गीयांची. छोटे बंगले, ज्यांत स्वत:शिवाय फार तर एकाच बिऱ्हाडाची सोय केली जाते. तीन खोल्यांच्या ब्लॉकला भाडे रुपये १०० ते १२५.

*

**पुण्यातील रेडिओ परवान्यांच्या संख्येतील वाढ**

| | | |
|---|---|---|
| १९५८ | — | ५८११ |
| १९५९ | — | ६९११ |
| १९६० | — | ७५०३ |
| १९६१ | — | ७९१७ |
| १९६२ | — | ८९१२ |
| १९६३ | — | १०१०३ |
| १९६४ | — | १३७११ |

* *

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स – खडकी



बजाज ऑटो व बजाज टेंपो – चिंचवड




वॅंडलसाईड नॅशनल कन्स्ट्रक्टर्स – येरवडा




एकरी पाच ते आठ हजार रुपये भाव ५८ मध्ये होता तो ६४ मध्ये २५ ते ३० हजारापर्यंत भडकला आहे. महाराष्ट्र सरकारने भोसरी येथे, पुणे महानगरपालिकेने हडपसर येथे औद्योगिक वसाहती स्थापन करून या औद्योगीकरणाला अधिक चालना दिली आहे.

कुंटे- टिळक- नामजोशी यांच्या नजरेला पुण्याच्या जवळच्या मैदानातून जो देखावा दृष्टीस पडायला हवा होता तो आज निर्माण झालेला आहे. पुण्याच्या आवतीभोवती— बारा मैलांच्या परिसरात — आज लहानमोठे मिळून जवळजवळ शंभर कारखाने उभे आहेत. यातील निम्म्याहून अधिक एकट्या चिंचवड-पिंपरी भागात आहेत. या कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांची संख्या आज पन्नास हजारांच्या आसपास आहे आणि नवीन वाढ गृहीत धरता ती लवकरच एक लाखाच्या घरात जाईल असा अंदाज आहे. सुमारे ५० कोटी रुपयांचे भांडवल या कारखानदारीत गुंतलेले आहे आणि यात परकीय भांडवलाचा भागही बराच आहे. कलकत्ता - मुंबईच्या खालोखाल पुण्यात कारखानदारी वाढली. आणि केवळ शैक्षणिक केंद्र असलेल्या पुण्याला

मुंबईला जसा कापडव्यवसाय, तसा पुण्याला अमुक एक व्यवसाय असे वैशिष्ट्य सांगता येत नाही. कारण रबर, प्लॅस्टिक, रंग, रसायने, कापडगिरणी, काचा, दारूगोळा, औषधी व वेगवेगळ्या प्रकारचे इंजिनियरिंगचे कारखाने यांचे पुण्याभोवती जाळे विणले गेलेले आहे. तरीपण सर्वसामान्यपणे सांगावयाचे झाले तर इंजिनियरिंग व्यवसायांचे प्रमाणच येथे सर्वाधिक.

इंजिनियरिंगच्या कारखान्यासाठी पुण्याची निवड करण्याचे पहिले श्रेय जाते अर्थात् किर्लोस्करसमूहाकडे. त्यातल्या त्यात शंतनुरावांकडे. कारण त्यांच्याच आग्रहाने डिझेल एंजिन्सचा पहिला कारखाना १९४६ साली खडकी येथे उभा राहिला.


★

आता औद्योगिक-शैक्षणिक महानगराचा दर्जा प्राप्त झालेला आहे. एकेकाळी कसबा पेठ हे पुण्याचे मध्यवर्ती केंद्र होतें. पुढे सदाशिव पेठेला महत्त्व चढले. यापुढच्या काळात अशी शक्यता आहे, की शिवाजीनगर हे पुण्याचे केंद्र बनेल. कारण मुंबईच्या दिशेने पुण्याची वाढ जेवढ्या प्रचंड प्रमाणावर झाली आहे तेवढी इतर तिन्ही दिशांना झालेली नाही. पुण्याची लक्ष्मी लक्ष्मीरोडवरून जंगली महाराजाकडे निघाली आहे. अलिशान हॉटेल्स् तेथे तिच्या स्वागतासाठी उभी आहेत. फर्लांगाफर्लांगावर पेट्रोल पंप्स तयार आहेत, शानदार दुकानांची आरास मांडली जात आहे. 'एटी फीट रोड' लवकरच 'पेटी फीट रोड' भासू लागण्याचे दिवस जवळच येत आहेत.

* * *


[पृष्ठ १० वर चालू]


**वेकफील्ड प्रॉडक्टस् – येरवडा**



कारखानदारीतही 'मॉडर्न आर्ट'ने प्रवेश केलेला आहे

मुंबईहून पुण्याकडे यायला निघा आणि चिंचवडजवळ आल्यावर जरा चढ असलेल्या रस्त्यावरून पुण्याच्या औद्योगिक क्रांतीचे हे दर्शन घ्या. बजाज ऑटो, रॅकोल्ड, कूपर, डेव्हिड ब्राउन, रस्टन हॉर्नबी, इन्व्हेस्टा मशीन, सँडविक एशिया, महेन्द्र ओवेन, ॲटलास कॅप्को, बकाव वुल्फ, हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्स – या सर्व मंडळींनी येथे एकदम दाटी करून टाकली आहे. यातली काही जण सांगली-मिरज-कोल्हापूरकडे गेली असती तर! पण सरकारला खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण करावयाचेच नसावे. कारण एका ठिकाणचे केंद्रीकरण दुसऱ्या ठिकाणी हलवायचे एवढाच कार्यक्रम सध्या विकेंद्रीकरण या नावाखाली सुरू आहे.






१९६० साली झालेल्या महाराष्ट्र बँकेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी भाषण करीत असता महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले होते, 'महाराष्ट्र बँकेची शाखा लंडनमध्ये नाही निघाली तरी चालेल. पण ती तालुक्याच्या लहान गावी निघणे जरूर आहे. लहान व मध्यम उद्योगधंद्यांना मदत करण्याचे या बँकेचे प्रथमपासूनचे धोरण आहे व ते यापुढेही असेच चालू राहील, अशी मला आशा आहे.'

पुण्याच्या औद्योगिक प्रकल्पात लहान व मध्यम उद्योगधंद्याना मदत देऊन, महाराष्ट्र बँकेने महत्त्वाची जबाबदारी पार पाडलेली आहे.

हडपसर येथे औद्योगिक वसाहत सुरू होते न होते तोच बँकेने तेथे आपलीही नवीन शाखा उघडली. पिंपरी भागातही बँक पोचली आहेच.

# हडपसर औद्योगिक



सर्वत्र पहिला पायंडा घालण्याचा मान किर्लोस्कर सतत मिळवीत आलेले आहेत. खडकीच्या बाजूला पहिला कारखाना आला तो किर्लोस्करांचा. हडपसर वसाहतीत पहिला प्रवेश केला किर्लोस्करांनी; आणि आता कोथरूड भागात पहिल्याने सुरू होत आहे असा मोठा कारखाना म्हणजे किर्लोस्कर-क्युमिन्स हाच.

हडपसर येथील किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनीच्या कारखान्यात तयार होत असलेल्या एअर कॉंप्रेसरचे प्रात्यक्षिक.



## व सा ह त

### – आपलेच दात, आपलेच ओठ

या वसाहतीत एक मोठा कारखाना आहे. एक महाराष्ट्रीय इंजिनियर त्यात मोठ्या हुद्यावर काम करीत होते. एकाएकी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि राजीनाम्याला कारणीभूत असलेली परिस्थिती त्यांनी थेट मंत्र्यांच्या कानावर घातली. पण विषय नाजुक पडल्याने कोणी कुठे बोलले नाही, चालले नाही.

पुण्याच्या परिसरात खूपच कारखाने निघाले. पुणे महापालिकेने हडपसर येथे व महाराष्ट्र सरकारने भोसरी येथे औद्योगिक वसाहती स्थापन करून अत्यंत सवलतीच्या दरात कारखानदारांना जमिनी दिल्या. हडपसर वसाहतीतील जमिनीचा भाव तर केवळ तीन ते सहा आणे स्क्वेअर फूट. शिवाय १२ वर्षे महापालिकेने ऑक्ट्रॉय कराची सूट दिली आहे.

आता साधी अपेक्षा अशी, की पुण्यातील व पुण्याबाहेरील मराठी माणसांना शक्यतो या कारखान्यातून अधिक प्रवेश मिळावा. अर्थात लायकी असेल तरच प्रवेश हे तत्त्व मान्य.

पण इथेही पक्षपात आणि मराठी माणसांचीच गळचेपी. विशेषतः मद्रासी नोकरवर्गाची जाणूनबुजून व पद्धतशीर भरती करण्याचा सरसहा प्रयत्न चाललेला आहे अशी ओरड अनेक ठिकाणी ऐकू आली. मराठी माणसात काही दोष असले तरी स्वतःच्या घरातही निर्वासित होण्याची पाळी त्याच्यावर यावी इतका तो खासच नालायक नाही.

या परिस्थितीत वेळीच काही सुधारणा झाली नाही तर पारिजातकाचा वृक्ष सत्यभामेच्या मंदिरात, पण फुलांचा सडा मात्र रुक्मिणीच्या अंगणात असा प्रसंग येऊन गुदरायचा.

असा प्रसंगच हडपसर वसाहतीतील त्या महाराष्ट्रीय इंजिनियरवर आला आणि राजीनाम्याशिवाय त्याला गत्यंतर उरले नाही.

★



: २ :

## ' स्वस्तिक 'चे श्री. वसंतराव वैद्य

पुण्याच्या नव्या मध्यवर्ती केंद्रात–खडकी–शिवाजीनगर भागात–' किर्लोस्कर ऑईल इंजिन्स 'च्या पाठोपाठ निघालेला दुसरा महत्त्वाचा कारखाना म्हणजे वसंतराव वैद्य यांचा ' स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स ' हा. भांडवलदार व कारखानदार हे शब्द आपण सरसहा एकार्थीच वापरीत असतो. पण वास्तविक औद्योगीकरणाच्या दोन भिन्न अवस्था या दोन शब्दांनी व्यक्त होत असतात. कारखानदार हा आपल्या श्रमाने, बुद्धि-चातुर्याने, अनेक धोके पत्करून, अडी-अडचणींना व नफानुकसानीला तोंड देत, अनेक प्रसंगी स्वतःच्या गाठीशी असणारी पै आणि पैसा पणास लावून एखाद्या व्यवसायाची उभारणी करीत असतो. अशा कल्पक, धाडसी व दीर्घोद्योगी माणसांचे प्रमाण कोणत्याही समाजात नेहमीच कमी असते. त्यामुळे ज्या निवडक व्यक्तींजवळ या गुणांची शिदोरी भरपूर प्रमाणात असेल अशांना काही काळ पुढे जाऊ देणे, त्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वाला भरपूर वाव देणे हे केवळ त्या व्यक्तींच्याच नव्हे तर एकूण समाजाच्या दृष्टीनेही हिताचेच ठरते. असा धाडसी संयोजक निर्माण झाला नाही तर कोणत्याही देशात उद्योगधंद्याचा पायाच घातला जात नाही. जेथे नवे उपक्रम, अनिश्चित भवितव्य आणि अनेक धोके संभवतात तेथे व्यक्तीची ईर्ष्याच काम करू शकते व अशा ईर्ष्यासंपन्न व्यक्तींना समाजाकडून अपेक्षित साथ मिळाली नाही तर सारा समाजच आर्थिक क्षेत्रात परावलंबी व मागासलेला राहण्याची भीती असते. हा धोका टाळावयाचा असेल तर वसंतरावांसारखे स्वतंत्र बुद्धीचे व उपक्रमशील वृत्तीचे कारखानदार जितक्या अधिक संख्येने पुढे येतील तितका आमच्या देशाचा औद्योगी-करणाचा पाया भरभक्कम घातला जाईल यात शंका नाही. नुकतेच घडलेले एक उदाहरण पाहण्यासारखे आहे—

वसंतराव मुंबईत होते. कानपूरहून संरक्षणखात्यातील एक अधिकारी मुंबईतील प्लॅस्टिक कारखानदारांकडे एका विशिष्ट प्रकारच्या प्लॅस्टिक शिरस्त्राणांची मागणी घेऊन आला होता. एकही प्लॅस्टिक कारखानदार मागणी पत्करायला तयार होईना. कारण या शिरस्त्राणांसाठी काही परदेशी माल (Glass fibre) आयात करावा लागत होता व त्यासाठी परवाना मिळणे सध्याच्या चलनटंचाईच्या काळात शक्य नव्हते. वसंतरावांनी मागणी पत्करली व दोन महिन्यांची मुदत मागून घेतली. वास्तविक प्लॅस्टिक हा काही ' स्वस्तिक 'चा प्रांत नाही. पण वसंतरावांनी प्रयत्न करण्याचे ठरविले व पुण्यात येऊन आपल्या रबर कारखान्यात अनेक प्रयोगांती या शिरस्त्राणाचा एक नमुना तयार केला. कानपूरहून काही सुधारणा सुचविण्यात आल्या त्यांचा अंतर्भाव करून स्वस्तिकने ही प्लॅस्टिक शिरस्त्राणांची मोठी मागणी पदरात पाडून घेतली. कंपनीच्या विक्रीत कोटी-सव्वा कोटी रुपयांची तरी वाढ झाली आणि विशेष म्हणजे यासाठी एकही रुपयाच्या अधिक परकीय चलनासाठी सरकारकडे मागणी न करता.

' स्वस्तिक 'ची गेल्या पंधरा–वीस वर्षांतली वाढ ही अशा अस्सल गुणवत्तेतून झालेली आहे. १९४० मध्ये वसंतरावांनी धंद्याला आरंभ केला तेव्हा ते रबरी फुगे बनवीत होते. त्यावेळी त्यांच्यापेक्षा फुग्यांचे उत्पादन चौपट–पाचपटीने अधिक करणारी मंडळीही पुण्या–मुंबईत होती. पण आज त्यांचे नावही ऐकू येत नाही. याचे कारण, काळाचा अचूक वेध घेण्याचा व त्या दृष्टीने धंद्याच्या विकासाची पावले झपाझप उचलण्याचा धाडसी संयोजकाचा जो गुण वसंतरावांजवळ होता तो या इतर फुगेवाल्यांजवळ नव्हता. वसंतरावांचे १।२ परिचय लेख सहज वाचण्यात आले. त्यांत आपले वसंतरावांचे कौतुक ते फुगे बनवीत होते आणि विकीत होते याबद्दलच. फुगे वसंतरावच काय, मामुली

अक्कलहुशारीचा कोणीही माणूस बनवू शकत होता. त्यासाठी वसंतरावांसारख्या उच्च पदवीधराची काय गरज होती ? पण महायुद्धाच्या काळात रबराची टंचाई जाणवू लागल्यावर फुग्यांचा नाद सोडून वसंतराव जे इतर उत्पादनाकडे वळले त्यात त्यांचे खरे औद्योगिक कर्तृत्व साठवलेले आहे. संततिनियमनाच्या साधनांपासून होज-पाईप्सपर्यंत त्यांनी आपला उत्पादनाचा व्याप वाढवीत नेला हे हजारातून एखाद्यालाच जमत असते. ४७ सालात 'स्वस्तिक'ची विक्री ६–७ लाखांच्या घरात होती; ती आज दोन-अडीच कोटींपर्यंत वाढली आहे; कारखान्यात १५–२० प्रकारच्या मालाचे उत्पादन चालू आहे; कामगारांची संख्या कंपनी ४७ मध्ये लिमिटेड झाली तेव्हा १००–१२५ होती ती आज १५०० आहे; ४७ साली ८०×१२० फुटांच्या एका शेडमध्ये मावणारा कारखाना आज सहा-सात एकरांच्या विस्तीर्ण जागेत पसरला आहे हा औद्योगीकरणाचा खरा नमुना आहे. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली तेव्हा अशी माणसे पुढे आली व त्यांना अर्थशास्त्रज्ञांनी ('Captains of Industry,' (Entrepreneurs) अशा पदव्याही बहाल केल्या. वसंतराव हे खऱ्या अर्थाने या जातीचे (Entrepreneur) आहेत म्हणून त्यांचा परिचय थोडा अधिक विस्ताराने दिला. एरव्ही कारखाने काय विर्लाशेठही काढीतच असतात. पण त्यात औद्योगिक क्रांतीचे दर्शन घडत नाही एवढाच काय तो फरक.

**नवी पिढी**

सुदैवाने वसंतरावांसारखेच औद्योगिक कर्तृत्व गाजवणारी पुष्कळ मंडळी पुण्याच्या परिसरात वावरत आहेत. गेली पिढी किर्लोस्कर–ओगले, साठे–पारखे यांनी गाजविली. महाराष्ट्रीय कारखानदारीचा एक उच्च आदर्श त्यांनी निर्माण करून ठेवला. याही पिढीत त्यांचा वारसा चालवणारी कणखर माणसे उभी आहेत. नायक्रोमचे परांजपे ह्यांनी इंजिनियरिंगची पदवी घेतल्यावर एक दिवसही ज्यांनी नोकरी धुंडाळण्यात न घालवता चार कामगारांच्या मदतीने आपल्याच लक्ष्मी रोडवरच्या घरात प्लेटिंग कामापासून धंद्याला सुरुवात केली व आज 'साखरकारखान्यांची उभारणी म्हणजे नायक्रोम' एवढे नाव कमावले ! पानशेत पुरात चार लाख रुपयांची यंत्रसामग्री वाहून गेली असता रमीचा एखादा डाव हरल्यापेक्षा ज्यांनी अधिक दुःख मानून घेतले नाही ! तसेच आमचे 'मॅस्वी'चे कान्हेरे आहेत. 'उद्यम इंजिनियरिंग'चे गोडसे

## ......ज्यांची प्रयोगशाळा डनलॉप आणि फायरस्टोन कंपनीच्या खालोखाल आहे.


## हरिभाऊंची डेक्कन क्वीन

संशोधनबुद्धी आणि व्यावसायिक यश हे वसंतरावांच्या बाबतीत हातात हात घालून गेले. पण असेही काही संशोधक आहेत, ज्यांची संशोधनबुद्धी पहिल्या प्रतीची असूनदेखोल व्यावसायिक क्षेत्रात नेत्रदीपक यशापासून त्यांना वंचित राहावे लागले. अशांपैकी आमचे हरिभाऊ सोहोनी एक.

मुंबईला कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना एका स्नेहसंमेलनप्रसंगी एका विद्यार्थ्याने विजेवर चालणाऱ्या गाडीचे एक लहानसे मॉडेल प्रदर्शनात मांडले होते. त्यावेळचा जी. आय्. पी. चा जनरल मॅनेजर संमेलनाचा मुख्य पाहुणा होता व त्याने हे गाडीचे मॉडेल पाहून ते तयार करणाऱ्या विद्यार्थ्याची विचारपूस केली व 'शिक्षण संपल्यावर माझ्याकडे ये. नोकरी तयार आहे' असे साहेबाने त्या विद्यार्थ्याला सांगूनही टाकले. विद्यार्थ्याने परीक्षा संपल्यावर साहेबाची भेट घेतली व साहेबानेही तात्काळ त्याला नोकरीवर ठेवून घेतले. आणि थोड्याच दिवसात काम दिले डेक्कन क्वीनवरील इंजिन ड्रायव्हरचे. आजही अनेक वर्षांचा अनुभव असल्याशिवाय डेक्कन क्वीनवर कुणाची नेमणूक होत नाही. पण वीस वर्षांपूर्वी अल्पावधीतच ही जबाबदारी ज्याच्यावर टाकण्यात आली तो विद्यार्थी म्हणजेच आजचे हरिभाऊ सोहोनी.

प्रकृतीने हरिभाऊंना पुढच्या काळात हात दिला नाही. भांडवलाची सोयही हवी तेव्हा होऊ शकली नाही. नाहीतर ही असामी भल्याभल्यांना भारी ठरती.

पुढे केवळ हौस म्हणून त्यांनी घरी बनवलेली ही विजेची गाडी. अगदी डेक्कन क्वीनची आठवण व्हावी इतकी सुबक आणि सुसज्ज.



आहेत, ' अॅडेप्ट लॅबोरेटरीज 'चे गद्रे आहेत, 'सह्याद्रि डायस्टफ् 'चे बोडस आहेत; 'नगरकर इंडस्ट्रीज् 'चे नगरकर, ' कुलकर्णी फाऊंड्रीज 'चे कुलकर्णी, ' भारत पेन्सिल्स'चे मराठे. कितीतरी मंडळी डोळ्यासमोर येतात की ज्यांच्या हाती पुण्याच्या सभोवती होत असलेल्या औद्योगिक क्रांतीचे आज नेतृत्व आहे. हे कारखाने आज लहान दिसतात, पण मुंबईहून किंवा इंग्लंड-अमेरिकेहून आलेल्या बड्या देशी व परदेशी कंपन्यांपेक्षा यांच्यावरच आपल्या भावी विकासाची खरी मदार आहे. ही मंडळी कणखर आहेत, स्वदेशहिताविषयी जागरूक आहेत. ही उभी राहिली तर पुणे खऱ्या अर्थाने पुन्हा उभे राहणार, महाराष्ट्र उभा राहणार आणि भारताच्या औद्योगिक क्रांतीवर आपली छाप टाकणार. आपण त्यांना सुयश चिंतूया.

★ ★ ★

## मी कारखानदार आहे, दलाल नाही

कै. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्योगमंत्री असताना घडलेली गोष्ट.




जर परदेशी कारखानदार भारतात आला तर त्याच्या कारखान्यातील किमान ५१ टक्के भांडवल भारतीय हवे असे भारत सरकारचे त्यावेळी धोरण होते.

हे धोरण धाब्यावर बसवून, मुखर्जींपर्यंत प्रकरण न जाऊ देताच एका प्रथितयश ब्रिटिश कंपनीला भारतात कारखाना काढण्याची परवानगी देण्यात आली.

गणपतराव साठे यांनी याबाबत मराठा चेंबरचे साहाय्य घेऊन मुखर्जींपर्यंत तक्रार गुदरली. मुखर्जींनी चूक कबूल करून साठे यांनाच यातून मार्ग काढण्यास सांगितले. " मी कोको-चॉकोलेट बनवितो त्या, म्हणजे साध्या कोको बियांपासून भारतात भारतीय साखरेने परदेशी कंपनीने आपला माल बनवावा." ही साठे यांची सूचना अखेर मान्य झाली.


पुढे श्यामाप्रसाद मंत्रिमंडळातून गेले. नव्या व्यापारमंत्र्यांच्या कारकीर्दीत या परदेशी कंपनीला, ठरलेला करार मोडून, 'बेसिक चॉकोलेट' बनविण्याची परवानगी दिली गेली. साठे यांनी पुन्हा तक्रार गुदरली. तेव्हा व्यापारमंत्र्यांनी साठे यांना हळूच सुचविले, " तुम्हांला हवा तर तसा बेसिक चॉकोलेट आयातीचा परवाना देतो." स्वाभिमानी गणपतराव ताडकन् उत्तरले, " मी कारखानदार आहे, परदेशी मालाची विक्री करणारा दलाल नाही ! "

## : ३ :

पण कारखानदारी बजाज-विलींची असो, किर्लोस्कर-कमिन्सची असो किंवा वैद्य-परांजप्यांची असो, त्यामुळे पुण्याच्या जीवनात काही नवीन समस्या निर्माण होणार हे उघड आहे. तसे पाहिले तर गुन्हेगारीपासून तो स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधापर्यंत सर्व क्षेत्रांत औद्योगिक क्रांतीचे परिणाम पाहावयास मिळतील. पण लोकसंख्यावाढीचा धोका सर्वांत मोठा आहे आणि अनेक समस्यांचा उगमही या संख्यावाढीतच आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाचे आयुर्मान वाढले, मृत्युसंख्येत घट झाली आणि जन्मसंख्येत काहीशी वाढच सुरू आहे– या नैसर्गिक वाढीला कोणीच तात्काळ आळा घालू शकत नाही. कुटुंबनियोजन-मोहिमेचे परिणाम कालांतराने दिसतील तेव्हा दिसोत. पण चुकीच्या औद्योगिक नियोजनामुळे पुण्या-मुंबईसारख्या शहरात जी लोकसंख्या विनाकारण फुगत चालली आहे, तिला आळा घालणे शक्य आहे. पुण्याच्या आसपास किती क्षेत्र उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी मोकळे ठेवावे की, ज्यामुळे या उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारवर्गाची व नोकरवर्गाची राहण्याची व जाण्यायेण्याची किमान सोय होऊ शकेल, याचा काही विचारच हे उद्योगधंदे येथे निघत असताना झालेला दिसत नाही. त्यामुळे राहण्याच्या जागेच्या प्रश्नाने पुण्यात अत्यंत गंभीर स्वरूप धारण केलेले आहे. दहा वर्षांपूर्वी खणाला दहा रुपये भाडे द्यावे लागत असे ते आता वीसपर्यंत वाढले आहे. पागडी, कायम ठेवी, आगाऊ भाडी घेऊन खाजगी तऱ्हेने हा प्रश्न सोडविला जात असला तरी, एक तर सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना हे परवडत नाही व दुसरे म्हणजे गरजेच्या मानाने हे प्रयत्न फारच तुटपुंजे आहेत. रस्त्यांवरची गर्दी अलिकडे बेसुमार वाढली पण रस्तेरुंदीची नगरपालिकेजवळ काहीही तरतूद नाही. जे रस्ते सायकलींच्या वाहतुकीसाठी २०।२५ वर्षांपूर्वी बांधले त्यावरून आता भरधाव वेगाने ट्रक्स जाऊ लागल्या तर त्यांचा टिकाव लागणार कसा? वरचेवर बिघडणाऱ्या या रस्त्यांची देखभालही नगरपालिका नीट करू शकत नाहीं. ट्रक्स, स्कूटर्स यांची वाहतूक, लहान रस्ते, गर्दी यामुळे पुण्यातील अपघातांचे प्रमाणही दरवर्षी वाढत आहे. पाच वर्षांतील हीं आकडेवारीच पाहा–

| | फेटल (मृत्यु) | सीरियस (गंभीर) | मायनर (इजा) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९५८ | २० | १२ | ६७२ | ७०४ |
| १९५९ | २३ | ९ | ७९४ | ८२६ |
| १९६० | २३ | १९ | ७९९ | ८४१ |
| १९६१ | ३४ | २३ | ७९३ | ८५० |
| १९६२ | ३८ | २१ | ७१९ | ७७८ |
| १९६३ | ३५ | २८ | ९७६ | १०३९ |

पाच वर्षांत पन्नास टक्क्यांची ही वाढ आहे आणि ड्रायव्हरचा निष्काळजीपणा हा यापैकी फार थोड्या अपघातांना कारणीभूत असून मुख्य कारण वाढती गर्दी व लहान रस्ते हेच आहे हे खुद्द पोलीस निरीक्षकांच्या वार्षिक अहवालात नमूद आहे. मोठमोठे कारखाने उभारले जातात पण या कारखान्यांकडे जाणारी वाट धड असू नये? किर्लोस्कर-कमिन्सचे बांधकाम संपत आले, उत्पादनालाही लवकरच प्रारंभ होईल पण कोथरूड गावातून





‘केसरी’कारांनी गौरविलेली ‘पुण्यातील पहिली चिमणी’ ती ही नव्हे. ही आहे कोल्हापूरजवळच्या कुंभिकासारे येथील साखर कारखान्याची चिमणी. पण हिची उभारणी मात्र केली आहे श्री. परांजपे यांच्या नायक्रोम मेटल वर्क्सने–जे त्या पहिल्या चिमणीच्या अलीकडेच संगमावर पुरानंतरही पुन्हा जोरात चालू आहे.

कारखान्याकडे जाणारा रस्ता किती अरुंद आणि वळणावळणाचा आहे हे कोणीही समक्षच पाहून यावे. याच रस्त्याने पी. एम्. टी. कारखान्याची मालवाहतूक करणाऱ्या ट्रक्स, सायकली, मोटारगाड्या आणि पादचारी या सर्वांचीच वर्दळ वाढणार असेल तर अपघातांसाठी एक चांगली जागा तयार होत आहे असेच म्हटले पाहिजे. चिंचवड स्टेशनपासून चिंचवड गावात जाणारा रस्ता फर्लांग दोन फर्लांग काही नसेल. ज्या रस्त्यावरून केवळ बैलगाड्या काही काळापूर्वी चालत होत्या, तेथून आता मोठमोठ्या ट्रक्स, कारखान्याच्या अधिकारी वर्गाच्या अलिशान गाड्या, सायकली यांची वाहतूक सुरू आहे. पण हा रस्ता काही सुधारला नाही. मुळव्याधीचा अनुभव कोणास हवा असेल त्याने या रस्त्यावरून जाण्यायेण्याचा व्यायाम ठेवावा. फिआट गाडीने गेल्यास जास्तीत जास्त एक महिना हा अनुभव येण्यास लागेल, सायकलीवरून आठच दिवसात हमखास गुण. समोरच जी. ई. सी. चा प्रचंड कारखाना उभा आहे, उजवीकडे इन्व्हेस्टा मशिन टूल्स आहे. चिंचवड ग्रामपंचायत आहे. पाच वर्षात यापैकी कोणालाही याबाबतीत वाटचाल करावीशी वाटली नाही हे आश्चर्य आहे.

रोज पुण्याहून खडकी, पिंपरी, चिंचवड किंवा हडपसर या भागातील कारखान्यात कामाला जाणाऱ्यांची संख्या पाच वर्षापूर्वी किती होती आणि आज ती किती वाढली आहे व त्यामानाने वाहतुकीच्या सोयीत किती वाढ होणे अवश्य आहे याचे काही गणितच मांडले गेलेले कुठे दिसत नाही. सायकल आणि रेल्वेने मिळून सध्या रोज सकाळी आठ हजार पुणेकर खडकी-पिंपरीकडे कामासाठी पळत असतात. पाच वर्षापूर्वी ही संख्या हजार ते पंधराशेच्या आसपास होती. हडपसरकडे पाच वर्षापूर्वी काहीच वाहतूक नव्हती, ती आता दोन हजार झाली आहे. पी. एम्. टी. यांची सोय करू शकत नाही, सायकलींवरून जाणे श्रमाचे व थंडीच्या व पावसापाण्याच्या दिवसात फार त्रासाचे. रेल्वे याकडे लक्षच पुरवायला तयार नाही. पुणे-चिंचवड हा मार्ग 'सबर्बन एरिया' म्हणून जाहीर करून, मुंबईप्रमाणे लोकलचे दर येथे लागू करावेत व गर्दीच्या मानाने थोड्या गाड्याही वाढवाव्यात ही

## पिंपरीजवळची ही खराडवाडी . . . .







# आणि हे
# मुंबईतील अशाच एका वस्तीचे शब्दचित्र

मडकं भरताच अम्मानं ते कडेवर घेतलं. खालचा ओठ चावत ती रस्ता ओलांडू लागली. तिनं मडकं उचलताच एका म्हाताऱ्यानं नळाखाली डालडाचा गंजका डबा लावला. डबा भरेपर्यंत कानावरचं विडीचं थोटुक पेटवलं. डबा अर्धामुर्धा भरताच तो घेऊन तो लगबगीनं गेला आणि वीसपंचवीस पावलांवरच कमरेचं फडकं वर करून उकिडवा बसला. आपल्याच तंद्रीत बुडून विडीचे झुरके मारूं लागला. छातीची हाडं घुसमळत खोकू लागला, घसा खरवडत पचपच थुंकत राहिला.

वस्तीतल्या झोपड्याही उकिडव्या बसल्यासारख्या दिसत होत्या, बारक्या बारक्या काटकुळ्यांनी कंबरभर उंचीच्या झोपड्या तोलून आवरून धरल्या होत्या. क्वचित् एखाद्या-दुसऱ्या झोपडीवर भोकं पडलेल्या पत्र्यांचे तुकडे होते. बाकीच्या झोपड्या कशाबशा शाकारल्या होत्या. खजूर बांधून आलेल्या बेळांच्या डाळ्या, टोपल्या फाडून केलेले बांबूचे तट्टे, सिमेटाची जुनी पोती, सिनेमाचे, निवडणुकांचे, जाहिरातीचे बॅनर, पोस्टर–मिळेल ते साहित्य जमवून ज्यानं त्यानं आपाआपली झोपडी झांकली होती, सजवली होती......

दोन दोन झोपड्यांमध्ये उघड्यावर दोरीनं बांधलेले फडक्यांचे पाळणे झोपड्या हलवीत लोंबत होते. त्यात तान्ही पोरं अंगाच्या मुटकुळ्या करून चीप पडली होती. चालूं रांगू शकणारी पोरं बरगड्यांखाली लोंबणारे पोटाचे फुगे फुगवून डुकरांसारखी वणवणत होती. त्यांच्या पूर्ण उघड्या अंगावर मातीचे पांढुरके ओरखडे चरचरत होते. गालांवर शेंबडाची पुटं सुकून तडतडत होती. गंमत म्हणून पोरं गटारातल्या पाण्यात कागदी होड्या सोडून खेळत होती. हाताचे पंजे गटारात बुडवून पाणी तुबवीत होती. होड्या अडवीत बुडवीत होती.

एखाद्या दुसऱ्या झोपडीतून अर्धनग्न बाई गुहेतून बाहेर आल्यासारखी ओणव्यानं बाहेर येत होती. विमानाची घरघर ऐकून आकाशात शोध घेत होती. मग फडकं झाडून झोपडीवर वाळत टाकत होती. दोनचार मुठी तांदूळ धुऊन भुयारात गेल्यासारखी आत जात होती. दुसरी बाई दृष्टीस पडली तर तेलगु, मराठी, हिंदी अशा भाषांच्या मिश्रणातून पुसटसं बोलून पुनः आत जात होती.

समोरच्या फुटपाथवर अबदुल्लानं आपलं रोजचं दुकान थाटलं होतं. समोर पेटी, तीत बिस्किटं, भजीं, कबाब, पेटीच्यावर कानफुटके कप, शेजारी शेगडीवर उकळणारी चहाची किटली. गिऱ्हाईकाची वाट बघत तो बसला होता. चाळा म्हणून अधूनमधून किटलीचं झाकण उघडून बघत होता. मध्येच 'चाय–भुस्कुट' अशी आरोळी ठोकीत होता.

बाकी सारी वस्ती थंडच होती.

*[ जयवंत दळवी यांच्या 'चक्र' कादंबरीतून ]*

मागणी, रेल्वे मंत्री शहानवाझखान याचेसमोर मराठा चेंबरमध्ये माडली असता त्यांनी ती हेटाळणीच्या शब्दात फेटाळून लावली असे म्हणतात.

शाळातून गर्दी इतकी की एकेका वर्गातून ५०-५० मुले; ४५ मिनिटांच्या एका तासात शिक्षकाला प्रत्येक मुलामागे धड एक मिनिटही लक्ष देता येऊ नये ! मग क्लासेसची धमाल माजतेच आहे, गाइडाची रास डोक्यावर चढतेच आहे. दहा वर्षात लहानमोठे शंभर कारखाने पुण्यात निघाले. पण ससून-तारा-चंदच्या जोडीला एखादे नवे हॉस्पिटल चिंचवड-पिंपरी भागात किंवा पुण्याच्या आसपास इतरत्र कोठे निघाल्याचे ऐकिवात नाही. ससून वाढले, पण किती ? मग बाहेर वऱ्हांडचात रोगी का ठेवले जातात ? खाटा अपुऱ्या म्हणून जमिनीवरच रोग्याची निजण्याची सोय तर सरसहा केली जात आहे. डॉक्टरांचा तुटवडा, नर्सेसचा तुटवडा आणि शिवाय वर कमालीची बेफिकीरी ! हे गर्दीचे संकट पुण्याच्या नागरी जीवनाची सगळी शातता, सगळे स्वास्थ्य याचा ग्रास घेत आहे आणि दुर्दैव हे की याकडे कोणाचेच लक्ष नाही. यावर उपाययोजना करण्याची कोणालाच निकड वाटत नाही. बडोद्यातही मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झाले. पण बडोदा नगरपालिकेने याचा शास्त्रशुद्ध विचार केला, तज्ज्ञांचा सल्ला घेतला. औद्योगीकरणाचा फाजील ताण शहरावर पडून त्यामुळे नागरी जीवनाचा धागा ताणून तुटू नये म्हणून काही पूर्वनियोजन केले असे जाणकार मडळीकडून समजले. यासाठी तज्ज्ञाचा केवळ सल्ला घेण्यासाठी म्हणून बडोदा नगरपालिकेने वीस लाख रुपये फीप्रीत्यर्थ खर्ची घातले. यावरून निदान या नियोजनाची निकड तिला किती गंभीरपणे जाणवली आहे याची कल्पना येते.

## पुणे शहर विकास योजना

पुणे शहराचाही एक डेव्हलपमेंट प्लॅन तयार आहे असे कळते. पण यंदाच्या (६४–६५) अर्थसकल्पात तरी या शहर-विकासयोजनेचा उल्लेख नाही. यासंबंधी नगरपित्यानी केलेली टीकाही वृत्तपत्रांतून येऊन गेलेली आहे. सदाशिवपेठ मतदार-सघातील एक जुने व अनुभवी नगरपिते श्री. ल. गो. सहस्रबुद्धे यानी आपल्या अर्थ-सकल्पावरील भाषणात यावर टीका करताना म्हटले, "एक अत्यत मोठी नजरचूक या संकल्पात दिसते. शाळाच्या इमारती, बागाची सुधारणा, दवाखाने वगैरे गोष्टीसाठी रकमा आपण टाकल्या. पण पुणे शहराचा डेव्हलपमेंट प्लॅन आपल्या जनरल बॉडीपुढे विचारासाठी आहे, त्याचा विचार या अर्थसकल्पात कोठेच झालेला नाही."

एक तर माननीय नगरपित्यानी 'नजरचूक' हा शब्दप्रयोग करावा इतक्या मामुली पातळीवर हा विषय सध्या नगरपालिकेकडून हाताळला जात असल्याचे या टीकेवरून दिसते. यातही दिरंगाई कशी चालू आहे याची कल्पना दि. २२ मार्चला महानगर-पालिकेने संमत केलेल्या ठरावावरून चागली येते. हा ठराव असा: "पुणे शहराची सर्वांगीण उन्नती करण्याच्या दृष्टीने, महापालिकेच्या शहरसुधारणा समितीने एक विकासयोजना तयार केली आहे. या योजनेस आमसभेची मंजुरी मिळाल्यानंतर ती योजना राज्यसर-कारकडे मान्यतेसाठी पाठवावयाची आहे. परंतु या योजनेवर नागरिकाची मते मागविणे इत्यादि कामे व्हावयाची असल्यामुळे ही योजना राज्यसरकारकडे पाठविण्यास वेळ लागणार आहे. म्हणून ही योजना राज्य-

# हा भीषण प्रश्न घोषणांनी सुटणार नाही

पुण्यात आज जवळ जवळ एक लाख वसती झोपडपट्टीत राहते. म्हणजे दर सहा पुणेकरापैकी एकाला झोपडपट्टीचा आश्रय घ्यावा लागत आहे. मुंबईला गेल्याच आठवडचात ( शनिवार दि. २१ मार्च ) शिवाजी पार्कवर झालेल्या 'झोपडपट्टी व उपेक्षित वस्ती जनता परिषदेच्या प्रतिनिधि संमेलनात अध्यक्षपदावरून भाषण करताना मुंबईचे माजी चीफ इंजिनिअर श्री. ना. वि. मोडक यांनी असा इशारा दिला की, 'कुलाब्यापासून वसईच्या खाडीपर्यंत पचावन्न लाखांच्यावर लोकसंख्या वाढू द्यावयाची नाही असे ठरवून त्याप्रमाणे उपाययोजना केली तरच बृहन्मुंबई-च्या रहिवाशांना माणसासारखे जगता येईल. असे न केले तर आणखी काही वर्षात येथील परिस्थिति आवाक्याबाहेर जाईल.'

ते पुढे असेहि म्हणाले, 'घरबांधणीचा हा प्रश्न घोषणांनी सुटणार नाही तर केंद्र व राज्य सरकार, महानगरपालिका, उद्योगपती, समाजसेवक, तंत्रज्ञ या सर्वांनी एकत्र येऊन विचाराने योजना आखली व निर्धाराने पार पाडली तरच तो सुटेल.

यासाठी सरकारने उपनगरात १५,००० एकर जमीन ताबडतोब ताब्यांत घेऊन व 'ग्रेटर बाँबे हाउसिंग व डेव्हलपमेंट ॲथॉरिटी' स्थापन करून त्याकडे हे काम सोपवावे.'

पुण्याच्या लोकसख्येवरहि अशीच कमालमर्यादा घालण्याची वेळ आली आहे काय, याचा सूज्ञांनी विचार करावा.

*

सरकारकडे पाठविण्यास चालू महिन्यापासून सहा महिनेपर्यंतची मुदतवाढ देण्यात यावी." या ठरावात किती खाचाखोचा आहेत, वेळकाढूपणाची किती सोय या शब्दरचनेत करून ठेवण्यात आलेली आहे हे जाणकारांना सहज समजेल. याच्याच जोडीला दि. २३।३।६४ च्या वृत्तपत्रात बातमी आलेली आहे की, 'महापालिकेचे नगरस्थापत्यप्रमुख श्री. बी. एफ्. बोड इंग्लंडला व्यावसायिक शिक्षणासाठी सहा महिने जात आहेत.'


बडोदा नगरपालिकेला पुण्याचेच तज्ज्ञ मिळावेत आणि पुणे महापालिकेला शिक्षणासाठी माणसे पाठविण्याची गरज भासावी हा प्रकार काही औरच दिसतो. पुण्याचा लक्ष्मी-रोड रुंद करण्याचे ठरल्यानंतर प्रत्यक्षात रस्तारुंदी होण्यास १०।१२ वर्षे लागली. या हिशोबाने आता एकूण शहरविकासयोजनेच्या मंजुरीचे आणि अंमलबजावणीचे वेळापत्रक ज्याने त्याने ठरवावे म्हणजे झाले. यासंबंधी अधिक लिहिणे न लगे.

वास्तविक हा प्रश्न नगरपालिका, सरकार, कारखानदार व चवथा घटक म्हणून कामगार-संघटना या सर्वांनी संयुक्तपणे हाताळणे आज अवश्य होऊन बसलेले आहे. कारखानदारांनी नगरपालिकेवर जबाबदारी टाकायची, नगरपालिकेने सरकारवर गाडी ढकलायची, कामगारांनी नुसतेच मोर्चे काढीत राहायचे याने काहीच कार्यभाग होणार नाही. सर्वांना तीव्रतेने जाणवणारा घरबांधणीचाच प्रश्न जरा तपशीलात घेऊन, कारखानदार काय म्हणतो? वसंतराव वैद्य यांनी भूमिका मांडली ती अशी:

## कारखानदारांचा दृष्टीकोन

"आज घरबांधणीसाठी सरकार कमी व्याजाने, होणाऱ्या खर्चाच्या तीन चतुर्थांशपट रक्कम कारखानदारांना कर्ज म्हणून देण्यास तयार आहे. पण कारखानदार हे काम अंगावर घेण्यास पुढे येत नाहीत. त्यांचे म्हणणे असे, की ही कामे सरकारचीच आहेत. सरकार जर आमचेकडून कर वसूल करते तर नागरिकांच्या राहण्या वगैरेची सोय सरकार किंवा नगरपालिकांसारख्या संस्था यांचेमार्फतच होणे जरूर आहे. आमचे क्षेत्र उत्पादनाचे. घरे बांधा, शाळा चालवा, दवाखान्यांची, पाणी-पुरवठ्याची सोय करा ही सार्वजनिक संस्थांची कामे कारखानदारांनी अंगावर घेतल्यास व्याप विनाकारण वाढत जातो व मूळ

**चिंचवड स्टेशन......**



प्रिय वाचक! आठवते का आपल्याला 'माणूस'च्या फेब्रुवारी अंकात रा. म. शास्त्री यांनी वर्णन केलेली ख्रिस्ताईन किलरच्या जन्मगावाची ती जन्मकथा?—

"लंडनपासून १४ मैलावर असलेले एक खेडे. या खेड्यात रेल्वे सार्यडिंगला एक मोडका रेल्वेचा डबा पडलेला होता. या डब्यांत अनेक गरीब कुटुंबे आपला उध्वस्त संसार कसाबसा सावरून राहत होती. बकिंगहॅमशायर परगण्यांतील थेम्सच्या तीरावरील हे एक छोटेसे गाव. हमरस्त्याच्या कडेला वसलेले हे गाव एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला, गावावरून रेल्वे गेली तेव्हा प्रथम गजबजू लागले. त्यानंतर वर्षामागून वर्षे गेली. खेड्यापासून तो नदीपर्यंतच्या भागात मध्यमवर्गीयांची घरे आणि गरीब लोकांच्या गलिच्छ वस्त्या हळूहळू रुजल्या; वारेमाप वाढल्या. मुंबईच्या एका उपनगराप्रमाणे या खेड्याचा अवतार झाला. गावाची वाढ झाली. परंतु एखाद्या पोलिओ रोगाचा वेडसर मुलगा 'सुजल्यासारखा फुगावा तशी ही वाढ होती. त्यात कसली योजनाबद्धता नव्हती. जागा मिळेल तशी लोकवस्ती रचलेली. त्यांत बंगले होते, घरे होती, चाळी होत्या, तंबू होते, झोपड्या होत्या, रेल्वेचे मोडकेतोडके डबे होते आणि रंगशाळा (night clubs) होत्या.

या देवाने वसवलेल्या बकाल वसाहतीत ख्रितीन वाढत होती आणि १४ मैलांवर लंडनचे दिवे लुकलुकत होते––

लंडनचेही झपाट्याने न्यूयॉर्ककरण घडत होते. निऑनच्या जाहिरातींनी रात्री झगमगू लागल्या होत्या. न्यूयॉर्क शहरात आढळणारी रतिकन्यांची रेलचेल आता या शहरातही आढळू लागली होती अशा वेळी या बाह्य धक्क्यांनी समाजातील नीतिमूल्यांना जे हादरे बसत होते ते हळहळू शहरवासियांच्या अंगवळणी पडत होते...."

पुण्याचे आणि पुण्यापासून बारा मैलांवर असणाऱ्या चिंचवडचे हे भावी चित्र तर नव्हे ना?

★ ★

उत्पादनाच्या कामाकडे लक्ष केंद्रित राहू शकत नाही. अर्थात् कारखान्यातील उत्पादनाच्या दृष्टीनेही उत्पादकाची स्थिती चागली असणे अवश्य आहे हे कारखानदारही जाणून आहेत. पुण्याचेच उदाहरण घ्या. कारखान्यात कामाला येण्यासाठी पाचपाच सहासहा मैलांची सायकलरपेट करून जो कामगार किंवा नोकर येत असतो तो कामाला सुरुवात करायच्या वेळीच अर्धाअधिक दमलेला असतो. अशा स्थितीत त्याच्या कार्यक्षमतेचा जो लाभ कारखानदाराला वास्तविक मिळणे अवश्य आहे तो मिळत नाही. कामगाराचेही वेळेचे आणि श्रमांचे नुकसान. यावर उपाय म्हणजे कामाच्या जवळपासच राहण्याची सोय करणे हा होय. त्यासाठी कारखानदार पुढे येतीलही. पण नगरपालिकेने बांधून झालेल्या वसाहतीची व्यवस्था ठेवण्याचे, देखभाल करण्याचे काम स्वत:कडे घेणे अवश्य आहे. भाडेकरू कायद्यातही त्यासाठी काही सुधारणा कराव्या लागतील. ”

### सरकारने पुढे यावे

महाराष्ट्र बँकेचे श्री. वसंत पटवर्धन यांनी सरकारवरच जबाबदारीचा मुख्य वाटा टाकला. ते म्हणाले, “ पुण्यात कारखानदारी वाढल्यामुळे आयुर्विमा कॉर्पोरेशनला किती अधिक पॉलिसीज् मिळाल्या याचा हिशोब करा. आयुर्विमा ही तर सरकारी संस्था. निदान तिने तरी पुण्यातील वाढीतून जमा झालेला निधी पुण्याच्या घरबांधणी कार्यक्रमासाठी का खर्च करू नये ? गुंतवणूक केवळ नफ्यासाठी करावयाची हा खाजगी मांडवलदारांचा दृष्टिकोन. पण आज आयुर्विमा कॉर्पोरेशनही हाच दृष्टिकोन ठेवीत आहे असे दिसते. नुकतेच कॉर्पोरेशनने टाटाचे चाळीस कोट रुपयाचे शेअर्स खरेदी केले. टाटा समर्थ आहेत व त्यांच्या शेअर्सना गिऱ्हाइकही भरपूर आहे. कॉर्पोरेशनने हे शेअर्स खरेदी करून कोणतेही राष्ट्रीय कार्य केलेले नाही. मग खाजगी कारखानदारांवरच ‘राष्ट्रीय कार्य’ करण्याची सक्ती का ? मुदडासारख्या सटोडियाच्या धंद्यात पैसा गुंतविण्याऐवजी कॉर्पोरेशनसारख्या ज्या राष्ट्रीयीकरण झालेल्या धद्याजवळ अफाट निधी साचून राहिलेले आहेत त्यानी नागरिकाच्या हिताच्या दृष्टीने अवश्य असलेले कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. मग त्यात नाममात्र नफा सुटला तरी चालेल. त्या दृष्टीने कॉर्पोरेशनने घरबांधणीला उत्तेजन देणारी जी नवी योजना जाहीर केली आहे ती उपक्रम म्हणून ठीक आहे, पण ती कमी उत्पन्नाच्या लोकांना मुळीच परवडणारी नाही ”.

कॉम्रेड के. एन. फडके यासबंधी बोलत असताना ताडकन् म्हणाले, “ पण खाजगी कारखानदारापेक्षा सरकारने या बाबतीत एक पाऊल निश्चित अधिक उचललेले आहे. पेनिसिलिन कारखान्यात १८०० लोक कामावर आहेत. निदान ६०० नोकरवर्गाची राहण्याची सोय कपनीने केलेली आहे. आयुर्विमा कॉर्पोरेशननेही आपल्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बाधलेली आहेत. गरजेपेक्षा हे प्रमाण


# डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरिंग कं. प्रा. लि.

**११८० बुधवार पेठ, पुणे २**

इलेक्ट्रिक घड्याळे, टॅक्सी व रिक्षा मीटर्सचे आद्य उत्पादक
मनगटी घड्याळे, गजराची घड्याळे व भिंतीवरील
घड्याळांच्या दुरुस्तीबद्दल ख्यातनाम

**फॅक्टरी :**
५९ ब, मुढवा,
पुणे
फोन : २४९५३

*तारेचा पत्ता :*
HOROLOGER, Poona

**शो रूम्स :**
११७९, बुधवार पेठ,
पुणे २
फोन : ५६१४५

फार कमी आहे हे खरे. पण कारखानदारांनी तेवढे तरी करावे. माझे तर असे स्पष्ट मत आहे की पुण्यात यापुढे नवीन कारखान्याला परवानगी देण्यापूर्वी सरकारने कारखान्यात अपेक्षित असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येपैकी निदान ⅓ कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय कारखानदाराने केलीच पाहिजे असे बंधन घातले पाहिजे. कोटि-दोन कोटींच्या मांडवलात दहा वीस लाखांची भर पडेल एवढेच. पण कारखानदारांना ते सहज शक्य आहे."

कुणी काय करायचे, कुणाची जबाबदारी कोणती हे ठरेपर्यंत एक गोष्ट तरी तातडीने करून टाकणे प्रथम अवश्य आहे. ती म्हणजे शहरवाढीची कमालमर्यादा आणि या मर्यादेसाठी लागणाऱ्या जमिनीची ठराविक व योग्य भावाने तरतूद. नाहीतर घोडा निघून गेल्यावर तबेल्याचे दार लावण्याची आठवण होणाऱ्या टांगेवाल्यासारखी आपली गत होईल. पुण्याचा सर्व परिसर कारखान्यांनी व्यापला जाईल आणि कारखानदार, सरकार, नगरपालिका ही सर्वच मंडळी अहमहमिकेने घरे उभारण्यासाठी जेव्हा पुढे सरसावतील तेव्हां जागाच नाहीत म्हणून पुन्हा गाडे मूळ पदावर येण्याची शक्यता आहे. आठवण आहे ना महापालिकेला आणि सरकारलाही धूळ चारणाऱ्या स्वारगेटकडल्या जमीन-मालकांची? एकरी साठ हजार रुपये भाव मागणारे महाभाग यात आहेत. घरांची सर्व बांधकामे स्थगित पडली आहेत. लहान उद्योगधंद्यासाठी सरकारने १३ लाख रुपये खर्च करून बांधलेले २५ गाळे पाडून टाकण्याची वेळ आली आहे या सरकारी ढिसाळपणामुळे. नामुष्कीची बाब आहे. सरकार जमिनीच्या किंमतीवर वाजवी नियंत्रण घालून या प्रश्नाचा तात्काळ सोक्षमोक्ष लावू शकत नाही!

पण एक गोष्ट उघड आहे. ज्याला गरज त्यानेच शेवटी दार ठोठावले पाहिजे. गरीब मध्यमवर्ग, कामगार यांना घरटंचाईची झळ पोचत आहे. कामगारसंघटनांचें हे कार्य आहे, की त्यांनी पुढाकार घेऊन सरकार-कारखानदार-पालिका यांना हलवून जागे केले पाहिजे. हे केव्हा जमू शकेल? जेव्हा कामगार संघटना नव्या परिस्थित्यनुरूप आपल्या कामाची फेरमांडणी करण्यास प्रवृत्त होतील तेव्हा. आजच्या कामगारचळवळीचा साचा मुंबई

**'मार्क्सवादी' असूनही विवेकानंदांचा वेदान्त मान्य असणारे (?) फडके**



"कामगार चळवळ पगारवाढ, महागाईभत्ता या ग्यानबा-तुकारामाच्या गजरातून मुक्त झाल्याशिवाय तिला उज्ज्वल भविष्यकाळ नाही." के. एन्. फडके या विषयावर आपली मते मांडीत होते. त्यांची स्वतंत्र विचारसरणी व पुण्याच्या कामगार जगताशी त्यांचा असलेला घनिष्ट संबंध ध्यानात घेऊन आम्ही मुलाखतीसाठी त्यांची भेट घेतली.

त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की, 'कामगारांनी आता स्वतःपुरतेच पाहण्याची संकुचित वृत्ती सोडून दिली पाहिजे. महागाईची झळ सर्वानाच पोचत आहे. तेव्हा कामगारांनी या इतर सर्व वर्गांच्या सुख-दुःखाशी समरस होऊन व्यापक पातळीवरून आंदोलने केली पाहिजेत. तरच सर्व समाजाची सहानुभूती कामगार-वर्गाला लाभून समाजवादी शक्तीचे नेतृत्व करण्याची कुवत त्यांच्या अंगी येईल.'

यासाठी कामगार संघटनांच्या आजच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झाला पाहिजे असे फडक्यांचे मत आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर "कामगार संघटना आज नारायणमहाराजांचे मठ बनल्या आहेत. त्यांत पैसे खाऊपणापासून बुवाबाजीपर्यंत, अंतर्गत सत्तास्पर्धेपासून वरिष्ठांशी लांगूलचालनापर्यंत सर्व प्रकार बोकाळले आहेत. प्रथम हे सुधारले पाहिजे."

यासाठी फडक्यांनी उपाययोजना सुचविली ती अशी :

१. संघटना पक्षीय राजकारणापासून अलिप्त ठेवावी. राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना कामगार-संघटनांवर पदाधिकारी म्हणून घेऊ नये. यामुळे नेत्याचा आणि कामगाराचा जो नित्य संबंध यायला हवा तो येत नाही व कामगार-संघटना या पक्षीय स्वार्थासाठी राबवल्या जातात.

२. कामगारांना आपल्या हक्कांची व कर्तव्यांची नीट शिकवण देणे. त्यांची डोकी भडकावण्याचे प्रकार थांबले पाहिजेत.

३. कारखान्याच्या चालकवर्गानेही विशेष लायकी असणाऱ्या कामगार-कर्मचाऱ्यांना कारखान्याच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेण्याचा पायंडा पाडावा. यामुळे कामगारात जबाबदारीची जाणीव वाढीस लागेल व वातावरण चांगले राहण्यास मदत होईल. अशी उदाहरणे फडक्यांच्या माहितीची आहेत की जेथे कारखान्यातील सर्वसामान्य कामावर असणाऱ्या सुशिक्षित कामगाराला कारखान्याच्या डायरेक्टरपेक्षा कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांची व उत्पादनप्रक्रियेची खूप अधिक माहिती आहे.

* *


किंवा सोलापूर येथील कापडगिरण्यात काम करणारा पन्नास साठ वर्षापूर्वीच्या कामगारवर्गाचे चित्र डोळ्यांसमोर धरून तयार केला गेला आहे. तो बदलला पाहिजे. कारण हे चित्र बदलले आहे—निदान पुण्याच्या परिसरात तरी. पन्नास वर्षांपूर्वी कामगाराचे, तो काम करीत असलेल्या कारखान्यात कसलेच हितसंबंध गुंतलेले नव्हते. आज त्याला नोकरीची शाश्वती आहे, इन्शुरन्स–प्रॉव्हिडंट फंड योजनेचे लाभ त्याला मिळत आहेत, किमान वेतन कायदा आहे, बोनस आहे, पगारी हक्काच्या सुट्ट्या आहेत—थोडक्यात तो केवळ ' मजूर ' नसून कामगार आहे आणि लवकरच तो ' कर्मचारी ' होण्याच्या मार्गावर आहे. या नव्या कर्मचारी संघाच्या कामाचे स्वरूप दुहेरी ठेवण्यात आले पाहिजे. पहिले व्यावसायिक व दुसरे राजकीय. पहिल्या व्यावसायिक क्षेत्रात, कामगारांची गुणवत्ता वाढविण्याच्या कार्यात मालकांशी किंवा सरकारशी सहकार्य करणे, कामगारांना आपले हक्क व कर्तव्ये यांचे ज्ञान करून देणे, त्यांच्या सुखसोयी वाढविण्यासाठी शक्यतेच्या मर्यादेतील सर्व प्रयत्न करीत राहणे ही कामे येतात. दुसऱ्या राजकीय क्षेत्रात कामगारांना केवळ कामगारहिताच्या दृष्टीतून सर्व प्रश्नांकडे न पाहता व्यापक सामाजिक हिताचा विचार करण्यास शिकविण्याचे काम येते. एक उदाहरण घेऊ. पेनिसिलिन कामगारांनी नुकतेच एक आंदोलन केले. त्रिपक्षीय करार—जो सरकारच्या पुढाकारानेच अंमलात आला—त्याची पायमल्ली सरकारी क्षेत्रातील कारखान्यानेच करू नये ही कामगारांची मागणी योग्य. पण खरी मागणी कोणती हवी होती ?

अडीच कोटींच्या भांडवलावर पेनिसिलिन कारखाना सहा वर्षात चार सवाचार कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवितो याचा अर्थ काय ? खाजगी क्षेत्रात तरी भांडवलदार एवढे

(पृष्ठ १२ वर चालू)



# आतां टप्पा: अमेरिका



# कलियुगातील पासष्टावी कला

" लोकमान्य टिळक स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ 'श्रीलोकमान्य' या नावाचे दैनिक मुंबईला सुरू झाले होते. दादा (वडील) घरी राहिल्यानंतर आपल्या मसाल्याला प्रसिद्धी मिळावी म्हणून मी त्या दैनिकात रोजी एक इंच याप्रमाणे प्रथमच जाहिरात द्यावयास सुरुवात केली. परंतु ती जाहिरात दादांच्या वाचनात आल्यानंतर हा निष्कारण खर्च आहे असे समजून त्यांनी माझी सणसणीत खरडपट्टी काढली होती, परंतु मी एक वर्षाचा जाहिरातीचा करार केला असल्यामुळे तोपर्यंत जाहिरात ठेवणे मला भागच होते. तसा करार जर मी केलेला नसता तर मी जाहिरात बंदहि केली असती. परंतु त्या जाहिरातीमुळेच धंद्याची वाढ होऊ शकली. हिंदुस्थानात व परदेशातही जो हा आमच्या मालाचा खप वाढला आहे तो जाहिरातीमुळेच वाढू शकला. माल जरी कितीही चांगला असला तरी तो लोकांना कळणार कसा ? नि लोक तरी विकत घेणार कसा ? धंद्याची वाढ व्हावयास हवी असेल तर मालाच्या उत्तमपणाबरोबरच जाहिरात हेही प्रमुख अंग आहे. "

मुंबईचे सुप्रसिद्ध मसालेवाले बेडेकर यांनी नुकतेच आपले जे आत्मवृत्त प्रसिद्ध केले आहे त्यात वरील आठवण एके ठिकाणी आली आहे.

जाहिरातीचे महत्त्व महाराष्ट्रीय व्यापारी-कारखानदारांत सर्वांत प्रथम व सर्वांत अधिक कोणाला उमगले असेल तर ते किर्लोस्कर मंडळींना.

आता हे वरचेच चित्र पहा ! २७ सप्टेंबर १९६१ या दिवशी किर्लोस्करांचे पहिले डिझेल एंजिन खडकीच्या कारखान्यातून अमेरिकेला निर्यात होण्यासाठी निघाले.

## ' डिझेल आज ' संशोधकांच्या ' भूमीकडे जात आहे '

असा पोटमथळा असलेली वरील चित्राची दणदणीत जाहिरात भारतातील सर्व प्रमुख इंग्रजी दैनिकातून झळकावून किर्लोस्करांनी ही प्रसिद्धिची संधी चांगलीच राबवून घेतली.


* *


गडगंज नफे मिळवू शकतात काय ? पेनिसिलिन ही सरकारची मक्तेदारी आहे. सरकार ठरवील ती किंमत. स्पर्धेचा प्रश्न नाही. तेव्हा साडेतीन कोटीच काय वाटेल तेवढा अधिक नफा कंपनी मिळवू शकेल. या नफ्याबद्दल कंपनीने फुशारकी मिरवणे जेवढे चूक तेवढेच कामगारांनी जादा वाटा मागणे तत्त्वतः गैर. पेनिसिलीन–कामगारांचे आहे ते वेतन आसपासच्या तुलनेने पाहता समाधानकारक आहे. मग खरी राजकीय मागणी कोणती हवी ? पेनिसिलिनच्या किंमती खाली आणा, लोकांना यापेक्षा स्वस्त भावात पेनिसिलिन मिळाले पाहिजे ही. अशा व्यापक समाजहिताच्या दृष्टीने कामगारसंघटना विचार करू लागतील तरच त्यांना घरबांधणीसारख्या प्रश्नांची काही विधायक सोडवणूक करण्याचा मार्ग सापडू शकेल. केवळ आरडाओरडा करून काम भागण्यासारखे नाही. कामगारसंघटनांनी एक नवी नैतिक शक्ती प्रथम पैदा केली पाहिजे, की जिच्या बळावर त्या विधायक पुरुषार्थाचे नवे युग समाजात निर्माण करू शकतील.

पुण्यातील कामगारसंघटनांना काळाचे हे नवे आव्हान स्वीकारता येईल काय ? परिस्थिती अनुकूल आहे. येथील सर्वसामान्य कामगार सुशिक्षित आणि प्रौढ आहे. उच्च सांस्कृतिक जीवनाची त्याला ओढ आहे. पुण्याच्या मध्यमवर्गीय जीवनमूल्यांचा त्याच्यावर प्रभाव आहे आणि पुण्याची ऐतिहासिक परंपरा त्याच्या पाठीशी आहे. प्रश्न आहे योग्य व समंजस नेतृत्वाचा. हे लाभेल तर पुण्यात नुसतीच कारखानदारी न वाढता खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती होईल, वाढत्या समृद्धीबरोबरच उद्योगशीलता आणि चारित्र्य यांचा विकास होईल, एक सुसंस्कृत आणि पुरोगामी शहर म्हणून भारतात ते नावाजले जाईल. हे न घडले तर ते केवळ एक महानगर म्हणून ओळखले जाईल–ज्यात केवळ विस्तार आहे, महत्तता कोणतीच नाही. ● ● ●

---

## शहर पुण्याचा निरोप





पेशवाई पुणे गेले, इंग्रजी अमदानीतील शहर पुणेही आता लोपत चालले. पुण्याच्या परिसरात काही वर्षांपूर्वी सहज आढळून येणारी ही दृश्ये यापुढे आता दिसणार नाहीत. हे निगडी गाव. चिंचवडच्या पलीकडे एक मैल. चैत्राच्या एका रखरखीत दुपारी कसे शांत पहुडले आहे ! झाडाखाली बैलगाडी विसावली आहे. माणसं घरात पेंगुळली आहेत. पण पुण्याच्या दिशेने धडधडत आलेल्या या कुरूप वाहनाने निःशब्द शांततेचा कसा क्षणातच भंग करून टाकला आहे ! या वाहनामुळे ही बैलगाडी आता दूर भिरकावली जाईल, कौलारू घरे जमीनदोस्त होतील, गाव उठेल आणि कारखान्याच्या घरघराटाने येथील आसमंताची लय पार बदलूनच जाईल.

तसेच हे कोथरूडच्या वाटेवरील मृत्युंजयाचे मंदिर ! हा सर्व भाग तर गर्द झाडीने कसा डवरलेला आहे ! पण ही वनराई यापुढे टिकणार नाही. कदाचित हे मंदिर, त्याच्यापुढचे हे जुनेपुराणे वृक्ष–हेही लवकरच नाहीसे होईल. कारण मागे अस्पष्ट दिसणाऱ्या बजाजशेठजींच्या नव्या कारखान्याला लवकरच त्याची अडचण भासू लागेल.

निसर्गाशी द्वंद्व खेळून त्याला नमवू पाहणारी ही पाश्चात्य यंत्रसंस्कृती आणि निसर्गावर प्रेम करून, त्याच्याशी तादात्म्य पावून त्याला वश करून घेणारी भारतीयांची आध्यात्मिक संस्कृती यातील कशाची निवड 'माणूस' करील असं कोणी विचारलं तर ?......

खुळ्या माणसा ! तुला प्रश्न विचारायलासुद्धा यापुढे आता कोणाला वेळ उरणार नाही. तूहि निमूटपणे आपल्या पुढच्या उद्योगाला लाग कसा!

★ ★

With
Compliments
From

**Mhatre Pen & Plastic Industries
Private Ltd.**

**Manufacturers
'Plato' Pens and
other brands,
fountainpen nibs
and spare parts.**

परसूच्या पशुकथा

वसंत सबनीस

दोन रुपये

राजहंस प्रकाशन
४१९ नारायण पेठ,
पुणे २

हॉटओमॅट



निर्माते

नाना इंडस्ट्रीज

फोन – ५५७५३

४७१/३
सदाशिव पेठ
पुणे २

आता दगदग नाही

हो ! कारण " हॉट-ओ मॅट " निर्मितीने आरामशीरपणे शेक घेण्याची एक निर्धोक आणि अद्यावत पद्धती उपलब्ध झाली आहे. ती एक विजेवर चालणारी, स्वयंचलित, तपमाननियंत्रक बसविलेली शेकण्याची पिशवी आहे.

पाणी गरम करा, ते पिशवीत भरून तिला घट्ट बूच बसवा !

शेक घेतानासुद्धा जरा जपावेच लागते. नंतर पिशवी रिकामी करून ती उलटी टांगून ठेवा. हो, नाही तर चिकटून बसून निकामी व्हावयाची !

" हॉट-ओ-मॅट " मध्ये वरील सर्व दोष संपूर्णतः निर्मूलन केलेले आहेत. त्यामुळे ती एक घरगुती वापरासाठी आणि हॉस्पिटल्सकरिता अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक गोष्ट झाली आहे.

माफक किंमत आणि बहुमोल उपयोगिता यांची ही सांगड आहे म्हणा ना !





**Swastik rubber serves best through technology**

*Swastik Rubber volunteers to share in the effort to strengthen defence by increasing to the maximum its production of COMBAT BOOTS, GROUND SHEETS and an entire gamut of defence requirements. Swastik pledges to double its production in 1963.*

**CONTINUE BUYING DEFENCE BONDS**

**SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.,**
**POONA-3**

Swastik




## चांदण्या

चंद्रमा मुनिराज आणि
रात मेनका असे
नाचताना पावलांचे
उमटतात हे ठसे !

—शान्ताराम भास्कर

## वीरप्रसव हा देश—!

या भूमीचे पुत्र निपजती वज्रदंड बलशाली रे
अशा भूमिला वक्र पहाया माय कुणाची व्याली रे
या मातीतुन फुलते माया भक्ती आणिक दिलदारी
या मातीतुन पिके पराक्रम जिद्द आणखी इरेसरी
या मातीचा गूण आगळा कणाकणाला लोहकळा
संताभाळी टिळा ही होय धूळ चारते नाठाळां
आखाडचातुन रगेल जरि ती मैफलीत मतवाली रे ।। १ ।।

काळाहुनही जुनी येथल्या इतिहासाची पाने
मानवतेला नियत शिकवती अजुन येथली ऋषिवचने
विश्वशांतिचा मूलमंत्रही इथेच स्फुरला प्रस्फुरला
सर्वप्रीतिचा घोष येथल्या अवघ्या वाऱ्यातुन भरला
न्यायनीतिच्यासाठी येथे उभ्या छातिच्या ढाली रे ।। २ ।।

मउ मेणाहुन मने आमची वज्राला पण पाडु तडे
भुकेल्यास हा घास मुखींचा नाठाळांना चारु खडे
हळवें अमुचे हृदय परंतू काळिज काळाहुन निघडे
संतापायी नमवू माथी दुष्टांची पण पाडु घडे
शिरी जान्हवी हृदयी काशी रुद्रनेत्र पण भाळी रे ।। ३ ।।

इथे न केवळ शांतीपूजा भक्तिरसाची गाणी रे
सर्वांभूती प्रीत उरी पण क्षात्र जागवी धमनी रे
नदी-झऱ्यांतुन जीवनदायी इथे पेटते-पाणी रे
ज्वलंत स्वाभीमान ठासला इथल्या वातावरणी रे
वरदेसह घे पूजा येथे अष्टभुजा रणकाली रे ।। ४ ।।

वीरप्रसव हा देश येथले गर्भ जाणती युद्धकला
वाण सतीचे घेऊन इथल्या कन्या येती जन्माला
इथे लावते धार माउली प्रियपुत्राच्या खड्गाला
वीर येथले शस्त्र उचलती कफन बांधुनी माथ्याला
रणी दौडता बाप मुलाला आण कुळाची घाली रे ।। ५ ।।

आज वेगळा इथे सोहळा आज पंचमी रक्ताची
वीर निघाले बेल उचलुनी पैज लावुनी प्राणांची
आज कोपला रुद्र उरातुन मुद्रा लेवुन क्रोधाची
या शस्त्रांवर नटली काली कुळी वधाया दैत्यांची
कळीकाळही थिजे पाहता या नेत्रांतिल लाली रे ।। ६ ।।

—प. गो. कळस्कर

# सोबत

**श्रीपाद काळे**

पाणंद उतरून गणपुले मास्तर खोलीजवळ आले. पाणंदीवरच्या माथ्यावरच्या शाळेतून बाहेर पडताना दिवस चांगला वर असल्याचे दिवस होते. कातळावरची उन्हे होती तशी होती–झाडा-झुडुपांची पाने लोंबकळल्यासारखी दिसत होती–पाणंद उतरल्याबरोबर चांगल्या तिन्ही सांजा झाल्यासारख्या वाटत होत्या. पाळेमुळे मोकळी झालेला खुरटलेला आंबा लपकत्या पानांनी ताजातवाना झाल्यासारखा वाटत होता. खालच्या अंगाच्या खाडीला भरती जोरात लागली असावी. लहान लहान लाटा किनाऱ्यावर लपक् लपक् आपटत असल्याचा आवाज येत होता. अंकुशाचा घरासमोर भिजलेला पाग पसरलेला होता. बायकोवर करवादत होता, त्यावरून आज त्याला हात हालवीत यावे लागले असावे. बायजीच्या घरातून धूर येत होता. खिडकीच्या फटीतून काढीत एकेक धुराची लहर हातापायानं मोकळी झाल्यासारखी बाहेर येत होती, आणि मासळी खरपूस वास सोडत होती. मोकळ्या मठ्ठ अंगाची सुंदरा वरवंट्यावर लाल तिखट हाताचा सगळा जोर एकवटून वाटत होती. तिखटाचा लालभडक रंग गणपुले मास्तरना इथून स्पष्ट दिसत होता–पाऊलवाटेवर करपांचे अणकुचीदार दगड पडले होते. दगडाला जाग्यावर ठेवून माणसे चाल बदलीत वाट सुधारत असलेली दिसत होती. गणपुले खोलीजवळ आले. दाराशी झडपड्या अंगाची बाळग्यारंगाची कुत्री आळसावून पडली होती. पोटाचे हावके भुकेचे होते, की सुस्ताईचे होते, कळत नव्हते–मास्तरना एकंदरीत कुत्र्या-मांजराची भीतीच वाटत होती. एखादे गुबगुबीत मांजर कोणी छातीशी धरले, तर मास्तरना मळमळायला होत होते. लाडे लाडे अंगाला घासटू लागली, की धूम घेऊन पळावेसे वाटत होते–ही कुत्री इथे आल्या पासून लोचटासारखी पुढे पुढे येत होती. थोडा चहा, आणि केव्हा केव्हां स्वतःच थापलेल्या भाकरीच्या तुकड्याचा मिंधेपणा तिने फारच पत्करलेला दिसत होता–' मी मनापासून काही घालत नाही–तुझी संगत सोबत मला नको ' हे तिला कितीही कनवून सांगिले, तरी तिला समजणार होते थोडेच! पुन्हा आपली पायांत घुटमळत. परवा रस्त्यावर दिसली–शाळेकडून येताना मधल्या आडव्या गेलेल्या मोटाररस्त्यावर. तिथेतर दोन्ही पाय तिने वर केले–वाटलं आताही नरडीला डास घेणार–तोंडाजवळ तिने तोंड नेले, तेव्हा मास्तरना अगदी शरमल्यासारखं झालं–खाली उतरून ती पाठून येऊ लागली–मास्तरनी मनाचा हिय्या केला, आणि दगड उचलला, एक ' किंय ' आवाज करून ती दूर पळाली, आणि मास्तर दारात यायच्या आधी पुढ्यात हजर झाली. रात्री अपरात्री अक्रसून ओरडण्याची तिला भारी सवय–सारं कसं पिचवून टाकत्ये–मध्येच गळा काढत्ये, आणि नवरा मेलेल्या बाईने हंबरडा फोडावा, तसं करते–दाराच्या मधोमध बसलेल्या कुत्रीला मारण्यासाठी गणपुले मास्तरनी डावा पाय वर उचलला, तशी ती सावध झाली. वाकडे शेपूट हालवू लागली, आणि लाथ खाण्यासाठी आपलं अंग चोरून घेतलं–मास्तरना चीड आली–आधीच कोण मनाचा त्रास, त्यात ही पीडा. तोच पाय रेटून पोटावर टाकावासा त्यांना वाटलं, पण पोटाचा हावके देणारा भाग वेगळाच असल्याचं त्यांना जाणवलं–त्यांनी पाय मागे घेतला–ओलांडून दाराचं कुलप त्यांनी काढलं. खोलीत जायचं म्हणजे वाकून जावं लागत होतं. दाराकडच्या कडेनं वाकूनच फिरावं लागत होतं– एखाद वेळ वरच्या वेळूच्या वाशाचं टोक डोकीला लागत होतं. असं लागत होतं, की सबंध मस्तकातल्या शिरा ताणल्यासारख्या वाटत होत्या.

मास्तरनी कपडे काढले. अंगातला शर्ट काढल्यावर कुबट घाण आली–शर्ट आपटल्यावर फाटेल, म्हणून धुण्याची भीती–बादली घेऊन विहिरीवर गेले–विहिरीवर गेले, तर मोठ्या घरची अन्नपूर्णे पाणी काढत होती–नवऱ्याला पत्र लिहायला सांगायला ती दोनदा मास्तरांकडे आली होती, शिव्यासकट तिला पत्र लिहून हवे होते–कमरेला खोचलेला पानाचा बटवा. सारी वाडी तिच्या तोंडाला टरकत होती. पिंक टाकण्याचाच जोर असा होता, की कोणाच्या मनगटाचे पाणीच झाले असते. आपले ते खरे आहे हे पटवण्यासाठी ती जिवाचा आकांत करत होती. तिच्या आवाजाने खालच्या खाडीतले पाणी टराटर फाटत जाते की काय असे वाटत होते. मास्तरांची बादली मास्तर नको नको म्हणत असताना तिने दोरीला बांधली. बादली भरून वर आली, तेव्हा मास्तरना ती म्हणाली, "हातानं वढून घ्या–"

मास्तरनी कृतज्ञतेने तिच्याकडे बघितले–पोटात भूक होती, पण थंड चूल, पांढरे खडे असलेले तांदूळ हे बघून भात करायला त्यांचे मनच घेईना. चहा करावा म्हटले, तर पावडर एवढीच होती. उद्या सकाळी अर्धा कप चहा करावा एवढी. कुत्री दारात कुरकुरू लागली–थोड्या वेळाने कमरेला लुंगी लावलेला अंकुश आला. खोलीतल्या काळोखात त्याने डोकावून बघितले–मास्तरना कळवळून खोकल्याची उबळ आली–अंकुश उभ्याच म्हणाला,

" मास्तर–"

" हां–"

" काळोखातच पडलेत–"

" लावतो दिवा–"

" चूल थंडी दिसत्ये–"

" आज भूकच नाही–"

अंकुश परत फिरला. मास्तरनी काडी ओढली आणि कंदील लावला. एक कृष्णाचे जुने कॅलेंडर लटकत होते. त्याला नमस्कार केला–एवढीशी खोली त्या अधुऱ्या प्रकाशात मकासपणी हसली. बाहेर कुत्रीचे गुरगुरणे तालेवर आले होते–अंकुश पुन्हा आला. छानपैकी हिरवे काजूगर त्याने आणले होते. मास्तरांच्या पुढे त्याने पसरून टाकले. कानाची अर्धी विडी काढली, आणि मास्तरांजवळून पेटी घेऊन त्याने खोली भरून उरेल, असा धूर सोडला–काही न बोलता मग तो निघून गेला. मास्तरनी हिरवे गर तोंडात टाकले. अंकुश गेला तो दरवाजा उघडा टाकून. कुत्रीनं आत तोंड घातलं. मास्तरनी दोन गर पुढ्यात टाकले, ते तिनं गट्ट केले, थिटी शेपटी हालवीत ती इकडे तिकडे पाहू लागली–मास्तरना कळलं, की ती एका पायानं लंगडते आहे–चालायचं टाळते आहे–पोटातलं ओझं थोड्या दिवसांनी तिला सावरणार नाही–

मास्तरांच्यानं बसवलं नाही. पोटातल्या भुकेचा त्यांना वैताग आला. पोटाला बिब्यांचे चरके देऊन वखवखणारी भूक थांबते का,



एकदा त्यांना बघायचे आहे. त्यांनी चूल पेटवली. कुत्रीला वाटलं, हा आता कसा शहाणा माणूस आहे. खुळचासारखा तसाच पडत होता—

—आज सात तारीख होऊन गेली. पगाराच्या शिपायाचा पत्ता नाही. बदलीची ऑर्डर येईल, म्हणून आसुसल्या नजरेनं मास्तरनी पोस्टमनची वाट पाहिली. त्यांना साहेबानं तसं सांगितलं होतं. लौकरच हवी तिथे बदली करतो म्हणून—पण पोस्टमननं पत्र दिलं ते घरचं. बायकोचं—तोच तो मजकूर—दिवस भरत आले, हे काय मला कळत नाही—शेजारी माचा पाळणा नाही म्हणतात—बाळंतिणीच्या खोलीची जमीन नीट करायला हवी आहे. घुशींनी ही माती उकरली आहे—पाण्याची बादली गळती आहे. निदान एक लुगडंतरी या आठपंधरा दिवसांत घ्यायला हवं—दुधाचे पैसे दोन महिन्यांचे द्यायचे आहेत. आठ दिवसांची रजा काढून येऊन जा—पत्रातली जागा संपली—नशीब, तिचं अक्षर मोठं आहे नि खोडाखोड फार करत्ये—

आठ दिवस या कशाला ? कशाला या ? रजा शिल्लक तरी आहे का ? रजा संपली—घ्यायची म्हणजे अर्ध पगारी—रजा घ्या ! तुझं बाळंतपण काढत बसू होय ?

झडचा अंगाची, हाता-पायांच्या झिजून झिजून काडचा झालेली—पोट उसवेल की काय अशी भीती वाटायला लागणारी बायको—चुलीतल्या विस्तवानं जाळ घेतला. अर्ध्या काटक्या जळून गेल्या, तरी चुलीवरच्या पातेलीतलं पाणी थंडच होतं. राखेचे कण वर पडले होते—कोळशाचा बारीक तुकडा वर तरंगत होता—बायकोचं पोटाचं ओझं पेलणारं ध्यान मास्तरना आठवलं, आणि त्यांनी थाड थाड मुस्कटात मारून घेतल्या. घरी जायलाच हवं—पगार झाला म्हणजे—पायी गेलं, तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत पोचता येतं—की बदलीच्या ऑर्डरची वाट पाहावी ?

भाताचे पाणी हलू लागले. शेजारची सुंदरा रानावनातून लाकडे काटक्या घेऊन येते, आणि खोलीच्या बाहेरची संपलेली दिसली, की चार ठेवून जात्ये— आता या माणसांना म्हणावे तरी काय ?—इथून बदली झाली, तर आपला पाय नक्कीच इथं घुटमळेल—गरीबपणाचे भलतेच चीज होत होते—पण बदलीची ऑर्डर येईल का ?—हा प्रश्न मास्तरना खुळचासारखा वाटला. चुलीवरचा भात खदखदत होता—वात झालेल्या माणसाला हसू फुटावे, तसा खदखदत होता—कोणाला हसतो आहे तो ? अरे हसतो आहे तो हरामखोर—हस बावा हस—शाळेच्या साहेबाचा पट्टेवाला आपल्याला बघून असाच हसला होता.

कुत्रीनं मान वर केली होती, आणि मास्तरांच्या तोंडाकडे आशाळभूतपणे पाहात होती—मास्तर हालचाल करीत नाहीसे बघून पेंगुळल्यासारखी मान टाकत होती. लंगडचा पायाला जखम झाली होती काय न कळे, लाल जीभ लांब काढून मध्येच ते तंगडे ती चाटत होती.

थंडी भिरभिरत दाराच्या फटीतून आत आली. पाण्याची सवारी झाली होती. लाटांचा आवाज चुबुक चुबुक इथपर्यंत येत होता. कडेशी कोणीतरी हाकारत असावे—पलीकडे कोणालातरी होडी हवी असेल, सारख्या हाकावर हाका येत होत्या. पण या वस्तीतली माणसे ढिम्म. कोणालाच हाक ऐकू येत नाही—मास्तरनी ताट रिकामे केले—मग पातेली, आणि खरकटे ताट कुत्रीपुढे ठेवले—लाल जिभेने ती तुटून पडली, आणि मग खोलीबाहेर जाऊन गप्प पडली—

मास्तरनी दिव्यावर फुंक घातली. कंदिलाचा चाप खाली ओढण्याचा त्यांना आळस आला—बदलीचा करडा कागद केव्हा दिसतोसे होऊन गेले. ही आशा खोटी हे जाणूनही आशेचा पदर सोडावासा वाटत नव्हता—बाहेर कुणीतरी धडपडत गेले होते, आणि दारापुढची कुत्री इमान ठेवून गुरगुरली होती. आताही सारखी गुरगुरतच राहणार अशी धास्ती वाटत होती, पण ती तेवढचावरच गप्प झाली—

आता खात्याला सवड होईपर्यंत इथेच दिवस काढायचे—याच खोलीत-दुसरी जागाच नाही—दीड मैलावरच्या बऱ्याशा जागेचे भाडे परवडायचे नाही—चार वर्षे लागतील किंवा पाच लागतील. हे असेच चालले आहे. एके ठिकाणी श्वास घ्यावा, तो बदलीचा ससेमिरा. बायकोच्या बाळंतपणाच्या गोष्टी चाललेल्या असतानाच बदलीचा हुकूम आला. याच जागेवर पूर्वी असलेला मास्तर एका अधिकाऱ्याचा, किंवा अधिकारी पक्षाच्या माणसाचा कोणी नातलग निघाला होता. त्याची त्याच्याच गावी बदली होणे ही खात्याची पहिली सोय. गणपुले मास्तरनी खूप खटपट केली. एकदोघांना त्यांची कीव आली. त्यांनी शब्द टाकण्याचे खाजगी आश्वासन दिले. हातउसने पैसे करून जिल्ह्याला दोन खेपा झाल्या. पगारी रजा संपत चालली. या अधिकाऱ्यांच्या पुढे त्यांच्याने खरे म्हणजे

उभंच नीट राहता येत नव्हते. मनात शब्दांची जुळणी करून धड काही बोलता येत नव्हते. या नोकरीत शिरल्यापासून हेच अंगी बाणलेले. अधिकाऱ्याने विचारले, " तिथली शाळा बंद करू या का ?" गणपुले हसले. छे: छे: मुले म्हणजे राष्ट्राची संपत्ती—जनमन गण

बापजन्मात कधी गाणे म्हटलेले आठवत नव्हते. कधी कोणा गधर्वाचे गाणे ऐकलेले नाही—पण प्रभातफेऱ्यांत मास्तरनी गाणे सांगितले होते. हातात कागद धरून लोक मजा बघत असताना—स्वातंत्र्य-दिन, स्वच्छता-दिन—सारे मास्तरांचे होते-गावातल्या लोकांना सवड होत नव्हती. ढोल-ताशाचा उत्साह पहिल्या एकदोन वर्षीच टिकला होता—कोणी-तरी म्हणाले होते, "मास्तर, गावातल्या लोकांना बजावा. हे असं चालायचं नाही—" मास्तर आ वासून पाहात राहिले—गेल्या महिन्यात गणपुल्यांनी शाळा ताब्यात घेतली. पहिल्या मास्तरनें रामराम केला, आणि चौकटचांच्या रुमालानें तोंड पुशीत चालता झाला. त्याची वुलनची पँट, आणि टेरेलिनचा मॅनिला मास्तरांच्या डोळ्यापुढे कितीतरी वेळ दिसत होता—म्याट्रिक झालेला असेल —दुसरीकडे चान्स आला, की लाथ मारून चालता होईल—तरी साहेबाने सांगितले आहे, तुमची अडचण लक्षात आहे माझ्या खात्याला—सवड होताच तुमची सोय करतो—हा ? "

" हा ! "

—कुत्री का कुणास ठाऊक गुरगुरली, आणि ' हं ऽ करून भुंकली—ठ्याँ ठ्याँ भुंकली. लोकांच्या झोपा मोडतेय्—कुठून मरायला आली इथे ? बाहेरचे जग काय ओस पडले आहे ?—गावात जा—इथे कशाला अडमडायला येत्येस—आणि पोटाचे नको ते धंदे—

इथे येताना एक सहकारी म्हणाले, "मास्तर आता चार पाच वर्षांची राखण—" बोलणे अनुभवाचे होते. माझ्यासारख्याला कोण आहे आता ? कोण आहे सोबतीला ? जिथे तिथे हे भाग्य उपडे पडले आहे. काही येत नाही बाबा, काही नाही—ज्योतिष नाही—भिक्षुकी नाही. धंदा नाही. काही भाग्यवान्—स्वतःच्या गावातल्या गावात हयातभर रंगण धरल्या-सारखे फिरतात. काही राजकारण खेळतात—काही लेख लिहितात—काही व्यापार करतात—खताच्या पेंडीचा—कुणाची जिद्द तसू तसू शिल्लक असते—कोणाची ईर्षा फुकर मारला, की एखादा जाळ घेते—लखकन् कोलीत तयार होते—त्यातल्या त्यात कोणी घर बांधतो—कोणी बाग उठवतो—गणपुल्यांना स्वप्नात सुद्धा स्वत:चा दुबळेपणाच दिसतो. स्वत:ची कीव येते—हात पाय झाडावेसे वाटतात—सारेच कसे हात धुऊन मागे लागले आहे. निदान पोराची आशा—मॅट्रिक होईल ही उमेद—पण तिथे सुद्धा नशीबच पेंड खायला लागले आहे—भीक मागितल्यासारखे वार लावले—पण प्रत्येक महिन्याला काही ना काही भानगड—वागतो तर उर्मटासारखा, एका प्रश्नाचे सीधे उत्तर नाही. प्रगतिपुस्तक दाखवीत नाही. फक्त पैशासाठी पत्रे—किती लाब केस वाढवले आहेत त्याने. तोंडात कविता नाही. साधे गणित सोड-वता येत नाही. ओ ओ वाली हिंदी गाणी !

कुत्रीला ट्रकचा किंवा मोटारचा दिवा दिसतो, आणि भुंकण्याच्या आवेशात गुरगुरते—कोणी हिला ही राखण करायला सांगितली आहे ? सोबत करायला सांगितली आहे—अंकुशाला कुठे लांब नेऊन पोचवायला सांगायला हवी. तिचे गलबलते पोट मास्तरना आठवते, आणि ते आपली कूस बदलतात.

मास्तर शाळेत शिकवू लागतात, ' हे आमचे घऽर आहेऽऽऽ' शिमग्यातल्या हळी-सारखी पोरे ते म्हणतात—टेबलाच्या खणात सायक्लोस्टाईलवर छापलेली पत्रके असतात—प्रौढ शिक्षणवर्ग काढण्याची—शाळेत मुलांची हजेरी वाढवण्याची—कसला सप्ताह, कसला दिन—हे सारे करायलाच हवे, घडायलाच हवे—इन्स्पेक्शन आज उद्या म्हणताना महिन्या-वर आलेले असते—मास्तरना कोंडल्यासारखे होते—एकाकीपणाची जाणीव होते—

ते असेच संध्याकाळी घरी येतात. अंकुश ओला पाग घेऊन निथळत्या अंगाने घराकडे येत असतो—अन्नपूर्णेने कोणावर तरी तोंड सोडलेले असते—कदाचित् बबखान्यातल्या नवऱ्यावर असेल. मास्तरांच्या खोलीच्या डावी-कडे मोडकी होडी निगळाला ठेवलेली आहे—मास्तरना कळते, त्या होडीच्या आसऱ्याला काळी पाढरी तंगड मोडकी कुत्री व्यायली आहे—निथळत जाणाऱ्याला अंकुशाला ते विचारतात, "ही पीडा इथे कशाला बाबा?"

अंकुश थबथबलेल्या अंगाने उभा राहतो. कुत्रीविषयी हकीगत सांगू लागतो—तो केव्हा-तरी मुंबईला होता, तेव्हाची त्याची ' साला बोलते 'ची भाषा जागी होते, काही इंग्रजी शब्द आडवे तिकडे मोडून बेसुमार घुसवतो—ती कुत्री म्हणे गावातल्या इनामदाराची. त्यांनी दुसरा टायगर आणला. हिच्या पायावर दगड घालून हिला हाकलून दिली—वणवण फिरली—आणि पोटिशी झाल्यावर इथे टेकली—मास्तरनी तिच्याकडे बघितले—लोण्याच्या गोळ्यासारखी पिले—आणि कुत्रीचे दीनवाणे डोळे—मास्तरनी चहा केला, आणि आपल्याच बशीतून कुत्रीच्या पुढ्यात नेऊन ठेवली—त्या दिवशी आपली लाथ पडली नाही, याबद्दल त्यांना असीम समाधान वाटले—

कुत्रीने सुद्धा त्यांच्याकडे तसेच बघितले. या भल्या माणसाने कुठे बघितले नाहीत असे उपकार करून ठेवले—

संध्याकाळी मास्तरना पोस्टमनने टपाल दिले. दोन्ही ओळखीची पत्रे—बायकोचे—मोठ्या अक्षराची खोडाखोड केलेले—म्हणून कमी मज-कुराचे—दुसरे चिरंजीवाचे—पैसे हवेत—तावड-तोब—शक्य तर तारेने—

बायकोचे सुद्धा असेच. तुम्हाला घरची काळजी आहे की नाही विचारते—त्यांनी पाठ-वलेले पैसे कधीच संपलेले असतात—आता तर गणपुले मास्तरनी सारेच पचवले आहे. डोळ्यांच्या कडा कधी थिजतच नाहीत—कारण, समजायला लागल्यापासून हेच चालले आहे—असेच. दवाचा थेंब झिरपून जातो, आणि मग काहीच उरत नाही—आणि का कोण जाणे, त्यांना कुत्रीची, पिलांची, आठवण होते—नुकती ती आयशीच्या पाठून हिंडा-फिरायला लागली आहेत. त्यांना कुठे पोच-वावीत की नाहीत याचा निर्णय काहीच ठरलेला नाही—पण मनातले म्हणजे, सोबत असल्यासारखी वाटते. खोलीजवळ जाताच कुत्री जवळ आली नाही, की ही खोली आपली नव्हेच असे सुद्धा वाटेल—

शाळेचा दरवाजा बंद करून मास्तर बाहेर पडले, तेव्हा दिवस बराच वर असल्यासारखा वाटत होता—मास्तर रस्त्याला लागले—रस्त्याच्या पलीकडे झाले की घाटी उतरा-यची—मोटार रस्त्यावर आल्यावर एकदम माशा घोंघावल्या—मास्तरनी तिकडे पाहिलं—काळ्या पाढऱ्या कुत्रीच्या मानेवरून मोटारचं चाक गेलेलं दिसत होतं—तिचा केविलवाणा डोळाही दिसत नव्हता...तिच्या उघड्या स्तनाला एवढी एवढी पिलं झोंबत होती—मास्तरना एकदम भडभडून आलं—ते मटकन खाली बसले—अगदी एकाकी. ● ● ●

भारताचे महान् उद्योगपती

**श्री. शंतनुराव किर्लोस्कर**

यांच्या एकसष्ठीनिमित्त आम्ही त्यांचे

सहर्ष अभिनंदन करीत आहोत

व त्यांना

ईश्वराने दीर्घायुरारोग्य द्यावे

अशी प्रार्थना करीत आहोत.


## साखर कारखान्याची उभारणी

साखर कारखान्यास लागणारी
यंत्र सामुग्री, बॉयलर्स यांची जोडणी
व उभारणी तसेच विद्युतीकरणाची
कामे स्वीकारतो व उत्तम
प्रकारें पार पाडतो


# नायक्रोम

मेटल वर्क्स

स्ट्रक्चरल एंजिनिअर्स व रोलिंग शटर्सचे निर्माते

कारखाना : ४६, वेलस्ली रोड
संगमा जवळ, पुणें-१, फोन : २४२८७

Pratibha-63-2

सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सोमेश्वर, जि-पुणें.



# हरी नारायण

लेखक : प्राध्यापक भीमराव कुलकर्णी





स्वप्नरंजन आणि अद्‌भुतता यांच्या वलयातून मराठी कादंबरीची मुक्तता करून तिला वास्तवतेचा पहिला कलात्मक स्पर्श करून देणारा आद्य कादंबरीकार म्हणजे हरिभाऊ आपटे. त्यांची जन्मशताब्दि महाराष्ट्रात सर्वत्र साजरी होत आहे.

हरिभाऊंच्या काळातील ही वास्तवता कोणती, त्या काळचा समाज, पुण्यातील ते 'सदाशिवपेठी' जीवन होते कसे याची काहीशी कल्पना करून देणारे हे ललित रेखाटन.

: १ :

"अरे नारायणा, चागला अंधार पडला तरी अजून पालखी कशी रे येत नाही?" चिमामावशी अधीर होऊन वारवार नानासाहेबांस प्रश्न करीत होत्या. आणि नानासाहेब संतापून जोरजोरात ओरडून आपल्या नोकरास अनेक ठिकाणी पिटाळीत होते.

"तूं अण्णाला पाठवलस ना पालखी आणायला ? मग झालच ! अरे पालखी आणायच तो विसरूनदेखील गेला असेल." एवढं बोलून बगूताईंनी एकदम जीभ चावली.

"होय ग बाई होय..." चिमामावशी आवेगाने आणखी काहीतरी म्हणणार होती पण तेवढ्यात समोर घोडागाडीतून अण्णासाहेब उतरताना दिसले.

"काय रे अण्णा, किती उशीर हा ! एवढ्या पुण्यात तुला साधी पालखीसुद्धा वेळेवर मिळू नये ना ?"

"अग, कोणा उपद्व्यापी लोकानी तिकडे विश्रामबाग व बुधवारवाड्यास आगी लावल्यात ! त्यामुळे मिरवणुकी काढायलाच सरकारनं बंदी केली आहे. रस्त्यारस्त्यावर पोलीस उभे केले आहेत आणि लोकाच्या झुंडीच्या झुंडी आग पाहण्यासाठी लोटताहेत. तेव्हा या झगझगाटात तुझी मिरवणूक कोण पहात बसेल !"

"मेल्या, काय सागतोस काय ? लोकाना ही असली दळभद्री लक्षणं सुचतात तरी कशी ?"

"मावशी, पालखी नाही तर नाही, घोडागाडी तरी मिळाली. तुझी हौस एकदा फिटू द्या म्हणून एका रावसाहेबाची ही बगी मागून आणली."

"आमची कसली म्हातान्याची हौस बाबा ! दोन्हीकडच्या बायका मिरवणुकीसाठी केव्हापासून नटून थटून बसल्यायृत. त्याचा नको विरस व्हायला. चला, घोडागाडी तर घोडागाडी. अग उठा बघू सगळ्या."

आणि मग मिरवणुकीची एकच धादल सुरू झाली. गोखल्यांच्याकडच्या मंडळीचा सुरुवातीला पालखी नाही म्हणून विरस झाला. परंतु मावशीनी त्याची समजूत घातली. बिंदी, पाटल्या, पट्टा, गोठ, तोडे, पेट्या, पुतळ्यांची माळ घातलेली चिमुरडी मथू नटून थटून उभी राहिली. तेव्हा नवऱ्यामुलाचा शोध सुरू झाला.

"अरे तात्या कुठाय ?"

"अरे कोणी त्याच्यावर लक्ष ठेवायच नाही काय ?"

"अण्णा, लहानपणापासून तू लाडावून ठेवलंस ना ! पोरग असं मोठं हूड नि चमत्कारिक बघ. आता या वेळी कुठं उलथलंय कुणास ठाऊक !"

"अग चिमा, थोडं काळ वेळ पाहून बोलावं माणसानं. असेल इथेच कुठेतरी खेळत ! अग घरात शभर ठिकाणची इतकी माणसं जमलेली, त्यात घरात अधार हा असा ! बघा तरी कोपऱ्यात कुठं झोपलाय का ...."

आणि मग धाकट्या हरीची सगळीकडे शोधाशोध सुरू झाली माणस पिटाळण्यांत आली. बराच वेळ शोधाशोध करूनही हरीचा कुठे पत्ता लागेना. करवतकाठी उपरणे पाघरून अण्णासाहेब बगीत बसून रस्त्यारस्त्यावरून त्याला न्याहाळू लागले. एरवी अधारात असलेले सदाशिव-शुक्रवारातले रस्ते विश्रामबागवाड्याच्या आगीने होळीच्या दिवसांची आठवण करून देत होते.

बुधवारवाड्याजवळच्या एका घराला आग लागली होती आणि घर चारी बाजूनी पेटलेले होते. घरातून बायकामुलाच्या कर्कश किंकाळ्या ऐकू येत होत्या. चारी बाजूनी लोकाची मोठी गर्दी जमली होती. परतु आत शिरण्याचे कोणास धाडस होत नव्हते. थोड्याशा लाववर एका अरुंद बोळात उभे राहून हरी त्या उच जाणाऱ्या ज्वाळांकडे अनिमिष नेत्रानी एकटक पहात होता.

शनिवारवाड्याच्या ऐतिहासिक वास्तूला आग आगली, त्या प्रसगाचे शास्त्रीबुवानी वर्गात केलेल्या भावना हेलावणाऱ्या वर्णनाची कथा त्याच्या सोबत्याकडून त्याने ऐकलेली होती. हरी शाळेत दाखल झाला, त्यावेळी शास्त्रीबुवांची बदली रत्नागिरीला झाली होती, परंतु सोबत्यानी सागितलेली ती आठवण त्याच्या अतःकरणावर कायमचा ठसा ठेवून होती.

"अहो, काय प्रचड ज्वाला ! आमच्या चिपळूणकरसरानी पाहिल्या असत्या तर त्याना किती दुःख झालं असतं !"

एका कोपऱ्यांत अंग चोरून उभा असलेला हरी स्वतःशीच बोलत होता. इतक्यात त्याला जवळच कुणीतरी कुणाच्या फाडकन् थोबाडीत मारल्याचा आवाज ऐकू आला. त्याने वळून पाहिले —

"चाडाळणी, शरम नाही वाटत अस कुत्र्यासारखं तोंड बाहेर काढून बघायला ? रात्र नाही, दिवस नाही, सारखी ही देखावा बघायला धावते. हे पहा, ते पहा करायला आता का कुक्कुल बाळ आहेस? आईसारखेच चार घराचे उकिरडे फुकायचे डोहाळे लागले आहेत ? चल, तुला आता कोठीघरात डांबूनच ठेवते म्हणजे बघ अधारात डोळे फाडफाडून काय बघायचं ते."

आणि त्या कर्कश आवाजाबरोबरच पाठीत एकापाठोपाठ मारलेल्या दणक्यांमुळे त्या स्त्रीचे हृदयद्रावक हुंदके ऐकू आले. त्या हुंदक्यांमुळे त्या मारणाऱ्या स्त्रीचा संताप आगीत तेल ओतावे त्याप्रमाणे भडकला आणि ती ओरडली,



**हरीचे अंतकरणच पेटले आणि 'यमू'चा जन्म झाला**

"रड रड रांडे ! तुझ्या नवऱ्याचं प्रेतच बाहेर काढतायत तर रडशील नाही तर काय करशील? या अवदसेचं पाऊल घरात पडल्यापासून घराला नुसती साडेसाती लागली आहे. मरत का नाहीस म्हणजे तरी सुटले असते! रोज शंभर खेटरांनी झोडपावी आणि एक म्हणावं अशी लक्षणं–"

त्या स्त्रीचे पुढचे शब्द ऐकायला हरीला फारसा अवसर नव्हता, कारण समोरच्या पेटलेल्या घराच्या प्रचंड ज्वाला क्षणोक्षणी उंचावत होत्या आणि आतून येणाऱ्या किंकाळ्या अंतःकरणाचा थरकाप वाढवीत होत्या. कुतूहलाने रस्त्यावर आलेला हरी गर्दीमुळे हळूहळू पुढे सरकत होता आणि त्याच्या आसपास गर्दीचा रेटा वाढतच होता.

इतक्यात एक तरुण तीरासारखा आगीत घुसला! लोक, 'अरे, आगीत कोणीतरी शिरलंय!' असे आपापसांत कुजबुजू लागले. हरी बराच पुढे सरकला आणि भयमिश्रित कुतूहलाने पुढे काय होणार ते टक लावून पाहू लागला.

त्या तरुणाने एकापाठोपाठ घरातील तीन–चार माणसं मोठ्या शर्थीने बाहेर काढली; परंतु कुठून तरी आतल्या भागातून एका स्त्रीच्या करुण किंकाळ्या अद्याप येत होत्या. ज्वालांनी संपूर्ण वेढलेल्या त्या घरात आता शिरावे कसे या विचारात तो तरुण उभा होता. तेवढ्यात बाहेर ओढून काढलेल्यांपैकी एक प्रौढ स्त्री म्हणाली,

"बाबा, नको आता तुझा जीव धोक्यात घालूस रे! आता त्या घरात ती पांढऱ्या पायाची अवदसाच काय ती राहिलीय!"

"कोण यमू?"

"तिचं ते अभद्र तोंड बघण्यासाठी तुझा सोन्यासारखा जीव का धोक्यात घालायचा?"

आणि त्या उद्गारासरशी तो तरुण तिथेच थांबला.

"अहो, मला कुणीतरी वाचवा हो!" आतून किंकाळी ऐकू आली. परंतु पुढे कोणीच जाईना. आपण त्या आगीत शिरावे आणि त्या तरुण विधवेस बाहेर काढावे असा प्रबळ विचार हरीच्या मनात येऊन गेला. परंतु त्या आगीच्या प्रचंड लोळांकडे पाहून त्याला पुढे पाऊल टाकण्याचे धैर्य होईना. इतक्यात त्याचा सदरा धरून कोणीतरी त्याला मागे खेचले.

"हरी, काय करतो आहेस इथे?" चुलत्यांचा आवाज आला आणि हरीची तंद्री भंग पावली.

बगीत बसला तरी हरी त्या आगीकडेच पाहात होता. अण्णांना तर घरी जायची घाई झाली होती.

"अण्णा, काय भयंकर हो ही आग? तुम्ही मला परवा ती इंग्रजी कादंबरी आणून दिली होती ना, त्यातल्या आगीचं वर्णन मी वाचलं होतं. पण ही आग पाहून मला वाटतं की त्या लेखकानं अशी प्रचंड आग जन्मात पाहिली नसावी!"

"अरे बाबा, तू नाहीसा झालास म्हणून तिकडे घरात हाहाःकार माजलाय आणि तू इकडे आगीची मजा पाहातोयस!"

हरीच्या मनातून मात्र ती आग क्षणोक्षणी आभाळाला भिडू पाहात होती आणि दुरून कुठून तरी सारखे अस्पष्ट हुंदके ऐकू येत होते. त्याच्या अंगावर अंतःकरणाचा थरकाप उडविणाऱ्या हुंदक्यांच्या आवाजाने दरदरून काटे फुलले होते.

* * *

## : २ :

घोडागाडीतून अखेर हरीच्या लग्नाची मिरवणूक निघाली. मिरवणुकीसाठी आतुर होऊन, दागिन्यांनी नटलेल्या आणि बराच वेळ ताटकळत बसलेल्या गोखले–आपटे घराण्यांतील बायका–पोरींची त्यामुळे चांगलीच निराशा झाली. मिरवणुकीसाठी शंभर गॅसबत्त्या अण्णासाहेबांनी सांगून ठेवल्या होत्या. परंतु आयत्या वेळी सगळ्यावर पाणी पडले होते. माधवरावांनी शेवटी कशीबशी एक गॅसबत्ती मिळवली. त्या मिणमिणत्या गॅसबत्तीच्या प्रकाशात मिरवणूक बाहेर पडली. वाजंत्रीचीही गॅसबत्तीप्रमाणेच गत झाली होती. बुधवारातला एकुलता एक बँडवाला यायला तयार नव्हता आणि शेवटी कडकडणारा एक ताशा आणि त्याला क्षीण आवाजात साथ देणारी एक सनई एवढीच काय ती वाद्ये मिळाली.

एरवी या दिवशी रात्रीच्या वेळी मिरवणूक निघाली म्हणजे गल्ल्याबोळांतून आपल्या दिंडचा उघडून बायकामंडळी आपण न दिसू अशा रीतीने उभ्या राहून वधूवरांना न्याहाळीत, परंतु आज लोकांच्या झुंडी आगीच्या ठिकाणी लोटत होत्या आणि त्याचीच चर्चा करीत परतत होत्या. शनिवार, बुधवार, सदाशिवातील रस्त्यांना एखाद्या जत्रेचे स्वरूप आले होते.

मिरवणुकीत मात्र हरीच्या बरोबरीची शाळेतील बरीच मुले आली होती. त्या मानाने हरीचे लग्न थोडे उशीराच होत होते. हरीला त्याच्या चुलत्यांनी पन्नास रुपयांची पुस्तके मुंबईहून आणून देण्याचे कबूल केले

होते आणि या पन्नास रुपयात किती पुस्तके येतील याचा विचार करण्यात या वेळी तो दग झाला होता. जवळून चाललेल्या नाना पानश्याने हरीला विचारले–

"अरे आपटे, होळीच्या दिवशी नवीन कविता चागल्या कोण करतो याची स्पर्धा लावायच आपण ठरवलय ते लक्षात आहे ना?"

हरी आपल्या मित्राला काही सांगण्यासाठी पुढे वाकला. परतु नानासाहेबानी–त्याच्या वडिलानी त्याला दटावले म्हणून गभीर मुद्रा करून तो पुन: मागे सरला.

मिरवणूक कूर्मगतीने पुढे सरकत असताना हरी निराळीच दृश्ये पाहात होता–

गेल्या वर्षी हरी मुबई सोडून पुण्याला आला तेव्हा सरकारी शाळेत नाव घातल्यानंतर नाना पानसे, दत्तु जोशी, वासू जोशी, दत्ता कुलकर्णी याच्याशी त्याची चागलीच गट्टी जमली.

होळीच्या दिवसांत आपल्या मावशीची नजर चुकवून हरी घरातून सटकत असे आणि मित्रावरोबर गल्ल्याबोळांतून हिंडत असे.

पहिल्या दिवशी मुलाच्या तोंडच्या अचकट विचकट शिव्या ऐकून त्याच्या अगावर काटा आला होता आणि तो कावराबावरा झाला होता.

"काय रे, काय झालं काय ?' मित्राने विचारले.

"अरे, काय भयकर बोलतात ही पोरं ?' हरी शहारून म्हणाला.

"ए आपटे, हे तर काहीच नव्हे ! आपण उद्या गटारयत्रावर जाऊ या. तिथे आपल्याला खरी मजा पाहायला मिळेल. " मित्र म्हणाला.

"गटारयत्र ? हा काय प्रकार ?" हरीने विचारले.

" अरे बघ तरी एकदा. " मित्र जास्त खोलात न शिरता म्हणाला.

आणि दुसऱ्याच दिवशी हरी नानाबरोबर बुधवारात गटारयत्रावर सध्याकाळच्या सुमारास गेला. बापरे ! काय भयंकर प्रकार तिथले !

बुधवारातल्या मोठमोठ्या दुकानांसमोर माणसाचे अड्डे जमले होते आणि त्यानी अचकट विचकट बोलून साऱ्या गावाची टवाळी उडविण्याचा सपाटा लावला होता. गावातल्या चांगल्या चागल्याची नावे काव्यात गोवून शखध्वनी करण्याच्या स्पर्धा चालल्या होत्या. अशा उत्स्फूर्त काव्याला तिथे बहर येत होता.

एका अड्ड्यावर सुधारकाची टवाळी चढाओढीने चालली होती. पुण्यातील यच्चयावत सुधारकांचा नावनिशीवार उद्धार करण्यात येत होता–

नजरेसमोरून हा प्रसग रुळावरून धावणाऱ्या घोडागाडीसारखा सरकत असताना हरीला आपल्या मुबईच्या चुलत्याची आठवण झाली...

तो त्या वेळी लहान होता तरी दिवाणखान्यातले 'इंदुप्रकाश' व 'ज्ञानप्रकाश' वाचण्यासाठी धडपडत असे. माधवराव आपटे म्हणजे केवढा रुबाब, केवढा दरारा ! मुंबई हायकोर्टात ते वकिली करू लागले तेव्हा खोऱ्याने पैसा ओढू लागले होते. कोर्टातून परत आले म्हणजे मुबईतील बडीबडी मंडळी त्याच्याबरोबर असत. हातातील वर्तमानपत्रे वाचून सपली म्हणजे हरी कधीकधी त्याचे बोलणे लक्ष देऊन ऐकत बसे. एके दिवशी कोर्टातून आपल्या मित्राबरोबर ते बोलत बोलत आले ते संतापानेच.

" या माधवराव रानड्यानी हे काय केलय ते समजत नाही ! मोठमोठ्या गोष्टी ते बोलत होते—पहिली बायको निवर्तल्यावर आपण पुरुषानी एखाद्या विधवेशी पुर्नविवाह केला पाहिजे ! बोलण सोपं असत ! स्वत वर पाळी आली तेव्हा कुमारिकेशी लग्न लावून मोकळे झाले ! "

" अहो, पण आपण त्याच्या वडिलाचा विचार नको का करायला ? "

" म्हणजे आईवडील काय ते यानाच आहेत वाटत ! पुर्नविवाह करणाऱ्यानी आईवडिलाना मसणात घालूनच बोहल्यावर चढल पाहिजे म्हणा ना ! "

" तसं नाही हो ! "

" ते काही नाही. माणसाच्या चालण्या-बोलण्यात तफावत पडता कामा नये. माधवराव रानड्याच्या बाबतीत जर हा प्रकार तर मग इतराच काय ? "

" रावसाहेब, तुमच्यावर हा प्रसग ओढवला असता तर तुम्ही काय केलं असतत ? "

" कालत्रयीही माझ्या हातून अशी गोष्ट घडणार नाही. आमच्या आपटे घराण्यात असला लेचापेचा पुरुष यापुढे निपजणार नाही. " हा निर्वाळा देताना अण्णासाहेब हरीला जवळ घेऊन प्रेमाने त्याला कुरवाळत होते.

अण्णासाहेबाचा तो लाडिक स्पर्श आठवून हरी मनोमन सुखावला. परंतु चुलत्याच्या या आठवणीपाठोपाठ त्याच्या डोळ्यासमोर जिनसीवाले सराचा क्रुद्ध चेहरा उभा राहिला.

त्या दिवशी जिनसीवाले सर हातात सोडगा घेऊन वर्गात आले आणि पुस्तक न उघडता त्यांनी एकदम प्रश्नच विचारायला सुरुवात केली !

" हा लोकहितवाद्या म्हणजे महागाढव आहे. हा प्राणी म्हणजे नेमका कोण हे कोणाला ठाऊक आहे का रे ? "

प्रत्येक विद्यार्थ्याकडे सोडगा रोखून त्यानी हाच प्रश्न विचारायचा सपाटा लावला. पोरे चळचळा कापू लागली. पानश्या, दत्तू जोशी याच्या तर चड्ड्या पिवळ्या व्हायची वेळ आली.

" सर, मी सागतो. ' हरीने धीटपणे उभे राहून सागितले. सराचा चेहरा आणखीनच विघडला.

" लोकहितवाद्या नव्हे ! लोकहितवादी. त्याचं नाव सरदार गोपाळ हरी देशमुख. " हरी उत्तरला.

" तुला कस कळलं ? "

" त्याचं एक मोठ निबंधाचं पुस्तक आहे. ते माझ्या मुबईच्या काकानी मला वाचायला दिलं होतं."

" काय वाचलत त्याच्यात ? कपाळ ! बसा खाली. हा लोकहितवाद्या म्हणतो की आम्हाला ग्रहणं कशी होतात ते ठाऊक नाही. आम्ही म्हणे शुद्ध टोणगे, नंदीबैल ! इंग्रज हा त्याला आकाशातल्या बापासारखा वाटतोय ! त्याला कोणीतरी सागितल पाहिजे की बाबारे, ग्रहणाच काय घेऊन बसलास ? ज्ञानेश्वरानी रेड्याच्या तोंडून वेद वदवले ! आणि हा महामूर्ख माणूस म्हणतो की आम्हाला ग्रहण कशी लागतात ते माहीत नाही ! "

जिनसीवाल्याचा तो कुचेष्टेचा स्वर हरीला बगीच्या बाकाच्या खडखडाटातूनही स्पष्टपणे ऐकू येत होता. जिनसीवाल्याचा चेहरा हळू

हळू मागे पडला आणि चिपळूणकर सरांची ऐकलेली एक गंमत त्याला आठवली—

कुणीतरी एकदा वर्गात चिपळूणकर सरांना म्हटले,

"सर, तुम्ही सुधारकांच्या चहा-बिस्कुटांची टवाळी करता आणि तुम्ही स्वतः चहा पिता हे कसं काय ?"

"म्हणजे चहा पिणं ही खाविंदचरणी मिलिंदायमान सुधारकांचीच मिरासदारी आहे होय रे ?"

"मग कुणाची ?"

"सुधारकांपूर्वी कित्येक शतके अगोदर टीपार्टी देण्यात वामन पंडित प्रख्यात होता हे तुला माहीत नाही वाटतं ?"

सगळा वर्ग बुचकळ्यात पडला. वामन पंडित आणि टीपार्टी ? ही कसली पार्टी ?

शास्त्रीबुवा हसत हसत म्हणाले, "अरे ही बघ वामन पंडितांची टी पार्टी–"

वंशी नादनटी तिला कटितटी खोवोनि पोटीपटी
कक्षे वामपुटी स्वशृंग निकटी वेताटि ही गोमटी
जेवीं नीरतटी तरूतळवटी श्रीशामदेही उटी
दाटी व्योमघटी सुरां सुख लुटी घेती जटी धूर्जटी।

देऊळ जवळ आले आणि देवीच्या पाया पडण्यासाठी त्याला खाली उतरावे लागले.

गाभाऱ्यात देवीसमोर ते जोडप्याने खाली वाकणार इतक्यात त्याच्या कानाला लागून पानसे म्हणाला, "अरे आपटे, चिपळूणकर सर रत्नागिरीहून रजेवर आले आहेत !"

हरी पानसेशी बोलणार होता परंतु तेवढ्यात मागून आवाज आला. "अरे काय कुजबुज चालली आहे रे ? तात्या देवीच्या पाया नाही का पडायचं ? ती मथू खोळंबून राहिली आहे."

हरीने नाखुषीनेच देवापुढे हात जोडले आणि न राहवून पानशाला हळूच विचारले,

"मग ?"

"मी त्यांच्याकडे काल गेलो होतो. पुढल्या वर्षापासून ते स्वतःच शाळा काढणार आहेत असं म्हणाले !"

"खरं ?"

"अगदी खरं ! गळ्याशपथ ! !"

देवळासमोर आल्यानंतर मथू गाडीत चढण्याअगोदर हरीच घाई-घाईने आत चढून बसला. चिपळूणकरांची नवी शाळा कशी असेल ? त्या शाळेत जाता येईल का ? या विचारात तो आता गर्क होता.

"तात्या, मथूला अगोदर चढू द्यायचं नाही का ?" कोण्यातरी प्रौढ स्त्रीने त्याची तंद्री मोडली आणि त्याचे खाली मान घालून उभ्या असलेल्या मथूकडे लक्ष गेले. तेवढ्यात आण्णासाहेबांनी तिला उचलून अलगद त्याच्या शेजारी बसविले तेव्हा त्याची न् तिची नजरानजर झाली. एवढ्या वयातही मथू लाजेने खाली पाहू लागली. हरीला तिच्या वागण्याची गंमतच वाटली. "लहानपणी किती चुरुचुरु बोलायची ही मथू !" तो मनाशीच म्हणाला.

हरी पाचसहा वर्षांचा होता तेव्हा आपल्या पार्वतीकाकूबरोबर तो एकदा पुण्याला आला होता. पुण्याला जाताना आगगाडीत बसायला मिळाल्यामुळे तो अतिशय खुशीत होता.



"हा नोऽला छान आहे ! —"

पुण्याच्या मुक्कामात पार्वतीकाकू हरीला घेऊन गोखल्यांकडे गेल्या होत्या. गोखल्यांच्या राधाबाईंची व त्यांची लहानपणापासून ओळख होती. राधाबाईंची मथू त्या वेळी असेल दोन तीन वर्षांची. थोडे थोडे बोलू लागली होती. त्या मुलीला उचलून आपल्या जवळ घ्यावे, या विचारात हरी होता ! इतक्यात त्या मुलीच्या मुग्ध मुखातून 'आई, ' हा नोला छाऽऽन् आहे– " हे शब्द बाहेर पडले आणि ते उच्चारताना आपले दोन्ही हात तिने पाठीमागे कमरेवर एकात एक घालून, सरळपणे हरीकडे मोठ्या ऐटीत पाहिले. आई आता काय निकाल करील तो चटकन् समजला पाहिजे म्हणून आपल्या आईकडे आतुरतेने ती चिमुरडी पाहात उभी राहिली.

या तिच्या बोलण्याने हरी असा काही लाजला ! तो अगदी पळून जाण्याच्या बेतात होता. अगदी पायमुद्धा उचलला होता, इतक्यात तिची आई म्हणाली,

"मथे, अगोबाई ! तुला हा नवरा हवा का ? आपला गणू ठरलाय की बुगताबाई...!"

"तो वाईत्त आहे. मला चावतो. तो नतो.' या तिच्या उत्तराने तर हरीला हसूच आले. तिची आई मग हसत म्हणाली,

"अग लबाडे, तुला आता चांगलं वाईट कळायला लागलं का ? पण त्याला नाही असली ही झांबरी बायको आवडत ! केस काय विखुरले आहेत आणि अंग काय मळवलं आहे !" इतके म्हणत प्रेमाने त्यांनी मथूला जवळ घेऊन तिच्या चिमण्या गालाचा मुका घेऊन आणि गाल कुरवाळीत म्हटले,

"त्याला कशाला हवी आहे ही वेडी मुलगी ! त्याला मुळीच नकोस तू..."

पार्वतीकाकू आणि राधाबाई जोरजोरात हसू लागल्या आणि राधा-बाईंनी एक लहानसा लाडू घातलेली वाटी हरीपुढे केली; तेव्हा मथू

पुढे होऊन पुन: म्हणाली,

"नोल्या खा ना!" मथूने तर त्याचे 'नोला' हे नावच पक्के करून टाकले होते. यावर राधाबाई पार्वतीकाकूकडे वळून म्हणाल्या, "पार्वतीबाई, पाहून ठेवा हो, आमची मथी स्वयंवरच करायला बसली आहे."

हाच प्रसंग मथूलाही आठवतोय का हे पाहण्यासाठी त्याने तिच्याकडे चोरून पाहिले, परंतु झोपेमुळे तिचे डोळे जड झाले होते आणि तेवढ्या लहानपणची आठवण तिच्या लक्षात राहण्याची शक्यता नव्हती. तिच्या निष्पाप मुग्ध व शालीन चेहऱ्याकडे निरखून पाहताना तिच्याबद्दल उत्कट जिव्हाळा व प्रेम हरीच्या मनात निर्माण झाले. आज प्रत्यक्ष लग्नाच्या वेळी हरीची काकीही जिवंत नव्हती व मथूची आईही!

मिरवणूक घरी येताच जोडप्याने सगळ्या जणांच्या पाया पडण्याच्या प्रसंगाला सुरुवात झाली. मथू घोडागाडीतच पेंगायला लागली होती. जोडप्याने हरी आपल्या आजीच्या पाया पडायला गेला तेव्हा तिने आवेगाने त्याला पोटाशी धरले आणि ती जोरजोराने हुंदके देऊ लागली. नाही तरी दोन-तीन दिवस ती आपल्या दोन्ही सुनांच्या आठवणीने सारा दिवस डोळे पाणावीत होती.

"बाळा, लक्ष्मी असती तर तिला आज किती आनंद झाला असता रे! निदान पार्वती तरी असायला हवी होती रे!"

"बगूताई, आता किती बरं शोक करायचा तो माणसानं! मोठ्या सुनेच्या तीन मुलांत हा हरी तेवढा हाती लागला. दुसऱ्या सुनेनं त्याला मोठा केला. वाढवला. परंतु दोघींच्या नशिबी या पोराच्या मुंडावळ्या पाहण्याचं नव्हतं! त्या दोघींना जिवंत ठेवून आम्हा म्हाताऱ्यांना परमेश्वरानं उचलून नेलं असतं तर बिघडलं का असतं? पण बगू, त्याच्या मनात ते नव्हतं!" चिमामावशी बगूताईचं परोरीन सांत्वन करू लागल्या. मथूच्या आजीने हरीच्या आजीला म्हटले—

"बगूताई, ह्या आईवेगळ्या पोरीला मी तळहातावरील फोडाप्रमाण जपलय! आता तुमच्या ओटीत घातलीय! सांभाळा हो!" तिने हुंदका दिला तेव्हा सगळ्यांच्या डोळ्याला पाणी आले. "मथूच्या आजी, तुमची मथू काही फार परक्या घरची सून झाली नाही. तुम्ही काळजी नका करू."

चिमामावशींनी आश्वासन दिले. हळूहळू एकेक मंडळी पांगू लागली. सगळी माणसे लग्नघरात इकडेतिकडे लवंडली, तसा हरीसुद्धा आपल्या आजीसमोर जाऊन पडला. परंतु बराच वेळ त्याचा डोळ्याला डोळा काही लागेना.

त्याला त्याची चुलती पार्वतीकाकू आठवत होती. आई म्हणजे काय, हे समजायला लागल्यापासून तिने आईपेक्षाही जास्त लळा लावला होता. कितीही आठवण्याचा प्रयत्न करूनही त्याला आपल्या आईचा अंधुक चेहरा किंवा तिच्याबद्दलची पुसटशी स्मृतीदेखील मनात कोठे जाणवत नव्हती.

—त्याच्या चुलतीचे—पार्वतीकाकूचे मुंबईतील शेवटचे दिवस त्याला आठवत होते. शेवटच्या दिवसांत ती सारखी तापाने आजारी असावयाची आणि तिच्या मांडीवर तो बसायला गेला की, कोणी ना कोणी येऊन त्याला खाऊचे आमिष दाखवून तिच्या मांडीवरून उचलून नेत असे. एका दिवशी तर डॉक्टर दिवसातून दहादा येऊन गेले. त्या दिवसाचा ताप काही विलक्षणच होता. ताप अंगातून अजीबात निघालासा वाटे आणि तास अर्धा तास झाला नाही, तोच पुन्हा सडकून भरे. हरीला तिच्याजवळ जाऊ न देण्याची प्रत्येकजण काळजी घेत होता, परंतु हरी हट्टाने तिच्याजवळ जाऊन बसे. त्या दिवशी रात्री तर सगळीजण तिच्याच खोलीत जागत बसली होती काकूचा अमळ डोळा लागलासा वाटत होता इतक्यात अंथरुणावर एकदम ती उठून बसली आणि मोठ्याने म्हणाली,

"अहो, अहो एकदा शेवटचे माझ्याजवळ येता का? मी काही उद्या सकाळपर्यंत काही खचित राहात नाही."

"पार्वती, असं का अभद्र बोलायचं ते!" आजी म्हणाली. एवढ्यात आण्णासाहेब जवळ आले आणि तिच्या डोक्याला हात लावून विचारले,

"का, कशाला हाक मारलीस?"

परंतु काकूंना बसविले नाही. एकदम मूर्च्छा येऊन ती अंथरुणावर कोसळली.

आजीने, चिमामावशींनी व अण्णासाहेबांनी तिला खूप हालवून पाहिले, परंतु काही हालचाल नाही म्हणून सर्वांना रडू कोसळले. हरी तर 'काकू, काकू' करीत सद्गदित होऊन सारख्या हाका मारीत होता, तेवढ्यात चिमामावशींनी सगळ्यांना धीर देऊन सुंठ उगाळून तिचा वळसा काकूच्या डोळ्यांतून फिरविला, त्याबरोबर मोठा सुस्कारा टाकून ती जागी झाली. आजूबाजूला सगळी मंडळी जमली असून अण्णासाहेब जवळ बसलेले पाहून त्याहि परिस्थितीत तिला संकोचल्यासारखे झाले. कण्हत कण्हत तिने डोळे उघडले आणि अण्णासाहेबांना म्हणाली,—

"हरीला अंतर देऊ नका. त्याच्या आईलाऽऽ मी ... वचन दिलं आहे."

पुढे तिला बोलवले नाही आणि तेवढ्याच बोलण्याने तिला जाग आली. पुन्हा ताप वाढला आणि वातामध्ये ती सारखी विचूक बोलू लागली.

डॉक्टर आले आणि त्यांनी अण्णासाहेबांखेरीज सगळ्यांना खोलीबाहेर काढले. त्या तसल्या रात्री हरीची आत्या त्याला खांद्यावर घेऊन थोपटू लागली. हरी सारखा 'काकूकडे जायचं आहे' म्हणून जोरजोराने ओरडत होता; रडून रडून तो आतेच्या खांद्यावर झोपी गेला

दुसऱ्या दिवशी सकाळी हरीला थोडी उशीराच जाग आली. उठल्यावर तो पळतच काकूच्या खोलीत गेला. तेथे अंथरुण-बिथरुण नव्हते. त्या जागी सारवून त्यावर दिवा ठेवलेला होता. तो सगळीकडे 'काकू काकू' करीत हिंडू लागला. ते त्याचे दीनवाणे हिंडणे पाहून साऱ्यांना भडभडून आले. आजी आपली अंग टाकून रडत पडली होती. अधूनमधून 'बाई गेली का ग मला टाकून? मला का नाही मरण आलं?' म्हणून सूर काढीत होती. 'काकू, काकू' करीत चारी बाजूनी हिंडल्यानंतर काकू कोठेच दिसेना म्हणून हरी रडत रडत अण्णासाहेबांकडे गेला आणि त्याच्या गळ्याला मिठी मारून 'अण्णा, काकू कुठे गेली हो?' म्हणून तो देखील रडू लागला. त्याबरोबर इतका वेळ दाबून धरलेला आवेग असह्य होऊन अण्णासाहेबही लहान मुलासारखे रडू लागले. आपल्या बायकोच्या मरणाने अण्णासाहेबांना इतके दुःख होईल, असे कोणाला वाटले नव्हते, परंतु त्यांची फारच

दुर्दशा झाली. त्यानी पटकन् हरीला जवळ घेऊन त्याला पोटाशी धरले.

काका धाकटया हरीला म्हणाले,—

"हरी, आता तू इथेच राहा रे! मला सोडून कुठे जाऊ नकोस!!"

सुरुवातीला काही दिवस काका खिन्नपणाने खुर्चीत हरीला माडी-वर घेऊन बसून राहात परंतु एक दिवस आजी त्याना म्हणाली,

"अरे माधव, किती बरं झाल्या गोष्टीचं दुःख करायचं?"

काका काहीच बोलले नाहीत.

"अरे, आपल्या नात्यातली एक लाखची मुलगी..."

"आई!" काका एकदम जोरात ओरडले, "या घरात माझ्या दुसऱ्या लग्नाचं चुकून नाव सुद्धा काढू नकोस."

"मग काय तू असाच राहणार? अरे अजून तुझं लग्नाचं वय गेलं नाही रे. आपल्या धर्मात......"

"आई, मी तुला एकदा सांगितलं ना ...?"

मग आजी मुकाटयाने गप्प राहिली.

काही दिवसानंतर हरी सहज एकदा काकाच्या दिवाणखान्यात गेला असता त्याला एक बाटली दिसली. हरीला पाहताच काकांनी घाईघाईने ती बाटली उचलली आणि कपाटात ठेवून दिली.

काकांच्या तोंडाला कसला तरी उग्र चमत्कारिक वास येतो आहे याची जाणीव हरीला झाली आणि त्याचे डोळेही त्याला तांबडे लाल दिसले.

पहिल्या प्रथमच त्या दिवशी हरीला आपल्या काकांची भीती वाटली.

थोडया दिवसांनी काकांनी घरी एक तरुण ब्राह्मण बाई आणली. त्यांच्या बायकोची सगळी घरकामे ती करू लागली. हरीची आजी एक दिवस कातावली—

"माधवा, काय चालविलं आहेस रे हे! देवा, यापेक्षा माझे डोळे का रे झाकले नाहीस बाबा!" तिने आपले डोके भिंतीवर आपटण्यास सुरुवात केली.

"आई, काय ग? कसला वेडेपणा हा!" काकानी विचारले.

"माधवा, तुला हा प्रश्न विचारायला तरी लाज नाही का वाटत?"

'आई, ही बाई ब्राह्मणाची आहे. तिच्या हातून काही आगळीक घडली तर कमरेत लाथ घालीन..."

"त्यापेक्षा तू दुसरं लग्न का नाही करीत?"

"आई, मी तुला एकदाच सांगितलं आहे. तुला माझं घर पसंत नसेल तर तू आपली नारायणाकडे जा पाहू? तिथल्या गोतावळयातच तुला बरं वाटत असल्यास माझा नाइलाज आहे."

दुसऱ्या दिवशी हरीचे वडील आले आणि त्यानी हरी व त्याची आजी ह्याना घराबाहेर हाका मारून परस्पर आपल्याकडे नेले. घरी नेल्यावर त्यानी पहिल्याप्रथमच हरीला सक्त ताकीद दिली—

"हरी, आजपासून अण्णाकड जायचं नाही. गेलास तर तगडी मोडून हातात देईन बघ.—"

—वडिलानी सक्त ताकीद दिली तरी आपल्या अण्णासाहेबाकडे जाण्यासाठी तात्या नेहमीच उत्सुक असे. निराळे झाले तरी अण्णा-साहेब एक दिवसाआड हरीला आपल्याबरोबर घेऊन जात. फिरतीहून आल्यानंतर नारायणरावाना ही गोष्ट समजली तेव्हा ते संतापाने तांबडेलाल झाले. देवपूजा करण्यासाठी ते बसले तरी सबध तासभर ते अण्णाना नाही नाही ते शिव्या देत होते. त्याचे जोरजोराने शिव्या देण चालू होते. इतक्यात हरी तिकडून आला. त्याच्या आजीने त्याला खुणेनेच दुसरीकडे बोलाविले आणि हरी जिन्याच्या अधाऱ्या दर-वाज्यामागे कापत उभा राहिला.

देवपूजा झाली आणि हरीचे वडील अण्णाकडे जावयास निघाले.

"त्या मूर्खाची चांगलीच हजेरी घेतो." डोक्यावर पगडी ठेवता ठेवता ते म्हणाले.

"अरे पण नारायण, जेवायचं नाही का?" आजी म्हणाली,

"जेवणबिवण काही नको!" ते तसेच बाहेर पडू लागले.

परंतु चिमामावशी पुढे झाल्या आणि त्यानी त्याची समजूत घातली. जेवता जेवता नानासाहेब बरेच थड झाले.

"आई, या अण्णाबद्दल किती आशा बाळगत होतो ग मी!"

"बाबारे, या डोळयानी काय काय पाहायचं परमेश्वरान वाढून ठेवलंय, ते सगळं भोगलंच पाहिजे बाबा!"

"अग त्याचा तो पडेना का खड्डयात! परतु या हरीला का घेऊन जातोय तिकडे अधूनमधून?"

"अरे, त्याचं या पोरावर भारी प्रेम आहे रे! त्याला चैन नाही पडत बघ त्याच्याशिवाय, आणि तात्यालाही त्याचा फार लळा आहे रे!"

"आई, मला त्याच दुःख समजत ग! परंतु मी तरी काय करू? या लहान मुलावर त्याच्या या वागणुकीचा काय परिणाम घडेल याचा नको विचार करायला?"

- "तेही खरंच!"

"आणि मला तर कोणालाही विनाकारण दुखविण जिवावर येत. मी संतापतो परतु माझं मलाच खूप वाईट वाटत."

"होय रे बाबा, तू आपल्या शिक्षणावर लाथ मारून ससाराची जबाबदारी आपल्या अगावर घेतलीस म्हणून आज इतकीजण सुखानं चार घास खाताहेत. हा अण्णा..."

"पण आई, मी म्हणतो, दररोज विनाकारण आपण अस मनस्ताप करून घेण्यापेक्षा तुम्ही सगळे पुण्याला जाऊन राहिला तर!"

"मीही तेच म्हणणार होत्ये. नाहीतर तू आपला नेहमी फिरतीवर असायचास आणि इथल्यापेक्षा पुण्याला खर्चही कमी येईल म्हणत्ये!" चिमाताई मध्येच बोलल्या.

आणि दुसऱ्या दिवशी सगळे सामान एका रेकल्यात टाकून स्टेशनवर जाण्याची तयारी सुरू झाली. सगळे सामान आवरून भला थोरला फिरकीचा ताब्या हाती घेऊन निघण्याच्या तयारीने चिमामावशी उभ्या राहिल्या, इतक्यात अण्णासाहेबाची स्वारी तेथे हजर झाली. कुठून त्याना सर्वजण निघाल्याची बातमी लागली न कळे!

"अरे हे काय? सगळे चाललात कुठं?" त्यानी आश्चर्याने विचारले. सगळी स्तब्धच राहिली. बगूताईला राहावले नाही.

"अण्णा, हा सगळा तुझा प्रताप बर!" आणि त्या डोळयाना पदर लावून स्फूदू लागल्या, हरी आणि चिमामावशीही रडू लागली.

अण्णासाहेबाना सगळा प्रकार लक्षात यावयास वेळ लागला नाही. विषादाने आणि दुःखाने त्याचे अतःकरण भरून आले, नाइलाजास्तव शेवटी ते हरीला म्हणाले, "चल हरी, तुला घोडयाच्या ट्रामवरून स्टेशनवर पोचवतो."

काळबादेवीजवळ ते हरीला घेऊन उतरले आणि एका पुस्तकाच्या दुकानात नेऊन काही संस्कृत व इंग्रजी पुस्तके त्यानी विकत घेऊन हरीला दिली.

" हरी, अधूनमधून अण्णाना भेटायला मुंबईला यायच बरं का !" स्टेशनवर गाडीत बसल्यानंतर त्यानी त्याला सांगितले. हरीला भरून आले होते. तो मानेनेच 'होय' म्हणत होता. शेवटी गाडीची शिटी झाली आणि गाडी निघाली. उपरणे डोळ्याला लावीत अण्णानी हरीचा निरोप घेतला होता. आठवणीची साखळी मग खळकन तुटली आणि आजीच्या पुढ्यातच हरी गाढ झोपी गेला.

**: ३ :**

" अरे आपटे इकडे ये ! " चिपळूणकर सराची हाक हरीच्या कानावर आली.

" काय सर ? "

" तुझं हस्ताक्षर कस आहे ? "

" साधारणच आहे. "

" मग अस कर, वर्गात हस्ताक्षर चांगलं असलेल्या एका मुलाकडून एका मोठ्या पुठ्ठ्यावर ही अक्षर काळ्या शाईन लिहून घे !" चिपळूणकरसरानी एक कागदाचा कपटा हरीच्या हातात दिला आणि ते निघून गेले.

त्यावर लिहिले होते " आर्यभूषण छापखाना "

' म्हणजे कालच्या छापखान्याचं नाव आर्यभूषण तर ! वा, खास चिपळूणकरी नाव आहे खर ! ' हरी स्वत:शीच म्हणाला आणि त्याने वर्गात जाऊन तीन चार मुलाना ते काम करण्यास सांगितले.

दोनच दिवसापूर्वी हरी मोरोबादादाच्या वाड्यासमोरून चालला होता, तेव्हा शेजारच्या गल्लीतून टिळक, आगरकर आणि नामजोशी हे त्याच्या शाळेतील शिक्षक कसल्या तरी पेट्या वाहून आणीत होते. हरी पळतच गेला आणि त्याने नामजोशीसराच्या जवळची पेटी आपल्या डोक्यावर घेतली.

"अरे नको, मी आणतो !" ते म्हणाले, परंतु हरीने ऐकले नाही.

इतर शिक्षकापेक्षा नामजोशी सर हरीला अधिक जवळचे वाटत, कारण ते 'किरण' नावाचे साप्ताहिक चालवीत आणि आठवड्यातून एकदा वेळ पडल्यास स्वतःच घरोघर नेऊन अंक टाकून येत. दर शनिवारी आपले पत्र ते घेऊन आले की, सोमवारी शाळेमध्ये आल्यानतर ते हरीला न चुकता विचारीत,

" काय हरी, कसा काय वाटला कालचा लेख !'

' किरण ' हे अगदी छोटेसे पत्र होते आणि त्यातला मजकूर सगळा नामजोशीच लिहीत. त्याच्या एका जुनाट कोंदट खोलीत बारकासा छापखाना होता. आणि जरूर पडल्यास ते स्वत.च खिळे जुळवीत बसत.

सरकारी शाळेत असताना हरी एकदा आपल्या मित्राच्याबरोबर त्यांच्या छापखान्यातून डोकावून आला होता. त्यावेळी नामजोशी म्हणाले होते,

' काय रे, तुमच्यापैकी कुणाला काही लिहिता येत का ? " सगळ्यानी नाही म्हणून माना डोलावल्या, तेव्हा हरीला वाटले होते की, आपण ' होय ' म्हणून जोरात उत्तर द्यावे. पण काय लिहिले आहेस, असे त्यानी विचारले तर...?

## पहाट-डोळे

—तेव्हा,
चन्द्रमनालाहि
लागला होता छन्द
आरक्त–प्राजक्त–कुसुमांचा...
नभ झुकलेले
डोळ्यात तुझ्या
सोनेरी किरणांचे
उगवतीच्या
मी तर
तेव्हाच सांगितले स्वप्नाना—
माझी वाट पाहू नका...
वाट पाहतेय
माझीच पहाट
जेव्हा—
तुलाहि काही कळले होते—
मलाहि काही
गवसले होते
त्या पहाट डोळ्यांच्या
चन्द्रबिम्बात.

*—मनोहर अपोनारायण*

पण हरीने खरोखरच एक लेख लिहिला होता की !

मुंबईत असताना आपल्या चुलत्यांबरोबर एकदा तो ' इंदुप्रकाश ' छापखान्यात गेला होता. माधवरावांनी सुधारणेबद्दल एक कसलातरी इंग्रजीत लिहिला होता आणि तो छापखान्यात देण्यासाठी ते हरीला घेऊन गेले होते. तो लेख दुसऱ्या दिवशी ' इंदुप्रकाशा 'त छापून आलेला पाहून त्याच दिवशी आपण काहीतरी लिहावे अशी तीव्र इच्छा हरीच्या मनात निर्माण झाली होती. नामजोशीच्या प्रश्नाने म्हणूनच दिवसभर शाळेमध्ये त्याचे कशात लक्ष लागेना. शाळा सुटल्यानंतर तो तडक घरी आला. आणि कागद काढून एकदम लिहावयासच बसला. त्याच्या मनात नाना विचार येत होते. एक मोठीच्या मोठी गोष्ट लिहावी असे त्याच्या मनाने घेतले. परंतु सुरुवात कोठून करावी ? त्याने सुरुवात करून पाहिली परतु त्याला ती आवडली नाही. लिहिलेल्या ओळीवरून एक टाकाचा फरकाटा ओढला गेला. दुसऱ्या कागदावर लिहावयास सुरुवात झाली. पुन्हा त्या कागदावरील प्रारंभही आवडला नाही म्हणून त्यावरून टाक फरकटावा की नाही या विचारात असता निफातून एक भला शाईचा डाग टपकला आणि त्यामुळे कागद आपोआपच दूर झाला. अशा रीतीने खूप कागद चुरगळले गेले, परंतु प्रारंभ काही होईना. शेवटी एक इंग्रजी कथा वाचली होती ती आठवली व त्याप्रमाणे प्रारंभ केला. तो मात्र थोडासा बराही वाटला. तितक्यात लहर फिरली आणि त्याचाही चोळामोळा झाला. गोष्ट तर जणू काही डोळ्यासमोर घडली त्याप्रमाणे मनात

स्वच्छ दिसू लागली असता काही केल्या प्रारभच जुळेना म्हणून त्याला स्वत.चाच राग आला. शेवटी काय होईल ते होईल म्हणून प्रारभ तर केला आणि एकापाठोपाठ तो लिहीत गेला. आपण लिहीत आहोत ते शुद्ध का अशुद्ध हा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही. लहान लहान कागदाचे चतकोर तो भराभर खरडीत होता. आपण काय खरडले हे त्याला यत्किंचितही समजले नाही, परंतु भान विसरून तो लिहीत गेला तशी भाषा आपोआपच आली, विचार आपोआपच सुचले. वर्णन करावयाचे ते स्पष्ट डोळ्यासमोर दिसते आहेसे वाटू लागले आणि नकळतच अक्षरे कागदावर पडली. ती शुद्ध नव्हती, अगदी कोंबडीच्या पायाप्रमाणे गिचमिड होती परतु वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीसारख्या चालविलेल्या त्या लेखणीने त्याला आपल्यातल्या सुप्त लेखनगुणाचा साक्षात्कार घडवला.

—शास्त्रीबुवांच्या घरी अधूनमधून डोकावण्याची त्याला सवय होती. शास्त्रीबुवाची खोली म्हणजे तिथे पुस्तके, कागद, वर्तमानपत्रे याचा नुसता ढीग पडलेला असे. इग्रजी, सस्कृत, थोडीशी मराठी अशी पुस्तके दाटीवाटीने खोलीतल्या फडताळात ठेवलेली असत. पिवळ्या, तांबड्या, काळ्या, निळ्या कव्हराची सस्ती ' नावल ' तर जिकडे तिकडे दिसत आणि कोपऱ्यात असलेल्या पाय लाव करून बसण्याच्या आरामखुर्चीवर शास्त्रीबुवा अगदी बारीक अक्षरातील रेनॉल्ड्स्चे नावल किंवा ग्रांट, गिबन, बर्क, मेकॉले, रॉबर्टसन, राके इत्यादि ग्रंथकारापैकी एखाद्याचा ग्रथ वाचताना आढळत.

" काय रे आपटे ?" आपल्या अंत करणभेदी अशा नजरेत ते विचारीत.

" काही नाही सर ! " तो म्हणे आणि ते पुन्हा वाचीत बसत. त्याच्याकडून रेनॉल्ड्स्ची एखादी कादबरी मागावी असा विचार मनात येई; परंतु चुलत्याना पत्र लिहिले की कोणतेही पुस्तक आपल्याला मिळत असताना त्याचे पुस्तक मागण्यास त्याला संकोच वाटे.

—डोक्यावरची पेटी घेऊन तो मोरोबादादाचे वाड्यात शिरला तेव्हा समोर शास्त्रीबुवाच उभे होते.

" अरे, आपटे का तू ? वा, वा, बरा भेटलास ! " ते मंद स्मित करीत म्हणाले.

" सर, हे काय चालल आहे ?"

" अरे इथे नवीन छापखाना काढावयाचा आहे आणि नवीन वर्तमानपत्र सुरू करावयाची आहेत !"

इतक्यात आगरकर आणि टिळक खिळ्याच्या पेटया घेऊन आले आणि त्याचे संभाषण तेवढ्यावरच राहिले.

—हाच तो आर्यभूषण छापखाना !

दोनतीन मुलानी पुठ्ठ्यावर पाट्या लिहून आणल्या परतु प्रत्येकाने सुरेख अक्षरात आर्यभूषणमधील ' भू ' ऱ्हस्व लिहिला होता.

आर्यभूषण छापखान्यातून टिळक-आगरकराची ' मराठा ' व ' केसरी ' ही वृत्तपत्रे निघू लागली.

' केसरी ' ऑफिसात कधीकधी एका जुन्या टेबलासमोरच्या बिनहाताच्या खुर्चीवर आगरकर बसलेले दिसत. हरीचा आगरकराशी तसा फारसा परिचय नव्हता. ते येऊन बसले की, खाली मान घालून सारखे लिहीत आणि लिहून झाले की लिहिलेले कागद छापखान्यात देऊन इकडेतिकडे न पाहता निघून जात. आगरकर बसत ती खुर्ची अगदी सामान्य असली तरी हरीला त्या खुर्चीचे मोठे आकर्षण वाटे.

आगरकर वर्गात अतिशय शात दिसत; परतु त्याचे ' केसरी'तील लेख मात्र मोठे कडक येत. ' केसरी ' आल्यानतर वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये त्यातील विषयाबद्दल नेहमी दोन तट पडून मतभेद व्यक्त होई.

एके दिवशी ' केसरी'तील मजकूर वाचल्यावर हरीने तडकाफडकी आपल्या चुलत्यास पत्र लिहिले व पुस्तकाची एक लाबलचक यादी करून ती पुस्तके ताबडतोब पाठविण्यास सांगितले.

एवढ्या लहान वयात हरीने इतकी पुस्तके मागावीत, याचे अण्णासाहेबाना कौतुक वाटले. त्यानी ताबडतोब उलट टपाली लिहिले, " मला पुत्र नाही, तथापि आमच्या आप्तीयात तुजसारखा मुलगा झाला म्हणून धन्यता वाटते. तू पुस्तके मागितलीस ती मुबईत मिळत नाहीत. तथापि ती भूपृष्ठावर कोठेही असोत, प्रयत्नसाध्य मात्र असली पाहिजेत. म्हणजे मी तुला मिळवून देईन "

पत्र पाहून हरीचा हिरमोड झाला; तो तसाच पळतपळत शास्त्रीबुवाकडे गेला.

" सर "— त्याने भीतभीतच आत डोकावले.

" कोण आहे ? आत ये ! " आतून आवाज आला.

हरी दबकत आत गेला.

" कोण, आपटे ? कायरे ?" त्यानी विचारले.

" सर, मला कालिदास, भवभूतीची नाटक हवीत ! "

" कशाला रे ?"

" वाचायला."

" अं ? तू ही पुस्तकं वाचणार ?"

" हो सर ! "

शास्त्रीबुवा थोडा वेळ थांबले व नंतर म्हणाले,

" बरं, काही हरकत नाही. वाचून लवकर आणून दे."

ती पुस्तके घेऊन हरी पळतच घरी आला. दोन दिवसांनी तो परत करण्यासाठी गेला तेव्हा शास्त्रीबुवा डोळे विस्फारून पाहतच राहिले.

त्यावेळी सबध आठवडाभर शाळेमध्ये आगरकरानी ' केसरी 'त लिहिलेल्या लेखाची चर्चा चालली होती.

" कवीमध्ये कोण श्रेष्ठ ?

आगरकर म्हणतात शेक्सपीअर श्रेष्ठ. दुसरा नबर भवभूतीचा आणि शेवटचा नबर कालिदासाचा. हरीला हे पटत नव्हते.

पुढच्या आठवड्यात ' केसरी'मध्ये ' विचारा ' या सहीने एक लेख आला आणि भवभूतीपेक्षा कालिदास श्रेष्ठ कसा यासबधी मोठ्या अटीतटीने लिहिले होते.

वर्गात चिपळूणकर सराना मग काही मुलानी विचारले,

" सर, ' केसरी'मधलं उत्तर तुम्हाला कस वाटल ?"

" छान आहे ! "

" पण सर तुमचं मत काय आहे ? "

" आगरकराचं मत विचारा ! " ते म्हणाले आणि हरीकडे एक तिरकी नजर टाकली. खाली मान घालून हरी कागदावर रेघोट्या बठविण्याचे सोंग वठवीत होता.

यानंतर दोन दिवसानी आगरकर सरानी हरीला भेटावयास बोलावले. हरी दचकलाच. तसाच बाहेर गेला. बाहेर झाडाखाली ऊन खात आगरकर हातात पुस्तक घेऊन उभे होते.

हरी जाऊन समोर उभा राहिला.

"अरे आपटे, उत्तर छान दिलस !" आगरकर वर न पाहताच म्हणाले.

"पण सर ..."

"त्यातल्या विचारसरणीबद्दल विचारायच आहे ना ?"

"होय सर."

"काय रे, तुझं वय काय ?"

"सोळा वर्षं."

"वयाच्या मानानं फारच दाडगी तयारी आहे तुझी. आणखी खूप वाच म्हणजे मी लिहिलं आहे त्यातील तथ्य लक्षात येईल."

आगरकराच्याकडे जाऊन एकदा चर्चा करावी असे हरीला पुनः पुनः वाटले. परतु, कोल्हापूरकर छत्रपतीबद्दलची काही पत्रे 'केसरी 'त छापली म्हणून आगरकर व टिळक याना शिक्षा झाली. दोघाची डोंगरीच्या तुरुगात रवानगी झाली.

* * *

टिळक-आगरकर सुटून आले आणि पुन्हा शाळेला जोर आला न आला तोच शास्त्रीबुवाचे निधन झाल्याची वार्ता साऱ्या पुण्यात वाऱ्यासारखी पसरली !

हरी पळतच शास्त्रीबुवाच्या वाड्याकडे गेला. सबध दिवस हरी व त्याचे मित्र चिपळूणकराच्या अत्ययात्रेत गर्क होते. हरीच्या डोळ्यापुढून शास्त्रीबुवांची मूर्ती ढळत नव्हती. स्मशानात अग्नी दिल्यावर तर त्याचे हुदके अनावर झाले. टिळकानी त्याला जवळ ओढले व त्याचे सात्वन केले. सायकाळ झाली. हरी माडीवरच होता.

"तात्या, जेवायच नाही का ?" खालून चिमामावशीचा आवाज झाला.

"मावशी, मला भूक नाही ग !" तो वरूनच ओरडला आणि आपल्या डोळ्यांतून अश्रूंना वाट करून देत त्याने आपल्या गुरूना काव्यसुमनाजली वाहावयास सुरवात केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाना पानसे खालून हाका मारीतच वर आला तेव्हा वर माडीवर डेस्कावर मान टाकून हरी झोपी गेला होता.

समोरच्या कागदावर मोठमोठे अश्रूंचे डाग पडले होते आणि त्यांतून पुढील चरण कसेबसे डोकावत होते.

"हृदय जळते सारे हा ! हा !! तुझ्या विरहानले !<br>
सलिल न खळे डोळ्याचे या सदा जरी वारिले !"

इतक्यात हरीला जाग आली. "नाना, अरे मी आज दिवसभर बसून शास्त्रीबुवांवर कविता लिहिणार आहे. तेव्हा कुणी येऊन मला त्रास देऊ नका."

"अरे हरी, तुला आंघोळ नाही का करायची ? आणि काल सबध दिवसभरात घासभर अन्न तरी तुझ्या पोटात गेलय का ?" तेवढ्यात वरती आलेल्या मावशीनी विचारले.

"अगोदर माझी कविता पुरी होऊ दे–मग जेवतो." हरी म्हणाला.

"तात्या, अगोदर आघोळ करून जेवून घे आणि मग ते काव्य का फाव्य करीत बस बघू." नाइलाजाने मग हरीला उठावे लागले.

आघोळ करून जेवण वगैरे झाल्यावर तो स्वस्थपणे माडीवर जाणार होता. तेवढ्यात पुन मित्र गोळा झाले. हरी जोश्याला म्हणाला–

"दत्तू, इथे बसून कविता लिहायला काही एकात मिळणार नाही असं दिसतय !"

"अरे मग आपण जमखिंडीकराच्या वाड्यात जाऊन बसू."

"नामी युक्ती ! मी कविता लिहितो आणि तू खाली उभा राहून वरती कुणाला पाठवू नकोस म्हणजे झाल."

"हो; मी, नाना आणि वासू खाली उभे राहून पहारा करीत राहू; तू कविता मात्र लवकरात लवकर पुरी कर ह ?'

आणि मग हरी जमखिंडीकराच्या वाड्यात माडीवर बसून 'शिष्यजनविलाप' लिहू लागला आणि खाली त्याचे मित्र जमून त्याची कविता सपण्याची वाट पाहू लागले.

"अरे कुठंपर्यंत झाली रे !" मधूनच कुणीतरी खालून ओरडे तेव्हा वरूनच हरी सागे—

"अरे चाललीय; उगीचच मधे ओरडू नकोस."

सध्याकाळपर्यंत कविता लिहून झाली तेव्हा ती कोणाकडून तरी तपासून घेतली पाहिजे असे हरीला वाटू लागले

"आपण नाटचकथार्णवकर्ते शकरराव रानडे याचेकडे जाऊ." पानसे म्हणाला.

"अरे पण, ते आपली कविता तपासतील का ?"

"अरे चल, बघू तरी."

ते तिघे चौघे मिळून रानड्याच्या घरी गेले. एका दिवसात एवढी दीर्घ कविता एका मुलाने लिहिलीय या गोष्टीवर रानड्याचा प्रथम विश्वासच बसेना; परतु मुलाचा हिरमोड करू नये म्हणून ते तपासायला बसले. तासभर बसून त्यानी कवितेची कसून छाननी केली.

"कविता छान आहे. एखादाच शब्द बदलावा लागेल !" ते म्हणाले, आणि आपले हस्तलिखित घेऊन हे मित्रमडळ तसेच प्रेसकडे धावले.

कवितेच्या दोन हजार प्रती छापण्यात येऊन दोन आणे किमत ठेवली आणि छापल्यानतर थोड्याच दिवसात त्याच्या प्रती हातोहात खपल्या. दहाव्या दिवशी शाळेत सभा भरली तेव्हा आगरकरांनी सभेमध्ये त्यातल्या काही ओळी वाचून दाखविल्या. विशेषतः चिपळूणकराचे लोकशिक्षणाचे व लोकसेवेचे कार्य आजन्म करण्याची त्यातील प्रतिज्ञा त्यानी गौरवाने उच्चारली आणि शेवटी ते म्हणाले,

"ज्या सस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी इतके सुदर काव्य निर्माण करू शकतात, त्या संस्थेचा भविष्यकाळ निश्चितच उज्ज्वल आहे यात शंका नाही."

समोर बसलेल्या हरीच्या अंतःकरणात चिपळूणकराच्या निधनाचे दुःख तर होतेच परतु आगरकराच्या या उद्गाराशी आपल्या लेखणीवरचा त्याचा विश्वास दृढ झाला. शब्दाचे मोतीसर आता त्याच्या मनाच्या गाभाऱ्यात लडी बनू लागले आणि नकळत त्याच्या गालांवर अश्रू ओघळू लागले.

## : ४ :

आज मुबईला मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल होता आणि हरी आज दिवसभर बाहेर कुठे न जाता माडीवर सचित बसला होता. आपण परीक्षेत पास होऊ की नाही याची धाकधूक मनात होती. फॉर्मच्या परीक्षेला हरी गेल्या वर्षी गणितात नापास होऊन मागे राहिला त्यावेळेपासून त्याने परीक्षेची धास्ती घेतली होती.

सकाळच्या जेवणाच्या वेळीच घरी हरीची थट्टा चालली होती.

"काय बाई, आज एक माणूस मॅट्रिक होणार ! मग काळजात जाणार ! मजा आहे बाई !"

"माझा हरी आहेच तसा हुशार ! निकाल लागला की अण्णा तार करणार म्हणाला होता. एक दिवस आधी तार केली तर काय बिघडत कुणास ठाऊक ! विनाकारण इथ आम्हांला निकालावर टागती ठेवलीन." आजीचे आपले असेच काही तरी चालू होते; परंतु हरीचे मन ठीक नसल्याने त्याला या बोलण्यात कसला रस वाटत नव्हता. चारदोन घास गडबडीने पोटात ढकलून तो उठला तेव्हा चिमामावशी म्हणाल्या होत्या.

"हरी, परीक्षेच्या निकालाच्या नादात अस जेवण अर्ध्यावर टाकायला नको काही ! परीक्षा उतरून तुला कुठं नोकरी का करायची आहे ?"

नोकरी करायची की नाही हे ठरविण्याची ही वेळ नव्हती, परतु परीक्षा उतरली नाही तर मात्र हरीला तोंड दाखवायला जागा राहिली नसती.

काहीच उत्तर न देता तो माडीवर येऊन पडला, तेव्हा थोड्या वेळाने जेवण आटोपून मथू वरती आली.

"डोक विक दुखत का ?" तिने घाबरतच विचारले.

"नाही ग !" आणि हरीचे मथूकडे लक्ष गेले. आता मथू चागलीच वयात आली होती आणि मुळातूनच प्रसन्न चेहऱ्यावर लज्जेमुळे एक निराळी शोभा चढली होती.

"अग मथू, मला या परीक्षेची भीती वाटते ग !" तो म्हणाला.

"इतक का घाबरायच ते ! वर्षभर सारखा अभ्यासच तर चालला होता. घरात तरी लक्ष होत का गेल्या काही महिन्यात ? मग परीक्षा उतरणार नाही, असं कस होईल ?"

एका पाठीमागून एक प्रश्न बायकोने विचारले. तिला काय सागावे, हे हरीला समजेना ! नेहमीप्रमाणे मधेच एकदा तिची थट्टा करण्याची लहर आली, परतु ती फार वेळ टिकली नाही. मग तिची परीक्षा घ्यावी, असा विचार मनात आला. लागलीच तो म्हणाला,

"अशी जवळ ये बघू एकदा ! मग सागतो !" आवाजामधे थोडीशी उमनी आणलेली ऐट होती, परंतु तेवढ्यानेहि मथू कावरीबावरी झाली.

"जवळ ये म्हणतो ना !" हरीने पुन्हा फर्माविले. घाबरत घाबरतच ती जवळ आली. जवळ पडलेले एक पुस्तक उचलून हरीने तिच्या हातात दिले,

"हं, इतके दिवस तुला लिहायला वाचायला येतं की नाही याची चौकशी करण्याच कधी सुचलच नाही; आता मला पाहू दे वरं आपली अक्कल ! हं करा सुरू."

या नवऱ्याच्या भडिमाराने मथूने "इश्य ! मला कुठलं येतय् वाचायला !" म्हणून मथूने पुस्तक खाली टाकले आणि ती मान फिरवून बसली.

हरीने पुन्हा एकदा तिला समोर बसते केले. त्याने फारच हेका धरला तेव्हा ती एकदम दोन्ही हातानी आपला चेहरा झाकून ओक्साबोक्शी रडू लागली.

तिच्या रडण्याने हरी एकदम अस्वस्थ झाला. त्याने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "तुला किती येत ते तरी स्पष्ट साग ! साध र ट फ तरी करता येतं ना, का अजीबात काही येत नाही ?" अशा रीतीने खूप सागून पाहिले. तेव्हा रडत रडत तिने आपल्याला काहीसुद्धा येत नसल्याचे सागितले. इतक्यात चिमामावशीचा खालून आवाज आला. "सासूबाई हाक मारताहेत" म्हणून घाइघाईने डोळे पुसून ती खाली पळाली.

क्षणभर परीक्षेच्या निकालाचे विसरून आपल्या पत्नीच्या अशिक्षितपणाचाच विचार त्याच्या डोक्यात थैमान घालू लागला.

"खरोखर आमचे गोविंदराव किती भाग्यवान् !" गोविंदराव कानिटकरांच्या घरचे चित्र हरीच्या डोळ्यापुढें उभे राहिले.

* * *

मुंबईत अण्णासाहेबांच्या घराशेजारी राहात असलेल्या गोविंदराव कानिटकराची ओळख सुटीत झाली होती. सहा महिन्यापूर्वी आर्यभूषण छापखान्यात हरी आपल्या मित्राबरोबर गेला असता तेथे अचानक त्याला गोविंदराव भेटले होते.

"काय हरिभाऊ..." त्यानी आपण होऊनच हाक दिली आणि अण्णासाहेबाचे कुशल विचारले.

"म्हणजे ?"

'सध्या मी इथेच राहावयाला आलोय. तीन चार महिन्यात अण्णासाहेबाची भेट नाही म्हणून विचारतोय !"

बराच वेळ मग ते दोघे अण्णासाहेबाबद्दल बोलत उभे होते. बोलता बोलता समोरच्या टेबलावर नुकतीच छापून पडलेली एका पुस्तकाची काही पाने गोविंदराव सहज चाळू लागले. चाळता चाळता "विकारविलसित नाटक" हे नाव वाचून ते थाबले. "हे आणखी कोणाचं नाटक बुवा ?" त्यानी मॅनेजरला विचारले.

"गोपाळराव आगरकरानी शेक्सपिअरच्या हॅम्लेटचं हे भाषातर केलं आहे." मॅनेजर म्हणाले, आणि मग गोविंदरावानी तेथेच बैठक मारली आणि तो फॉर्म मोठ्याने वाचून काढला. हरीभाऊ ऐकत होतेच. "आपल्याला हे भाषातर काही बरोबर वाटत नाही बुवा ! फारच पुस्तकी झालय !" हरी मध्येच म्हणाला.

"तुम्हांलाही असंच वाटतय का ?" गोविंदराव म्हणाले, "हॅम्लेटच भाषातर म्हणजे कस झालं पाहिजे !"

"गोविंदराव तुम्ही करायला घ्या पुन्हा !"

"छे, हो, तेवढ्यात हे छापून बाहेरही पडेल !"

"आपण अस करू ! दोघानी मिळून आजपासून भाषांतराला सुरुवात करू आणि जसजसं भाषातर होत जाईल, तसतस छापायला देऊ. आपलं आणि आगरकरांचं भाषातर एकाच दिवशी प्रसिद्ध करू !"

"चालेल, मी तयार आहे !"

"मीही तयार आहे !"

"तुम्ही रोज सध्याकाळी माझ्याकडे यायच ! ठरलं तर मग !" गोविंदराव म्हणाले आणि हरीने समती दिली होती. त्यावर दोन तीन दिवस मग रूपांतराचे काम जोरात चालले चौथ्या दिवशी ऑफेलियाच्या तोडच्या एका वाक्याबद्दल दोघांचा काही मतभेद झाला.

"थांबा !" गोविंदराव मध्येच म्हणाले,

"अहो, अशा थोड्या बाहेर येता का ?" त्यानी स्वैपाकघराकडे पाहात हाक मारली.

" होय, आले हां–" आतून सौम्य, शालीन आवाज आला; आणि त्याबरोबर तरुण वयाची एक स्त्री बाहेर आली.

" हरिभाऊ, ही माझी पत्नी !" गोविंदरावांनी परिचय करून दिला आणि भांबावून हरी त्यांच्याकडे पाहू लागला. तेवढ्यात हात जोडून त्यांनीच हसतमुखाने म्हटले,

" अण्णासाहेबांचे पुतणे हरिभाऊ ते आपणच ना ! तुमच्याबद्दल हे नेहमी खूप सांगत असतात !"

परपुरुषासमोर इतक्या धीटपणे व अगत्याने बोलणारी स्त्री हरिभाऊ हिंदु कुटुंबात प्रथमच पाहात होते; त्यामुळे ते चांगलेच भांबावले.

गोविंदरावांनी त्यांना का बाहेर बोलाविले हे सांगून आपल्या रूपांतरांतील काही वाक्ये वाचून दाखविली तेव्हा, " इश्श, मी कसला निर्णय देणार !" असे त्या म्हणाल्या. तरी उत्सुकतेने त्यांनी कागद हातात घेतले आणि भराभर ते वाचून आपल्या मताप्रमाणे त्याला काही दुरुस्त्या सुचविल्या. त्या सुचविताना " बायका कशा बोलतात " याचे त्यांनी दिग्दर्शन केले.

त्यांची ती चर्चा हरिभाऊ मन लावून व तल्लीन होऊन ऐकत होते. आपल्या समाजात स्त्री इतकी हुशार व सुशिक्षित आहे, असे त्यांना यापूर्वी कोणी सांगितले असते तर त्यांचा क्षणभरही विश्वास बसला नसता, परंतु अशी स्त्री ते प्रत्यक्षच पहात होते. या आठवणीं-बरोबर स्वतःच्या पत्नीच्या अशिक्षितपणाची तीव्र जाणीव त्यांना झाली. मग त्यांच्या लक्षात आले की निकडीचा प्रश्न मथूच्या शिक्षणाचा नसून त्यांच्या परीक्षेच्या निकालाचा होता.

परीक्षेच्या निकालासंबंधाने हरिभाऊंनाही जी हुरहूर लागून राहिली होती त्याला आणखीही इतर कारणे होती. त्यांच्या काकांची त्याने लवकर ग्रॅज्युएट व्हावे व त्यास पुढच्या शिक्षणासाठी विलायतेस पाठ-विण्याची मनीषा व्यक्त केली होती.

वेळ टळत चालली तशी त्यांची हुरहूर अधिकच वाढत गेली. एवढ्या वेळात हरिभाऊंनी मनामध्ये नानाप्रकारचे नवसही बोलून घेतले. चित्त सारखे दाराकडे लागले होते. कुणीतरी आपले नाव घेऊन मोठमोठ्याने हाका मारतो आहे, असा एक दोन वेळा भासही झाला. तारवाला ज्या रस्त्याने येणार त्या रस्त्याने कोणी येताना दिसला की तो तारवालाच आहे अशी आमची स्थिती व्हावी. असे खूपदा झाले. दरवाज्यावर कोणी धक्के मारतो आहे असाही भास झाला. परंतु रात्रीचे नऊ वाजले तरी तार आलीच नाही. हरिभाऊंची फार निराशा झाली व मनाची मोठी चलबिचल झाली.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर काय करावे याचा हरिभाऊंनी अनेकप्रकारे विचार केला होता. आपण लाथ मारू तेथे पाणी काढू, या आत्मविश्वासाने ते आपल्या भवितव्याबद्दल निश्चित होते. एखाद्या सरकारी खात्यात दहा पंधरा रुपयांसाठी अडकावे, अशी त्यांच्या घरची स्थिती नव्हती आणि मॅट्रिक झाल्यावर रेव्हेन्यूचे पंचवीस किंवा अकाउंटंटच्या ऑफिसांतील एकविसांवर नजर ठेवून अर्ज खरडण्याची त्यांना मुळीच गरज नव्हती. मधेच एकदा एल्‌एल्. बी. होऊन विलायतेला जाऊन यावेसे त्यांना वाटे; परंतु याहीपेक्षा न्यू इंग्लिश स्कूलमधल्या आगरकरांसारखे एम्. ए. होऊन त्यांच्या काही मित्रांनी काढलेल्या नूतन मराठीला स्वार्थत्यागाने ऊर्जितावस्था



शिक्षित स्त्रीचे पहिले दर्शन...

आणावी आणि शास्त्रीबुवांच्या स्मरणार्थ निघालेल्या 'निबंधचंद्रिके'-तून साऱ्या महाराष्ट्राला राजकीय जागृतीचे धडे देऊन शास्त्रीबुवांच्या ऋणातून मुक्त व्हावे...

गोविंदरावांशी एकदा बोलता बोलता हा विषय निघाला, त्यावेळी ते म्हणाले,

" हरिभाऊ, मी तुम्हांला एक सरळ विचारू का ? "

" विचारा ना, त्यात संकोच कसला ? "

" मी पाहतो आहे की, तुमचा आगरकरांवर बराच राग दिसतोय."

" गोविंदराव, तुम्हांला खरं सांगायचं म्हणजे माझा राग सगळ्या सुधारकांवरच आहे. आपला समाज आणि त्यांचे आचारविचार नीट समजावून न घेता ह्या सुधारक म्हणविणाऱ्यांनी फारच मोठा अविचार चालविला आहे. "

" अहो आपटे, तुमच्यामध्ये तर अगदी शास्त्रीबुवा संचरलेले दिसतात !"

" अहो शास्त्रीबुवांचं कशाला नाव घेता ? त्यांचा नखाची सुद्धा सर सुधारक मंडळींना येणार नाही. आता आगरकरांच्या या 'विकार-विलसित' या नाटकाची किंवा 'केसरी'मध्ये ते लिहीत असलेल्या काही लेखांचीच गोष्ट घ्या ना !"

" काय बुवा, त्यांत काय बिघडलं आहे ? "

" आता पाहा, आगरकर जोरजोरानं ओरडताहेत ! कशाविरुद्ध तर बालविवाह, केशवपन किंवा कोंकीदार किंवा कंगणीदार पागोटं घालणं याविरुद्ध ! आता तुम्हीच सांगा, आमचे रीतिरिवाज काय एवढेच आहेत काय ?" बोलता बोलता त्यांचा आवाज बराच चढला आणि समोरच्या मेजावर जोरात हात आपटून ते म्हणाले,

" मी पुढं असं विचारतो की, आपल्या संस्कृत नाटकांत वर्णिलेले रीतिरिवाज हे आमचे नव्हेत काय ? बरं आम्ही आमचे रीतिरिवाज सोडून चाललो, हे दाखविणं चांगलं की दुसऱ्यांचे चांगले आहेत हे दाखविणं चांगलं ?"

" अरे अरे, आगरकरावर तर तुम्ही मोठाच गहजब चालविला आहे ! पण त्यांचं चरित्र तुम्हाला माहीत नाही. आजच्या सुधारकाच्या वर्गात आगरकराइतका नि स्वार्थ, निर्भीड व त्यागी गृहस्थ आढळणार नाही. "

" आगरकरांची पुरी परीक्षा अद्याप व्हायची आहे. इंग्रजी सुधारणारूप वारुणीच्या पहिल्या झटक्याबरोबर तर्र झालेल्या इतर लोकांप्रमाणे हातपाय झाडणाऱ्या लोकाच्या वर्गातच अद्याप मी त्यांची गणना करतो. आजच्या सुधारकामध्ये बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन याबद्दल शाब्दिक वडबड करणारे वीर शेकडो आहेत. या पाश्चिमात्य सुधारणानी धुद झालेल्या लोकास त्यांच्या घरच्या बायकांनीच चागला प्रतिवध चालविला आहे, म्हणूनच हे सुधारणेचं तारूं कोणत्यातरी खडकावर जाऊन आदळण्याच्या विपत्तीतून वाचल आहे. "

" अरेरे ! म्हणजे आम्ही सुधारक आणि नुकतीच चार-दोन अक्षर शिकणाऱ्या आमच्या बायकाबद्दल तुम्हाला फारच राग दिसतोय !'

" नाही हो गोविंदराव, तुमचे आपले सबध फार निराळे. तुमच्याबद्दल मी चुकूनही अस बोलणार नाही." हरिभाऊ ओशाळून म्हणाले आणि त्याच्या उद्गाराने गोविंदरावानाही मनातून अतिशय आनद झाला.

वरील प्रसगाची आठवण मनात दाटत असताच त्याचे लक्ष घड्याळाकडे गेले.

दहा वाजून गेले होते. तारेचा अजून पत्ता नव्हता. एखाद्या शेख महंमदाप्रमाणे आपण भलत्याच स्वप्नात रगून गेलो असे वाटून ते ओशाळले व त्या तिरिमिरीत उठून उभेही राहिले. इतक्यात बाहेरचा दरवाजा वाजला, आणि मुबईहून आण्णासाहेबानी पाठविलेली तार घेऊन पोस्टमन हजर झाला.

" हरी अभिनदन "

त्या अक्षरावरून त्याची नजर सरकन फिरली.

## : ५ :

" कोण पाहिजे ? मोडक्यातोडक्या खुर्चीवर बसलेल्या त्या इसमाने आपल्या डोळ्यांवरचा चष्मा नाकावर चढवून छद्मीपणाने विचारले.

" मी वैद्य " हळूच त्यांच्यापैकी एक म्हणाला. शंकररावानी त्या विद्यार्थ्याला तात्काळ ओळखले आणि हसत विचारले,

" हं, काय वैद्य, काय म्हणतंय तुमचं डेकॉं ? "

" डेकॉं ? हं ह, डेक्कन कॉलेज म्हणता होय ? ठीक आहे की ! "

" अहो मी विचारतोय तुमचे ते सुधारक माडारकर काय म्हणतात ? '

" तेही ठीकच आहेत की ! "

शंकररावांना सुधारकाची निंदा करण्याची अनिवार उबळ आली होती, परंतु एकदा त्याची गाडी चालू झाली की तिला आवरणे कठीण आहे हे पाहून वैद्य पुढे झाला आणि म्हणाला,

" केळकर, हे माझे मित्र हरिभाऊ आपटे. ह्यानी एक कादंबरी लिहिली आहे. तुम्ही ती आपल्या "पुणें-वैभव" मध्ये छापावी म्हणून आणली आहे.

" कादंबरी आणि तीही 'पुणे-वैभवा'त ? छे, छे !" हरिभाऊकडे पाहून अजून मिसरूड न फुटलेल्या ह्या पोराची कसली कादंबरी असणार या कल्पनेने उडवून लावण्याच्या उद्देशानेच ते म्हणाले

" अहो एकदा वाचून तरी पाहाल की नाही ? "

" कसली कादबरी आहे ती ? "

" रेनॉल्ड्स्च्या 'Mysteries of old London' या कादंबरीचं रूपांतर आहे. ' हरिभाऊ म्हणाले.

" रेनॉल्ड्स् का ! त्याच्या कादबऱ्या चांगल्याच लफडेबाज असतात बुवा. पाहू वाचून. बसा. "

हरिभाऊंनी हस्तलिखित त्याच्या हातात दिले. प्रुफे तशीच टाकून केळकरांनी ते हस्तलिखित चाळायला सुरुवात केली.

शंकररावाचे वाचन चालू असताना हरिभाऊ आपल्या मित्राबरोबर तसेच अवघडलेल्या स्थितीत सतरजीवर खाली मान घालून बसले होते. शंकररावाचा चेहरा थोडा उमलू लागलेला पाहताच वैद्याने हरिभाऊना चिमटा काढला. हरिभाऊनी वर पाहिले. केळकराची स्वारी खूष झालेली दिसत होती.

" उत्तम, झकास. " दहा मिनिटात दोन प्रकरणे संपवून ते म्हणाले,

" आम्ही ही प्रकरण अवश्य छापू. पण काय हो आपटे, तुम्ही ही सपूर्ण लिहिणार ना ? "

" हो. नक्की ! "

" त्याबद्दल मी हमी घेतो. " वैद्य म्हणाला.

" पण त्यामध्ये सुधारकाची अशी हजामत करा की ....."

" त्याची नको काळजी. " हरिभाऊ आपण होऊनच म्हणाले.

शास्त्रीबुवांना अतिशय आवडणाऱ्या रेनॉल्ड्स्च्या एका कादंबरीचा सुरस अनुवाद करण्यासाठी हरिभाऊ अतिशय उतावळे झाले होते. कॉलेजच्या पहिल्याच वर्षी कॉलेजच्या वाचनालयातील कितीतरी कादबऱ्या वाचता वाचता आपणही आपल्या लेखणीचे कौशल्य दाखवावे, या हेतूने आणि मूळ कादबऱ्यातील सुशिक्षिताचे थेर सुधारकाच्या नावाने रगवावे या हेतूने त्याच्या तारुण्यसुलभ कुतूहलाने त्यांनी भाषातरास सुरुवात केली होती.

'पुणे-वैभवा'त मात्र कादबरी इतक्या झटकन् प्रसिद्ध होईल, याची त्याना कल्पना नव्हती.

दोनचार प्रकरणे प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्यामध्ये फारच खळबळ माजली होती. नवीन आलेला 'वैभव'चा अंक घेऊन चार विद्यार्थी त्याच्या भोवती उभे राहून त्यातील मजकूर वाचून जोरजोरात हसत होते, त्या वेळी हरिभाऊच्या मनात विचार आला . " बर झालं कादबरी टोपणनावानं लिहावयास घेतली ती ! " गोविंदरावांची पुण्याला बदली झाल्यामुळे त्यांच्या मताचा प्रश्न नव्हता, परतु अण्णासाहेबाना ही गोष्ट कळली तर... ?

हा विचार मनात यायला यायला आणि तिकडून प्रिन्सिपॉलसाहेबाबरोबर अण्णासाहेब त्याच्याकडेच येत असताना दिसायला एकच गाठ पडली.

" काय हरी, काय म्हणतो अभ्यास ?"

" ठीक चाललाय अण्णा ! "

" चालू द्या, चालू द्या. तुझे प्रिन्सिपॉलसाहेब तुझ्यावर खुष दिसताहेत. त्यांनी तुझ्या विनोदबुद्धीच आणि अभ्यासू वृत्तीच माझ्याकडे खूपच कौतुक केल. "

"अण्णा, मी परवा पत्रातून मागितलेली पुस्तक मिळाली का ?"

"नाही रे, दोन चार मिळाली. आता लडनलाच पत्र पाठवून तुझी पुस्तक मागवून घेतो."

आणि ते बोलता बोलता प्रिन्सिपॉलसाहेबाबरोबर निघून गेले.

ते निघून गेल्यानंतर थोड्या वेळातच 'पुणे-वैभव'च्या सपादकाची स्वारी घोडा-गाडीतून उतरून डुलत डुलत कॉलेजच्या आवारात शिरली.

"अहो, ते आपटे कुठे आहेत ?"

"हे काय इथे बसले आहेत !"

"अहो आपटे, तुमच्या कादबरीची प्रकरण सुरू झाल्यापासून मोठमोठ्या लोकाची ही किती पत्र आली पाहा. तुमची कादबरी लोकाना खूपच आवडली आहे. पुढची प्रकरणं कधी देता ?"

"दोन तीन दिवसात मी तिकडे आणून देईन !" हरिभाऊ म्हणाले.

"च्, च्, सबध कादबरी लवकर लिहून काढा. एकाऐवजी आमच्या पत्रास दोन पुरवण्या जोडण्याची आमची तयारी आहे !"

"लवकरच लिहीन !"

"लवकर लिहा, लवकरात लवकर !" आणि ते आले तसेच घोडा-गाडीतून निघून गेले.

हरिभाऊ तडक गावातील आपल्या घरी आले आणि त्यानी कागद पुढे ओढून लिहिण्याची सिद्धता केली. परतु काही केल्या त्याच्या पेनातून अक्षरे उतरतात.

'या रेनॉल्ड्सच रूपातर करण्यापेक्षा आपण स्वतत्ररीत्या ही कादबरी पुढ लिहिली तर !' त्यानी स्वत लाच प्रश्न केला.

'हो, असं केल तरच मोठी बहार होईल ! बस्स, आपण यापुढे स्वत.च्या अवलोकनातून कादबरी उभी करायची !'

'अरे पण त्या वेश्याच काय करणार ?'

'त्यात काय कठीण आहे ? आपल्या वसतिगृहातील दहापाच विद्यार्थी पुण्याला गेल्यावर वेश्याच्याकडे दर शनिवारी-रविवारी न चुकता जातातच.'

'मग तू सुद्धा जाणार की काय ?'

'छे, छे !'

'मग !'

'सहज कुतूहल म्हणून एखाद्या दुसऱ्या गाण्याच्या बैठकीला जायला काय हरकत आहे ?'

'पण.. ... ?

'पण बिण काही नाही !'

स्वत च्या मनाशी अशा रीतीने सवाद चालला असता त्याच्या डोळ्यासमोर बुधवारातील रस्त्यावरची असख्य दृश्ये तरळू लागली. वाईट साईट गजरे घेऊन 'गजरे मोतियाचे' म्हणून कर्कशपणे ओरडणारी माळ्याची पोरे, एकमेकाना वात्रट प्रश्न विचारून त्यांची चावट उत्तरे देणारे भिक्षुक, देवदर्शनाला उशीर झाल्यामुळे घाईघाईने घराकडे परतणारी व घाबरलेली एखादी कुलीन स्त्री आणि समोरून जाणाऱ्या रगेल मडळीचा ताडा आपल्याकडे डोळेफोड करीत आहे, हे पाहून तिची उडालेली त्रेधा, रगेल मडळीची दृष्टी आपल्यावर पडावी म्हणून सदैव इच्छा करणाऱ्या व ती सफल झाली की अतिशय सतोष पावणाऱ्या स्त्रियांची गर्दीही त्यातच मिसळलेली. कपाळावर बारिक कुंकवाची चिरी रेखून तुळशीबागेत किंवा बेलबागेत देवदर्शनाकरता म्हणून जाणाऱ्या विश्वयोपिताची ती कटाक्षफेक पायातील मासोळ्याकडे अगर जोडव्याकडे नजर फिरवीत, आखूड पदर सावरीत व कोणी पुरुष जवळ आला की, हळूच त्याच्याकडे एक किंचित कोपयुक्त, किंचित लज्जायुक्त अशी दृष्टी फेकून अंग चोरून चाणाऱ्या भटकभवान्याची ती रहदारी ! जणू काही आपले घर बुधवारात आहे आणि दुसऱ्या मजल्यावरच्या खिडकीत बसून रस्त्यावरची ही चित्रे आपण न्याहाळीत आहोत असा त्याना भास होऊ लागला. त्यातच मग मनामध्ये आलेल्या एखाद्या सुदरीचे घर पाहण्यासाठी कुत्र्याप्रमाणे हिंडणाऱ्या बशीची ओळखही नसता चटकन गाठ पडली.

हा बशी कोण ? शाळा-कॉलेजातून शिकण्याच्या निमित्ताने आई-वडिलाना लुबाडणारे एक कर्मदरिद्री...

गावाकडे बायको सासूकडून मार खाऊन अश्रू गाळीत असते आणि हे पठ्ठे...

लगेच बुधवार पेठेतला रस्ता डोळ्यासमोरून दूर झाला आणि जोगेश्वरीच्या बोळाचे दृश्य ते पाहू लागले. बाहेरच्या लोकाना दिसेल अशी वेणीफणी तिथे चाललेली आहे. कोणी दिवाबत्ती करीत आहे; कोणी बैठक नीट करते आहे, कोणी उंबरठ्यात येऊन बसत आहे. अशा वेळी कोणाचा डोळा आपल्याकडे नाही असे पाहून कोणी झटक्यासरशी माडीचा जिना चढून वरती जातो आहे. सहज गमत म्हणून थोडेसे खाकरून बघा, काय त्या बिचाऱ्याची तिरपिट उडाली ती ! तोंड लपवून वरती पळतोय पहा बेटा ! दिसला का तो चेहरा? अरे तो त्या इनामदाराचा मुलगा. ते आपले तमक्या गल्लीतले रावसाहेब. शनिवारातले ते वकीलसाहेब दिसले का ? आणि ते एडिटर— ?

नानाप्रकारच्या दृश्यानी हरिभाऊ अतिशय अस्वस्थ झाले. चिमामावशीनी ठेवलेले दाणे खाऊन वरती घोटभर पाणी पिऊन हरिभाऊ बराच वेळ माडीवर विचार करीत पलंगावर पडून राहिले.

सध्याकाळ झाली आणि रस्त्यावर चागला अधार पसरू लागला, त्यावेळी अगावर कोट चढवून ते घाईघाईने बाहेर पडले.

शनीच्या पाराजवळच्या एका लहानशा गल्लीत शिरून त्या गल्लीच्या कोपऱ्यात असलेल्या एका इमारतीसमोर ते उभे राहिले. त्या इमारतीच्या आवाराला असलेल्या छोट्याशा दारातून आत गेले की मागच्या बाजूने एक अरुद जिना होता.

जिना चढता चढता तेवढ्यात हजारदा त्याच्या मनात आले की, आपण आलो तसे परत जावे; परतु त्याच्या मनातील कुतूहल व जिज्ञासाबुद्धी त्याचे पाय वर ओढीत होती.

जिन्यावरून वर गेल्यानतर हरिभाऊनी बद दारावर टकटक केले आणि थोड्या वेळाने एका व्यक्तीने दार उघडले,

"कोण, हरिभाऊ ?" त्या व्यक्तीने दचकून विचारले.

हरिभाऊ तसेच आत शिरले. दिवाणखान्यातील लोडाना आणि तक्क्याना काही मडळी टेकून बसली होती. त्या सगळ्याची नजर हरिभाऊंकडे गेली आणि एकदम त्याच्या तोंडून 'आँ ?' असा स्वर बाहेर पडला.

हरिभाऊनी त्याच्याकडे नजर टाकली, तेव्हा त्याच्या अदाजाप्रमाणे

बहुतेक मडळी एकत्र आली होती. रेलून बसलेले मुबईचे हायकोर्ट वकील, पलिकडचे सरकारी ट्रेनिंग स्कूलचे मास्तर, तिकडचे ते शनवारातील प्रसिद्ध डॉक्टर, ते बाळासाहेब, हे सरनाईक...

दिवाणखान्याच्या मध्यभागी एक राउड टेबल होते आणि त्यावर काडचाच्या पेटया, पान, तबाखू, ग्लास, बाटल्या, बशा पडलेल्या होत्या. वरच्या बाजूला मध्यभागी एक भले मोठे झुवर होते आणि त्याचा स्वच्छ प्रकाश दिवाणखान्यात पडला होता. त्या प्रकाशात भिंतीवरच्या तसबिरी चकाकत होत्या. बहुतेक सगळचा इग्रजी बायांच्या! मोठचा चोखदळ! परमेश्वराने त्याच्यासाठी कपडाच कुठे बनविला होता! एकदोन तसबिरी आपल्याकडच्या होत्या, गोपीवस्त्रहरणक्रीडा आणि...

"मडळी, हे आपले हरिभाऊ! आपल्या मुबईच्या माधवराव आपटचाचा पुतण्या!"

"आजपासून नवीन मेंबर का?'

"नाही. मी आपला उगाच आलो आहे" हरिभाऊ.

"हे ऽ हे ऽ असं कुठं झालय काय?"

"खरंच. देवाशपथ!" तुमचं चालू द्या—

मग बोर्डो आणि शापेन, शेरी आणि व्हिस्की, 'इदुप्रकाशा'तले सुधारकी आर्टिकल आणि 'वैभवा'तील शिवीगाळी यांची भाषा वातावरणात घुमू लागली आणि मडळी बघता बघता तर्र झाली. केशवराव जाऊन जाजमावर पडले. कृष्णाजीपत खुर्चीसकट खाली आले, ते तसेच लोळू लागले. शंकरराव तर रानटी अवस्थेत गेले आणि दामोदरपत मोठमोठचाने रडू लागले. सखारामपत हसू लागले. विनायकराव अगदी बेशुद्ध पडले आणि काही वेळाने भडाभड ओकू लागले. आणि त्याची दुर्गंधी सान्या खोलीभर पसरली!

हळूच दरवाजा उघडून मागच्या जिन्याने उतरून हरिभाऊ रस्त्यावर आले आणि घराकडे चालू लागले. घरी मथू त्यांच्या येण्याची वाट पाहत न जेवता ताटकळत बसली होती.

## : ६ :

कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या निकालाच्या दिवशी हरिभाऊ घरीच होते आणि सायकाळी सहा वाजेपर्यंत दत्तू जोशी आला तर ठीक व तो आला नाही तर हरिभाऊनी काय ते समजायचे—अशी व्यवस्था झालेली होती. त्याचे पेपर अतिशय चांगले गेले होते, परतु प्रश्न गणिताच्या पेपराचा होता! गणितातल्या अगणित अडचणीतून त्याना वाट काढता आलेली नव्हती.

सायंकाळचे सहा वाजले तरी दत्तू जोशी आला नाही तेव्हा हरिभाऊ काय समजावयाचे ते समजले. उदास चेहऱ्याने ते आढ्याकडे पाहात बसले असता अण्णासाहेबानी जर्मखिडीकराच्या वाडचात त्यांना बोलाविले असल्याचा निरोप आला.

कपडे करून हरिभाऊ तेथे गेले, त्यावेळी आण्णासाहेब मुबईहून नुकनेच आले होते आणि केशवराव वकील पान चघळीत त्याना काहीतरी सांगत होते.

"ये तात्या!" अण्णासाहेब म्हणाले आणि ते हातातील कागद पाहू लागले.

"काय तात्या, त्या दिवशीच्या रात्री मोठी मजा आली की नाही?" केशवरावानी डोळा उडवीत विचारले.

"कुठली रात्र?" हरिभाऊनी घाबरूनच विचारले.

"वा! हरिभाऊ, तुम्हाला काय वाटत, आम्हाला ठाउक नाही होय?" त्यानी वर पुस्ती जोडली!

हरिभाऊ कावरेबावरे झाले, अण्णासाहेबानी एक कान सवादाकडे दिला होता.

"पण काही म्हणा बुवा! शनिवारी झालेल्या तमाशाची सर दुसऱ्या कशालाही येणार नाही."

"तमाशा?" अण्णासाहेबानी विचारले.

"हा, हा, हा, काय सागू अण्णासाहेब, शनिवारी सातारकरणीचा तमाशा आला होता..."

मग केशवरावानी बऱ्याच गोष्टी तिखटमीठ लावून अण्णासाहेबांना सागितल्या. शनीच्या पाराजवळील हरीच्या एका श्रीमत मित्राने दोन दिवसात एका तमाशात एक गाणे करवले. त्यासाठी वडिलाच्या खिशातून पन्नास रुपये चोरले. एकवीस रुपये जरीकाठी रुमालासाठी गेले. पधरा रुपयांवर गाणारीण कशी तयार झाली आणि बाकी रुपये दौलतजादावर कसे उडवले...!

केशवराव वकिलानी आणखी काय काय सागितले असते कुणास ठाऊक, परतु अण्णासाहेबानीच विषय पालटला—

"हू, काय तात्या, पेपर कसे गेलेत?"

"चागले गेलेत." हरिभाऊ खाली पहात म्हणाले.

"पास होणार ना?"

"बहुतेक."

"निकाल कधी आहे?"

"मला ठाऊक नाही."

"वर चला, मावशीना सागा, मी आलोय म्हणून," हरिभाऊ पडत्या फळाची आज्ञा घेऊन बाहेर निघाले, तेवढचात अण्णासाहेब म्हणाले.

"तात्या, आज माझा सोमवार आहे बर का!"

"हो." आणि हरिभाऊ तेथून सटकले.

हरिभाऊ घरी परत आले, अण्णासाहेब आल्याची वर्दी त्यानी दिली आणि मग त्याना वाटू लागले की, कादबरीची पुढची प्रकरणे अगदी याच क्षणी लिहायला हवीत. 'मधली स्थिती' या कादबरीचे पुढचे प्रकरण लिहिण्याच्या उद्देशानेच ते माडीवर गेले. कादबरीतील गोविंदराव चकणे जोगेश्वरीच्या बोळातून ज्या माडीवर जात त्याचे सपूर्ण वर्णन करण्यामध्ये व गोविंदराव अधूनमधून ज्या विधवेकडे जात त्या विधवेचे वर्णन करण्यामध्ये ते रगून जाऊ लागले. आपण नापास झाल्याचे दुःख कादंबरी लिहिताना ते जणू विसरून गेले होते.

रात्री अण्णासाहेब घरी आले त्यावेळी हरिभाऊ जेवून झोपी गेले होते. दुसऱ्या दिवशी अण्णासाहेबाना तातडीने मुबईला जायची घाई असल्यामुळे तात्या उठायच्या आतच ते निघून गेले होते.

हरीच्या परीक्षेतील अपयशाची वार्ता अण्णासाहेबाना मुबईस समजल्यानतर त्यानी मोठ्या सतापाने दोन दिवसानी पत्र लिहिले.

"...तात्या, तू अधूनमधून काहीतरी लिहितोस त्याचे मला कौतुक वाटत नाही, असे मुळीच नाही. परतु चार टारगट

मित्रांच्या बरोबर हसण्याखिदळण्यात तू वर्ष वाया घालविलेस हे मला रुचले नाही."

हरिभाऊंना अण्णासाहेबाचे हे पत्र जिव्हारी लागले आणि पुढच्या वर्षी कसून अभ्यास करण्याची प्रतिज्ञा त्यानी मनोमन केली.

'पुणे-वैभवा 'तून कादंबरी प्रकाशित होऊ लागल्यानंतर मे महिन्यातली ही गोष्ट. हरिभाऊ अप्पा बळवत चौकातून रेंगाळत चालले होते, इतक्यात कुणाची तरी हाक ऐकू आली. हरिभाऊंनी मागे वळून पाहिले तो गोविंदराव कानिटकर त्याना हाका मारीत होते. गोविंदरावाना पाहून हरिभाऊना अतिशय आनद झाला.

गोविंदरावांची बदली सबजज्ज म्हणून नगर जिल्ह्यातील नेवाशास झाली होती, त्यामुळे गेले कित्येक दिवसांत त्याची भेट झाली नव्हती; म्हणून इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्यानतर गोविंदराव हळूच म्हणाले.

"हरिभाऊ, अण्णासाहेब तुमच्यावर बरेच नाराज झाले आहेत म्हटलं!"

गोविंदरावाचे शब्द ऐकून हरिभाऊचा चेहरा एकदम पडला. एक दीर्घ नि:श्वास सोडून काहीच न बोलता ते चालू लागले. ती स्तब्धता फार काळ टिकली नाही, कारण गोविंदराव आपण होऊनच पुढे म्हणाले.

"हरिभाऊ, गेल्या दोन महिन्यात प्रसिद्ध झालेल्या 'पुणे-वैभवा'-तील प्रकरणानी तो केशवराव वकील मोठा अस्वस्थ झालाय! मली खोड मोडली गुलामाची!"

तशाही परिस्थितीत हरिभाऊंच्या मुखावर सौम्य स्मित विलसू लागले, आणि हरिभाऊनी ती प्रकरणे केव्हा लिहिली हे सागूनही टाकले.

"अहो पण त्या प्रकरणानी अण्णासाहेब कसे चिडले होते याची हकीकत नुकतीच मला आमच्या चुलत्याकडून समजली."

"काय?" उत्सुकतेने त्यानी प्रश्न केला.

"पंधरवड्यापूर्वी मुबईला आमचे चुलते अण्णासाहेबाना भेटावयास गेले असता तिथे विष्णु मोरेश्वर महाजनी व अण्णासाहेबाची चर्चा चालली होती. तुमच्या या चकणे वकिलानी अण्णासाहेबाना अगोदरच कसल तरी पत्र लिहिल होत आणि त्यातच 'पुणे-वैभवा'तील पुढची प्रकरणं त्याच्या वाचनात आली तेव्हा त्याचा एकदम भडका उडाला. महाजनीकडे त्यांनी आपल्या तात्याला वाईट संगत लागली आहे, तो वेश्याच्या माडीवर जातो की काय, याची काळजी वाटू लागल्याचे त्यानी बोलून दाखविले. त्यावेळी महाजनीनी त्याची समजूत घातली व पुण्यातील सुशिक्षिताचे व पैसेवाल्याचे दुर्गुण लोकासमोर माडण्यासाठी तात्यानं हे चागलच कार्य आरंभिल आहे आणि तात्या चुकूनही असल्या व्यसनात पडणार नाही याची खात्री दिल्यावर ते शात झाले."

"पण गोविदराव, ती प्रकरणं घडल्यानंतर इथेसुद्धा एक और प्रकार घडला बरं का?"

"कसला हो!"

"अहो ती प्रकरणं वाचून जोगेश्वरीच्या बोळातील एक खानदानी वेश्या मला भेटायला आली होती."

"बापरे...!" गोविंदराव आश्चर्याने भारावून गेले होते.

"अहो, एकदा मी शेवडयाच्या बोळातील एका जागी बैठकीत बसलो असता ती अचानक वरती आली आणि 'पुणे-वैभवा'तील त्या कथेचे लेखक आपणच का असा सरळ प्रश्न तिन मला विचारला. मी भावावून गेलो. पण ती आपण होऊनच पुढे म्हणाली, 'माडया चढण्याची तुम्हाला चागलीच सवय दिसते बर का!" मी मात्र जेमतेम 'नाही, नाही' म्हणालो, त्यावेळी ती पुन्हा म्हणाली, 'शक्य नाही, शक्य शक्य नाही.' मी नाईलाजास्तव शांत राहिलो. जाताना ती म्हणाली— 'तुमच्या वर्णनात मात्र एक चूक राहिलीय बरं का? गाण्याच्या बैठकीत डग्गा आणि बाह्या होत्या असं तुम्ही लिहिलं आहे. अहो डग्गा व बाह्या याचा अर्थ एकच आहे, हे तुम्हाला कोणत्याच बाईनं कसं सागितल नाही?"

गोविंदराव ही हकीगत ऐकून स्तिमित झाले व म्हणाले, "हरिभाऊ, खरोखर तुमचा स्वभाव मला ठाऊक आहे म्हणून, नाहीतर त्रयस्थपणान ती वर्णनं वाचून तुम्ही पक्के बाहेरख्याली आहात, असा मी देखील अंदाज बांधला असता."

"बरं ते राहू द्या. हल्ली नवीन काय वाचताय आणि लिहिताय ते कळू द्या तरी!"

"अहो कसलं वाचन आणि लेखन घेऊन बसला आहात? नेवाशासारख्या आडवळणाच्या गावी मिळणार काय आणि वाचणार काय आम्ही कपाळ?"

"तरीपण ..."

"हल्ली मिल्ल-स्पेन्सरची पारायण करतो आहे."

"काय एवढ त्या तुमच्या मिल-स्पेन्सरमध्ये आहे तुम्हालाच ठाऊक! तिकडे 'केसरी'त गोपाळराव आगरकरानीही सारखा त्यांचा उदोउदो चालविला आहे."

"हरिभाऊ, माझ्या खिशात मिलच हे छोटं पुस्तक मी कायमचं ठेवून दिल आहे पाहा. Subjection of Women' या नावाच हे पुस्तक छोट असल तरी मोठ विचारप्रवर्तक आहे. तुम्ही एकदा वाचून तरी पाहा."

"मी वाचून पाहीन, परतु मला त्यामधे फारशी गोडी वाटेल अस वाटत नाही." हरिभाऊ म्हणाले व त्यानी ते पुस्तक आपल्या कोटाच्या खिशात ठेवून दिले.

पुस्तकाच्या नावावरून हरिभाऊना काशीताईंची आठवण झाली, म्हणून त्यानी त्यांची सहज चौकशी केली. गोविंदराव म्हणाले,

"हो, बरी आठवण झाली. हल्ली तिनं एक कादबरी लिहावयास घेतली आहे!"

"काय कादबरी?" हरिभाऊच्या स्वरात परिपूर्ण आश्चर्य भरलेले होते.


मराठी साहित्याची प्रभा वाढविणारी हीच ती अनमोल लेणी

कै. वामन मल्हार जोशीकृत

**रागिणी ○ सुशीलेचा देव**

| | |
|---|---|
| पुरस्कार—श्री. काकासाहेब गाडगीळ | ★ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी |
| प्रस्तावना—डॉ. ह. रा. दिवेकर | ★ प्रि. कु. सुलभा पाणदीकर |
| पृष्ठे ५६८, मूल्य ९.०० | ★ पृष्ठें २३६, मूल्य ४.०० |

टपाल खर्च निराळा

**बलवंत पुस्तक भांडार, मुंबई ४**

" हो कादबरी ! ' रगराव ' नावाची ! परंतु मध्यंतरी तिच्या वाचनामध्ये ' पुणे-वैभवा 'चे अक आले आणि त्यांतील तुमच्या कादंबऱ्याची काही प्रकरणं पाहून तिनं आपली कादवरी अर्ध्यावरच टाकून दिली ! "

" छे छे, काहीतरीच; पण कारण तरी काय ? "

" कादंबरी लिहावी तर ' पुणे-वैभवां 'तल्यासारखी, नाहीतर लिहू नये, असं तिच्या मनानं घेतल आणि मग तिनं आपल लेखनच बद केलं. ! "

" अहो पण ' पुणे-वैभवा 'तील कादंबरी माझी आहे, असं त्याना कोणी सागितलं ? "

" तिनं आपल्या वधूराजाना पत्र लिहून ते शोधून काढलं. "

" कोण वधूराज ? "

" तुमच्या वर्गात बापट नावाचे तुमचे मित्र आहेत ना ? "

" ओहो ! मला ठाऊक आहेत ते ! "

" आता कॉलेजच्या पहिल्याच दिवशी त्यांना जाब विचारा म्हणजे झालं ! "

" आता मी डेक्कन कॉलेजात कशाला जातोय ! नवीन निघालेल्या फर्ग्युसन कॉलेजात मी आता नाव घातल आहे. "

" वा, वा, छान. म्हणजे गोपाळरावजीचा पुन्हा सहवास घडेल ! "

" हो, ते काही आता चुकायचं नाही. बरं पण तुम्ही तुमच्या मिसेसना कादवरी पुरी करण्यास सागत का नाही ? "

" मी खूप सांगून पाहिल पण ती काही केल्या तयार होत नाही. तुम्ही अस करा, तिन लिहिलेली प्रकरणं मी तुमच्याकडे पाठवून देतो, ती वाचून तुम्हीच तिला एक पत्र लिहा... "

" अवश्य ! मोठ्या आनदान ! ! "

* * *

' रंगराव ' कादंबरीचे हस्तलिखित हाती पडले आणि हरिभाऊंनी रात्री खूप वेळ वसून ते वाचून काढले. त्यातील राधाबाईचे व्यक्तिचित्र वाचताना तर ते कमालीचे रमून गेले. वाचता वाचता ते मनात म्हणत होते—

' वा:, कमाल केली आहे मिसेस कानिटकरांनी ! "

' राधाबाईसारखं पात्र निर्माण करण्याचं सामर्थ्य तुमच्या लेखणीत असताना तुम्ही माझी कादवरी वाचून हातपाय गाळावे हे विचित्र नाही काय ? जर जुन्या काळच्या प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचं चित्र मला दाखवा असं कोणी म्हणेल तर मी त्यास चटकन आपली कादंबरी वाच म्हणून सागेन...'

हरिभाऊ कादंबरी वाचत असताना शेजारीच मथू बसली होती. आपल्या नवऱ्याला कसला आनंद झाला आहे, हे त्या बिचारीच्या लक्षात येत नव्हते.

' कसला एवढा आनंद झाला आहे ?' असा प्रश्न विचारावा असे तिच्या मनातून सतरादा आले परंतु भीतीने व लज्जेने तिच्या तोंडातून शब्द बाहेर पडू शकले नाहीत.

कादंबरी वाचता वाचता अधूनमधून शेजारी गरीब गाईप्रमाणे बसलेल्या मथूकडे त्याचे सारखे लक्ष जाई. गोविंदरावांनी हॅम्लेटचे भाषांतर संपविले आहे, आणि आपल्या पतीला ते त्यातील काही उतारे वाचून दाखवीत आहेत, हे दृश्य त्याच्या मनश्चक्षूसमोर सारखे रेंगाळू लागले.

काशीताई व गोविंदराव याच्या तृप्त संसाराचा पट दृष्टीपुढे रेंगाळत असतानाच हरिभाऊ एकदम उठले व काशीताईंना पत्र लिहिण्यासाठी त्यानी कागद पुढे घेतले. " कुणाला ? " न राहवून मथूने विचारले. " बाई ग, तुला काय कळणार यातलं ? " राधा वाढा आणि उष्टी काढा, यातच स्वर्ग मानणाऱ्या स्त्रियाच्या जातीतील तू ! "

हरिभाऊंच्या या उद्गाराने मथूला अतिशय वाईट वाटले. त्याचवेळी पत्र लिहावयाचे परंतु मायना काय लिहावा, या विचारात हनुवटीला पेन लावून हरिभाऊ बसले होते.

" सौ. कानिटकर यांस..." छे, त्यांनी कागद टरकावून टाकला.

सौ. वहिनी...? छे, तेही नको...मग मिसेस कानिटकर...? नको ! नको ! !

रंगराव कादंबरीतील अबूताई हे पात्र स्वत.वरून त्यांनी लिहिले नसेल कशावरून ? मनात प्रश्न आला आणि त्यांना तात्काळ लिहिले.

" सौ. अंबूताईस बालके हरीचा साष्टांग नमस्कार ' आणि एका दमात ही अक्षरे कागदावर उतरविल्यानतर त्याना किती हायसे वाटले !

" अबुताई, तुम्ही स्वत स आळशी व भित्र्या समजण्याचे कारणच काय ? अहो आम्हास अहोरात्र लेखनवाचनावाचून काही एक करावयाचे नसते, परंतु आमच्या हातून दिवसातून दीडदोन तास अभ्यास होण्याची मारामार आणि ज्या तुमच्या उष्टया खरकट्याखाली सदा खट्टा मोकळा होतो व केरपोतेऱ्याखाली मानेचा काटा मोडून जातो, आणि त्यातही क्षणभर इकडे तिकडे करून कोठे वाचावयास बसले तर ते किती चोरून ! न जाणो बाई, सासूबाई, जाऊबाई काय म्हणतील ? भाऊजी, मामंजी काय म्हणतील ? वन्सं काय म्हणतील ? हरएकाची भीती ! जो येईल त्याचा उपर जबरा आहेच ! आपल्याला क्षणाचीही उसंत नसणार ! असे असता व इंग्रजीचा गंधही नसता तुम्ही कादवरी लिहून जर आपल्यालाच आळशी व भित्र्या म्हणवून घेऊ लागला तर मग आम्हाला कोणची याच्या पलिकडची पदवी येणार आहे न कळे ! ...',

मनामध्ये अशा विचाराची गर्दी चालू असतानाच हरिभाऊंनी शेजारी हिरमुलेल्या मथूला म्हटले–" ह काय लाडूबाई, झोप येत नाही वाटतं अजून ? "

हरिभाऊंच्या शब्दांनी मथू कावरीबावरी झाली. आईवेगळी पोर म्हणून माहेरी तिच्या आजीने तिला लाडाने वाढविले होते आणि सासरी देखील घरी काम करण्याची सवय नसल्याने व बनूआजी व चिमामावशी यांची ती अतिशय लाडकी असल्याने तिला फारसे काम पडत नसे. आपल्या पत्नीने गृहकृत्यात अतिशय कर्तबगार असावे व घरातील सगळी कामे उरकून चार अक्षरे लिहिण्यावाचण्याला शिकावे यासाठी गेले वर्षभर हरिभाऊंनी खूप प्रयत्न केले होते; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नव्हता. शनिवारी कॉलेजातून घरी आल्यावर हरिभाऊंनी तिच्या हातात अकलिपी व पाटीपेन्सिल देऊन तिला शिकविण्याचा प्रयत्न करावा, परतु आजेसासूचे वा कोणाचे तरी नाव सागून तिने एकदोन क्षणातच पळ काढावा, असे नेहमीच होई. कित्येक वेळा तर गेल्या शनिवारी आणून दिलेले अकलिपीचे पुस्तक व पाटी-पेन्सिलही जागेवर नसावयाची त्यामुळे हरिभाऊ मनातून खट्टू झाले; तरी तिची खूप थट्टा करून तिची गमत करण्यात त्याना मौज वाटे.

गेल्या वर्षी माडीवर अकलिपीचे पुस्तक घेऊन ती र ट फ करीत बसली असता सहज चिमामावशी वरती आल्या व तिच्या हातात पुस्तक पाहून त्यानी सारे घर डोक्यावर घेतले होते. खूप आरडा-ओरडा केल्यानंतर तिने मथूला प्रेमाने जवळ घेतले व तिचे सांत्वन करता करता विचारले,

" पण काय ग मथू, तुला लिहायला, वाचायला सागतं कुणी ?"

मथूने लाजत लाजत तिकडून दर शनिवारी आल्यावर पुस्तक घेऊन बसण्याचा आग्रह होतो असे सागितल्यावर तर चिमामावशी एकदम दुखावल्यासारखा चेहरा करून आपल्या वहिणीला म्हणाल्या,

" बगूताई, मुल घडघडीत या घरात आमचा अपमान करू लागली. आता तूच सांग, या घरात राहण्यात काय अर्थ आहे बरं !"

चिमामावशीनी एवढा गहजब जरी केला तरी मथूला हरिभाऊंपाशी ही गोष्ट काढण्याचे धैर्य झाले नव्हते. अधूनमधून माहेरी गेल्यानतर तिकडेही आजीसमोर पुस्तक उघडणे अशक्य होते, त्यामुळे आपले सारखे कुठे ना कुठे चुकते, आपण कोणालाच आवडत नाही अशा एकलकोंडया स्वभावाची ती बनत चालली होती.

—'रगराव' कादंबरी वाचताना पुन्हा एकदा हरिभाऊंना आपल्या पत्नीच्या अशिक्षितपणाचे वैषम्य वाटू लागले. त्यानी ती कादंबरी तशीच समोरच्या टेबलावर ठेवली आणि पेंगुळलेल्या डोळ्यानी आपल्याकडे एकटक पाहणाऱ्या आपल्या पत्नीला त्यांनी प्रेमाने जवळ घेतले आणि अत्यत मृदु आवाजात विचारले,

" ए ऽ आम्ही विचारलेल्या एका प्रश्नाचं उत्तर द्यायचं ना !"

आपल्या पतीला आपली पुन्हा कसलीतरी थट्टा करण्याची लहर आली असे समजून तिने मान खाली घातली.

" ए, अशी वर बघ पाहू !" तिची हनुवटी वरती उचलून त्यानी तिच्या नजरेला नजर भिडवली.

" काय?" तिने अस्पष्टसा प्रश्न केला. "आम्ही सागू ते निश्चितपणे करणार अस वचन दिल्याखेरीज आम्ही बोलणार नाही बर का !"

परंतु तिने काहीच उत्तर दिले नाही.

" ए ऽ साग ना ?"

हरिभाऊनी पुन: पुन्हा तिला विचारले तेव्हा ती म्हणाली,

" मी काय आपल्या वचनाबाहेर आहे का ? "

" अगदी माझ्या गळ्याशपथ !"

" हो गळ्याशपथ !"

" मग आजपासून नियमान लिहायला वाचायला बसणार म्हणून शपथ घे पाहू !"

हरिभाऊनी आपला हात पुढे करून तिला वचन द्यावयास सांगितले तरी बराच वेळ ती विचार करीत बसली. परंतु नतर एकदम तिच्या अंगात मोठेच धैर्य संचरल्यासारखे झाले आणि तिने मोठ्या आत्म-विश्वासाने व निर्धाराने आपला हात हरिभाऊंच्या हातावर ठेवला.

: ७ :

—फर्ग्युसन कॉलेजातही हरिभाऊचा पुस्तके वाचण्याचा नाद वाढतच गेला. गणिताची सडकून तयारी करावयाची अशी मनोराज्ये ते रचीत असले तरी क्षणोक्षणी वाळूच्या किल्ल्याप्रमाणे ही मनोराज्ये ढासळत होती. उलट बळवंतराव टिळक गणित शिकवीत असताना हरिभाऊ मागच्या बाकावर बसून कादंबऱ्याची पारायणे करीत.

गोविंदराव कानिटकराच्याकडे सुटीमध्ये झालेल्या बैठकीतून 'मनो-रजन' नावाचे मासिक काढण्याची कल्पना तयार होऊन हरिभाऊंच्या खटपटीमुळे ती प्रत्यक्षात आली आणि त्यामध्ये सुरुवातीपासूनच हरि-भाऊनी 'गणपतराव' नावाची कादबरी लिहावयास घेतली.

गोविंदरावांच्या सान्निध्यात, पति-पत्नी दोघेही सुशिक्षित असले, समजूतदार असले म्हणजे जीवनाला कशी सुसस्कृतता येते, याचे रम्य चित्र त्याच्या डोळ्यासमोर होते. त्याउलट एका महत्त्वाकांक्षी तरु-णाची आपल्या अशिक्षित पत्नीला सुशिक्षित व समजूतदार करण्याची धडपडही त्याना तितकीच प्रलोभनीय वाटत होती. याच त्यांच्या कल्पनाविश्वातून त्यांची दुसरी कादबरी 'गणपतराव' 'मनोरजन'-मधून क्रमश: येऊ लागली.

'फर्ग्युसन'ची परीक्षा झाली आणि दुसऱ्या वर्षीही हरिभाऊंना गणिताने दगा दिला. बातमी ऐकून तर अण्णासाहेबांचा संताप अनावर झाला. गेल्या काही दिवसात अण्णासाहेबांना आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप होत होता. आपल्या बधूनी—नारायणरावानी अत्यत तुटपुंज्या मिळकतीवर अनेक नातेवाईकाचा गोतावळा आस्थेने साभाळावा आणि आपण मात्र खोऱ्याने पैसा ओढत असूनही तो व्यसनाधीनतेत घालवावा, याचे त्यांना फार वाईट वाटत होते; म्हणूनच हरीने तरी निदान आपला व्यवसाय पुढे साभाळावा व घर सांभाळावे असे त्याना वाटत असताना हरी मात्र दरवर्षी न चुकता नापास होत होता. आपला हरी नादान बनला आहे, असे उद्गार ते येणाऱ्या—जाणाऱ्याजवळ काढीत होते. आणि त्याचे ते उद्‌गार ती माणसे हरिभाऊना ऐकवीत असत. अण्णासाहेबानी आपल्यावर इतके प्रेम करावे आणि आपण मात्र कॉलेजची साधी पहिल्या वर्षीची परीक्षा देखील पास होऊ नये ही गोष्ट त्याच्या मनाला सारखी खात होती.

परीक्षेतील अपयशाने मनाला आलेली खिन्नता दूर करण्याचा एक मार्ग म्हणजे आवडत्या ग्रथाचे वाचन व लेखन यामध्ये रममाण होणे तशा रीतीने रममाण झाले असता आजूबाजूला चाललेली स्त्रियाची कुचबणा आणि पुरुषाची अरेरावी त्याना क्षणोक्षणी अस्वस्थ करीत. कॉलेजच्या वसतिगृहावरून दर शनिवारी घरी यायला सापडे, तेवढचा वेळात मथूने काही तरी लिहावे—वाचावे म्हणूनही त्यांची धडपड असे.

एकदा शेजारच्या एका बालविधवेसबधाने काही गोष्टी हरि-भाऊंच्या कानावर आल्या. त्यावर मथू म्हणाली, " काय करणार विचारी ! बाप जिथे लोटतील तिथे मुलीना गेलच पाहिजे. पुरुषाचं आपलं बरं !"

" अग, पुरुषांच तरी काय बर आहे ? आपल तुमच्यापेक्षा एक रतिभर बर झाल ! नाहीतर मुलाची तरी लग्नं होताना कोण त्याना विचारतो ? बापान करून दिलेल्या मुलीबरोबर मुकाट्यानं ससार केला पाहिजे. त्यातल्या त्यात एखाद्याचं नशीब चागलं असेल तर त्याला आपल्यासारखं रत्न मिळतं. पण सगळ्यांचीच कुठे नशीबं चागली असतात ?

" हो ? मी रत्न का ? इश्श मेल, काय पण रत्न ! आता घरात दिवे म्हणून लावायला नकोत ! आपलं आवडवून घ्यायच झालं. पण मी विचारते, असं खरच वाटत का ? का आपली सासूबाईंनी करून दिली म्हणून कशी तरी नादवायची ?'

" काही अशी तसंच खरं ! एखाद दिवशी ल्याहाय-वाचायला सांगितल्यावर ऐकल नाही म्हणजे मग तसच वाटायला लागत. "

" मी ऐकत नाही म्हणून इतकं का वाईट वाटायच ? मला काही वाचावस वाटत नाही अस नाही, पण मेली लाज वाटते. अजूनही अस वाटतं की बायकांनी काय करायचं वाचून ?"

" असं जर तू आताच म्हणशील तर मग पुढलं ते इग्रजीन् विंग्रजी कस होईल ?"

" बर तर, रोज अगदी नेमानं यापुढ वाचीत जाईन !"

" उगीच नाही तुला रत्न म्हणत मी..." हरिभाऊनी तिला सोपी सोपी मराठी पुस्तके दिली व ते त्या दिवशी कॉलेजला निघून गेले.

पुढच्याच आठवड्यात गोविंदरावांचे पत्र आले आणि काशीताईंचे शिकणेसवरणे अतिशय वेगात चालले आहे, इतकेच नव्हे तर त्यानी परदेशात जाऊन आलेल्या 'डॉ. आनदीबाईंचे चरित्र' लिहावयास घेतल्याची हकिकत विस्ताराने कळवली होती. बुद्धिमत्ता, त्याहिपेक्षा विलक्षण उत्साह आणि कडेलोट मेहनत या त्रयीची काशीताईंच्या ठिकाणी जुळणी झालेली होती.

पुढच्या आठवड्यात एके दिवशी सध्याकाळी हरिभाऊ घरी आले. मथू घरी आपली वाट पाहात बसली असेल, आणि आपण दिलेली सगळी पुस्तके वाचून झाली, हे सागण्यासाठी आतुर आली असेल, या कल्पनेने झपाझप पावले टाकीत ते जिना चढून माडीवर गेले.

मथू अथरुणावर शांतपणे झोपी गेली होती आणि जवळपास पुस्तकांचा मागमूसही नव्हता. त्यांनी तिला जोरजोरात हलविले.

हरिभाऊंची चाहूल लागताच घाबरीघुबरी होऊन डोळे चोळत मथू उठून बसली.

" काय ग, किती पुस्तक वाचून झाली ? " त्यांच्या या प्रश्नाने बळी द्यावयास निघालेल्या कोकरासारखा चेहरा करून काही न बोलता ती खाली पाहू लागली. हरिभाऊंना कधी नव्हता इतका संताप आला.

" काय ग ? मी काय विचारतोय ?" त्यांनी नेहमीपेक्षा थोड्याशा जोरानेच प्रश्न केला.

तरीही ती गप्पच राहिली.

" मी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं नाही असं तू ठरविल आहेस काय ? काय ग, दातखिळी का बसली ?"

आणि काहीच न सुचून मथूने जामई दिली व तिने डोळे मिटलेले पाहून हरिभाऊंचा सताप अनावर झाला. त्यांनी तिला गेल्या आठवड्यात आणून दिलेले पुस्तक आणावयास सागितले. मथूला ते पुस्तक काही केल्या सापडेना तेव्हा त्यानी तिला ताडताड बोलून घेतले.

" दगड आहात झाल ! आमच्याच नशिबी तुम्ही याव ना ! इलाज नाही झाल ! आलिया भोगासी असावे सादर ! दुसर काय ? तू सुशिक्षित व्हावस म्हणून आणखी आम्ही काय कराव ? कुठल्या देवाला नवस बोलू ते तरी एकदा साग, म्हणजे तसं तरी करू !"

हरिभाऊंच्या या वाक्ताडनानी- मथू एकदम ओक्साबोक्शी रडू लागली, तेव्हा हरिभाऊ मनात वरमले; त्यांनी जवळ जाऊन समजुतीने सागितले.

" अग, मी तुला काही अनेक भाषा शिकायला सागतो आहे का ? आपली स्वत:ची भाषा देखील आपल्याला येऊ नये व येत नसल्यास शिकण्याची इच्छा असू नये हे चागलं का ? "

मथू पुन्हा ओक्साबोक्शी रडू लागली. मथूच्या मनातून सारखे येत होते की, हरिभाऊना त्यांच्या गैरहजेरीत घरी काय प्रकार घडतात ते एकदा सागून टाकावे, परतु हरिभाऊंच्या अभ्यासात व्यत्यय नको म्हणून ती स्तब्ध राहिली.

मथू रडायची थांबली आणि आपला मनक्षोभ शात करण्यासाठी हरिभाऊ काशीताईंना पत्र लिहावयास बसले मथूच्या शिक्षणाच्या बाबतीत आपण कसे निराश झालो आहेत हे लिहिल्यानतर शेवटी लिहिले,

"काशीताई, तुम्ही तरी आपल्या भावजयीस एखादे पत्र लिहून तिची कानउघाडणी करून पाहा. आता तेवढाच काय तो उपाय बाकी राहिलाय ! "

आणि काशीताईंनी लगेच पुढच्या आठवड्यात मथूच्या नावाने एक पत्र पाठविले.

ते पत्र मथूच्या हातात पडल्यानतर बराच वेळपर्यंत बसून तिने ते एकेक अक्षर लावून वाचून काढले.

" आता काशीताईंना पत्राचं उत्तर पाठवावयाचं बरं का !" हरिभाऊनी सागितले.

" इश्श ! मी कसली पत्र लिहिते ! "

" ते काही नाही. तुला त्याच उत्तर पाठविलच पाहिजे. नाहीतर त्या काय म्हणतील !"

हरिभाऊनी खूपच सांगून पाहिले परतु काही केल्या मथूला धीर होईना. हरिभाऊनी त्या दिवशी काही केल्या माघार घ्यावयाची नाही असे ठरविल्यामुळे तिचा अगदीच नाइलाज झाला आणि दऊत-टाक घेऊन ती एकदाची पत्र लिहावयास बसली.

" माझ सगळ लिहून होईपर्यंत आपण वाचायच नाही बरं का ! " तिने अट घातली.

' बरं बुवा, कबूल ! एकदम कबूल !! '

मथूने एखादे अक्षर लिहावे आणि तो कागद फाडून टाकावा असे बराच वेळ चालले.

" अहो, बाईसाहेब, एका वर्षासाठी लागणारे कागद एकाच रात्री तुम्ही सपविणारसं दिसतय ! " हरिभाऊ मध्येच चेष्टेने म्हणाले.

" इश्श, असं तुम्ही चिडवायला लागलात तर मी मुळी लिहिणारच नाही—" आणि ती फुरगटून बसली.

" बर आमचं चुकलं ! मग तर झाल !! चला चालू द्या ! ' हरिभाऊनी शरणागती स्वीकारली.

मध्यरात्रीपर्यंत बसून मथूने कसेबसे एकदा पत्र लिहून पुरे केले. त्या अगोदर एकदोन वेळा हरिभाऊंनी टेबलावर डोकावण्याचा प्रयत्न केला तर पत्रावर आडवे पडून मथूने ते पत्र अगावरच्या लुगड्याने कितीदा तरी टिपून घेतले होते.

" नाही हा ! सार झाल्याखेरीज नाही दाखवायच आमचं पत्र !! "

सरतेशेवटी एकदा भ्रमाचा भोपळा फुटला लिहिलेले पत्र हाती आल्यानतर वाचता वाचता हरिभाऊ खो खो हसत सुटले.

" सवभागवती कासीताईस माजे साटाग नमस्कार—बाबा काय पण मजकूर लिहिलाय ! एवढ्या सगळ्या शाईच्या पर्वतप्राय डागातून हे शब्द लावायला प्रत्यक्ष परमेश्वर आला पाहिजे ! अरे, हा कोठला शब्द

बुवा ? ' र सव ' –, हां हां न्हस्व ! बापरे, आजपर्यंतचे सारेच ग्रंथ चुकले आहेत. थांब, अगोदरच्या डाकेतून पत्र पाठवून काशीताईंना पत्र लिहून पोट दुखू नये म्हणून अगोदरच औषधाची तयारी करण्यास लिहून कळवितो. नाहीतर असं करू, लंडनमध्ये हल्ली प्रदर्शन चाललं आहे, त्यामधे मुद्दाम आवर्जून ठेवण्यासाठी हे पाठवून देऊ. "

हरिभाऊंच्या मडिमारांनी ती रडवेली झाली. त्यांच्या हातांतून ते पत्र हिसकावून घेऊन ती कृतककोपाने म्हणाली,

" बरं, इतकं हिणवायला नको काही. मला येईल कधी तरी चांगलं ! "

काशीताईंचे पत्र आल्यापासून मथुला लिहिण्यावाचण्याचा हुरूप आला तरी घरातील लोकांची घालून पाडून बोलणी वाढतच गेली. दिवाळीच्या सुटीत काशीताई पुण्याला आल्या होत्या म्हणून मुद्दाम त्यांना जाऊन भेटण्याचा लकडा हरिभाऊंनी सारखा लावला. माहेरी जाण्याचे निमित्त करून ती एकदा त्यांच्याकडे गेली. हळूहळू सासरी ही गोष्ट कर्णोपकर्णी होऊन फारच आरडाओरडा झाला. ती मनोमन अधिकच धास्तावली. परंतु त्यांना जाऊन भेटण्याबद्दल, त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याबद्दल दररोज हरिभाऊ तिला आग्रह करीत. होते. एके दिवशी अशीच चोरून ती काशीताईकडे आली आणि डोळ्यांत अश्रू आणून म्हणाली, " अहो, तुम्ही तरी आमच्या घरी सांगा की, आम्हांस इथे येण्याकरता असा त्रास देऊ नये. आपण कॉलेजात असायचं; पण आमच्या हातात उगीच एक कागदाचं चिटोरं पाहिलं की, नाही नाही ती बोलणी सोसून घ्यावी लागतात. आम्हांला शिकावंसं का वाटत नाही ? अगदी अतिशय वाटतं; पण एक पाच मिनिटं शिकणं होतं आणखी त्याबद्दल टोमणे खावे लागतात महिनो महिने ! त्याला कसं करावं ? आता कालच आले ना मी तुमच्याकडे, पण तेवढ्यामुळेच माझ्याशी मंडळीचा अबोला ! अशा रीतीनं आम्ही जगू कशा याचीच पंचाईत ! "

दुसऱ्या दिवशी खाली मान घालून हरिभाऊ समोर पानात पडेल ते खात होते, इतक्यात चिमामावशी म्हणाल्या,

" तात्या, आजच गोखल्यांच्या घराकडून निरोप आलाय. "

" कसला ? "

" आपल्या मुलीला जाच होतो म्हणून "

" अग–पण तू हे सगळं मला काय सांगतेस ? "

हरीभाऊंचे मन उद्विग्न असतानाच मावशीने पुढे सांगितले–

" शिकण्याचा जाच होतो तिला...... "

हरिभाऊ तसेच पानावरून आंचवायला उठले.

मनातल्या विचारांच्या वावटळींना उतारा म्हणजे नेवाशास काशीताईंना पत्र लिहून आपल्या मनातील साऱ्या व्यथा त्यांना लिहून कळवाव्यात असा आता हरिभाऊंचा दंडकच झाला होता.

पत्राचे साहित्य घेऊन ते बसले त्यावेळी त्यांचे एक मन गोविंदरावांच्या चुलत्यांनी सांगितलेल्या हकीकतीत गुंतलेले होते.

कालचा सुटीचा दिवस म्हणून हरिभाऊ ' मनोरंजन ' ऑफिसमध्ये आलेली वृत्तपत्रे चाळीत होते, त्यावेळी गोविंदरावांचे चुलते तेथे येऊन दाखल झाले.

बोलता बोलता म्हणाले,

" हरिभाऊ, मी काही दिवसांपूर्वी मुंबईस असताना आण्णासाहेबां-



" सवभागवती कासीताईस...... '

कडे एक दिवस गेलो होतो. त्या रात्री सुमारे दोन वाजेपर्यंत आमच्या गोष्टी चालल्या व त्यात मुख्य विषय तुम्ही होता ! "

त्यांचे बोलणे ऐकून हरिभाऊंनी डोळे विस्फारून विचारले,

" एवढं माझ्यासंबंधानं काय बरं चाललं होतं ? "

" तुमच्या चुलत्यांचा तुमच्यावर थोडासा राग आहे ! "

" होय, आहे, मला ठाऊक आहे, आणि त्याचं कारणही मला ठाऊक आहे ! "

" काय बरं ? "

" मी अजून बी. ए. झालो नाही हे. "

हरिभाऊंच्या या उत्तरावर नारायण बापूजींनी मान हलविली व ते पुढे म्हणाले,

" वास्तविक पाहता आण्णासाहेबांचा तुमच्यावर अत्यंत जीव आहे असं त्यांच्या बोलण्यावरून दिसलं, कारण ते म्हणाले,

" नारायणराव, तुम्हीच पाहा आमच्या कुटुंबाची स्थिती कशी झाली आहे ती ! आम्ही चौघे बंधू. त्यांपैकी आम्ही तिघे कुटुंबाच्या उपयोगाला काहीच पडत नाही. मी तो हा असा ! माझ्या पाठचे तर कोणाच्याही कामाचे नाहीत. येऊन जाऊन आमचे वडील बंधू नानाच काय ते कुटुंब चालवीत आहेत; परंतु ते आता थकत चालले आहेत; थोड्याच दिवसांत पेन्शन घेतील आणि त्यांचं पेन्शन काही साऱ्या कुटुंबास पुरेल इतकं असणार नाही. हा हऱ्या अजून बी. ए. ही झाला नाही. या उपर तो बी. ए. होऊन, एलएल. बी. होऊन वकिलाचा धंदा करावयाला लागणार ! कसचं काय आणि कसचं काय ? यानं जर घाई केली नाही तर कुटुंबाचं होणार होणार कसं ? यानं यावेळी

एल्एल्. बी. होऊन माझ्या धंद्यात शिरायचं, निदान माझ्याजवळ तरी बी. ए. होऊन यायचं ! ते काही नाही. तो तुमचा मित्र आहे; अजून तुम्ही त्याला सांगा व त्याला लवकर बी. ए. होऊद्या. तो काही लहान नाही. त्याचं त्याला समजू लागलं आहे. त्यानं ग्रंथ वगैरे लिहू नयेत, असं माझं म्हणणं नाही, परंतु आधी आपला धंदा पाहावा, व मग काय ते करावं. मी परवा पुण्यास गेलो होतो, तर त्यावेळी आपल्या माडीत दहापाच मंडळी जमा करून तो खुशाल गप्पा मारीत बसला होता ! आपल्या डोळयांपुढे कुटुंबाची पुढील स्थिती असताना हे आमच्यानं कसं पहावेल वरं ? "

नारायण बापूजींकडे झालेला हा संवाद काही केल्या त्यांच्या मनातून बाहेर जात नव्हता. आण्णासाहेबांनी लहानपणापासून हरिभाऊंवर पुत्रवत प्रेम केले होते व त्याच्या कल्याणाचीच ते सदैव चिंता वाहात याची जाणीव त्यांना असली तरी आपण मित्रमंडळीबरोबर टवाळक्या करीत व्यर्थ काळ घालवितो, असा खोटा आरोप त्यांनी करावा, यापरते दुर्दैव ते कुठले ?

हरिभाऊंची उद्विग्नता यापुढे अधिकच वाढली. परीक्षा ! परीक्षा ! ! परीक्षा ! ! ! काय भयंकर स्तोम माजवून ठेवलं आहे या परीक्षांनी ! काय अर्थ आहे या परीक्षांत ! परीक्षा दिल्यानंच आपणांला ज्ञान पैदा होतं असं थोडंच आहे ? परीक्षा देऊन कृतकृत्य झालेल्या लोकांना असणारं ज्ञान जर आपण परीक्षांवाचून संपादन करून घेतलं तर त्यात काय कमी आहे ? बी. ए. या दोन अक्षरांत तर साऱ्या ज्ञानाचा गड्डा भरून ठेविलेला नाही ना ? जर तसं असतं तर अशा ज्ञानाचा गड्डा मिळविलेले लोक काय थोडे आहेत ? त्यांच्या सोमवत्या घाला सोमवत्या !'

संतापाची लाट अशा रीतीने उसळून आली तरी थोड्या वेळाने त्यांच्या मनात दुसरेच विचार येऊ लागले.

'अरे बाबा, पण जे लोक तुझ्या बी. ए. होण्यासाठी एवढा विचार करतात ते तुझ्या बऱ्यासाठीच करतात ना ? तू पास होण्यानं तुझा फायदा आहे का त्यांचा ? विनाकारण त्या साऱ्यांना मूर्खांच्या कोटीत ढकलण्यात अर्थ आहे ? त्या साऱ्यांना मूर्ख समजण्यापेक्षा स्वतःलाच का समजत नाहीस ! ते काही नाही. तीन वर्षात तुला बी. ए. झालंच पाहिजे.'

* * *


काहीही करून तीन वर्षांत आपण बी. ए. होणारच अशी प्रतिज्ञा हरिभाऊंनी त्या दिवशी केली तरी त्यामध्ये त्यांचे मन फारसे कधी रमले नाही. नाहीतरी त्यांचे मन मोठे चमत्कारिकच ! ज्या गोष्टीत ते तल्लीन होऊन जाईल, तीच गोष्ट कशाचाही विचार न करता ते करीत राहतील ! मग आपले नातेवाईक वा इतर लोक काहीही म्हणोत !

गोविंदरावांनी दिलेले मिल्लचे पुस्तक वाचून स्त्रियांच्या परवशतेच्या कल्पनने ते असेच झपाटल्यासारखे झाले होते आणि स्त्रीशिक्षण, स्त्रीसुधारणा वगैरे गोष्टी झपाट्याने झाल्या पाहिजेत असे त्यांना वाटू लागले होते. त्यांचे हृदय मुळातूनच अतिशय कोमल आणि त्यांना घराघरातून चाललेली स्त्रियांची दुःखे जसजशी अंतःकरणाला भिडू लागली, तसतसे ते अधिकाधिक अस्वस्थ होऊ लागले. बाकी सुधारक म्हटल्यानंतर साहजिकच त्यांच्या डोळ्यांसमोर कानिटकर पतिपत्नींचे चित्र उभे राहात असे. काशीताईंना तर त्यांनी मनोमन स्वतःची बहीण मानले होते. त्या मानाने स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्या रावसाहेब, रावबहाद्दुरांबद्दल त्यांच्या मनात तिटकाराच होता. त्यांचा पोकळ मोठेपणाच काय तो पाहून घ्यावा ! हे कोण ! हे रावबहाद्दूर ! यांच्या बोलण्यावर काही बोलू नका ! होस हो द्या ! किती झाले तरी मोठे ते ! हे कोण ? हे C. I. E. ! हे आले म्हणजे उभे राहा व त्यांना मानपत्र द्या ! मानपत्रे द्या की फानपत्रे द्या, तो दिवस गेला की, यांच्या मोठेपणाची इतिश्री झालीच. ज्यांना खरोखर मोठेपणा नको त्यांनी हात मिळवून सुखी व्हावे. आण्णासाहेबांच्या तोंडून त्यांचा मोठेपणा ऐकावा. त्यातल्यात्यात मग आमचे आण्णासाहेब बरे !

असल्या कुठल्याही लोकांच्या संगतीपेक्षा मिल्ल-स्पेन्सरसारखे तत्त्ववेत्ते, जॉर्ज इलियट, डिकन्स, झोला यांसारखे कादंबरीकार, थ्युसिडिडिस व ग्रोटसारखे इतिहासकार, शेक्सपियर, व्हिक्टर ह्यूगोसारखे कवी, डार्विन, टिंडॉलसारखे शास्त्रज्ञ इतक्या सगळ्यांना आपण आपल्या लहानशा—मग ती अतिशय ओंगळ किंवा कशीही असो—खोलीत बोलावून आणून त्यांच्याशी हवा तितका वेळ बोलावेसे वाटते. या जगद्वंद्य लोकांना नसता मान द्यावा लागत नाही. त्यांच्याशी अदबीने वागायला नको. पालथे पाडा, ते कधी रागावत नाहीत. त्यांच्याजवळ जे काही आहे ते खुशाल घेऊ देतात. आता तुम्ही जा, आमच्या कामाची वेळ झाली असे म्हणत नाहीत. तेव्हा अशांचा समागम हवा तेव्हा, हवा तसा घडवून आणण्याचे आपल्या हातांत असल्यावर, दुसऱ्या यःकश्चित पण समाजाने मोठ्या मानलेल्या गृहस्थाकडे जाऊन, काही वेळ खाली मान घालून, काही वेळ उभे राहून ते मूर्खाप्रमाणे बोलले असता मनात वाईट वाटूनही बळेच ओठ वाकडे करून हसण्याच्या मिषाने दात दिसले न दिसलेसे करून, आश्चर्योत्पादक गोष्ट नसताही आश्चर्य दिसलेसे, दुःखोत्पादक नसताही दुःख झालेसे दाखवून होस हो करण्याचा तिटकारा का येऊ नये ? ते ज्या विकाराच्या गोष्टी सांगतात ते विकार आपल्या मनात उत्पन्न होतातच. मिष करावे लागते ते खोट्यां-मोठ्यांजवळ. पॉल व्हर्जिनियाचे चरित्र वाचताना आपल्याला रडण्याचे मिष करावे लागत नाही; आणि मोलियरची नाटके वाचताना हसण्याचे नाटक करावे लागत नाही.

हरिभाऊंच्या वृत्ती अशा तऱ्हेने आता लेखनधर्मावरच स्थिर होत आल्या होत्या. लौकिक परिक्षेतील अपयशाचा शाप त्यांच्यातील सहृदयतेमुळे आता उःशाप ठरत होता. हरिभाऊंना हळू हळू आपला धर्म सापडू लागला होता.

[ पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी ]



# श्री. ना. पेंडसे व्यक्ती व वाङ्मय

## : १ :

## एक रगेल व्यक्तिमत्त्व

अशोक महादेव जोशी

शिरूभाऊंची नि आमची ओळख झाली तेव्हा मी 'बच्चा' या सदरात मोडत होतो. आमची आणि त्यांची गट्टी कधी जमली आणि आम्हांला ते 'शिरूभाऊ' कधी झाले आणि त्यांच्या घरांत माझे वडील (पं. महादेवशास्त्री जोशी) हे 'बाबा' कधी झाले याचा इतिहास खरं सांगायचं म्हणजे मलाही त्यांनी 'लोकसत्ते'त लिहिलेल्या बाबांच्या परिचय-लेखावरूनच कळला. त्या आधी आम्हांला मोठ्या माणसात जास्त बसू नये इत्यादि पथ्ये सांभाळावी लागत होती.

**माझी ओळख**

माझा दाट परिचय होता तो 'गारंबीच्या बापू'शी, राजे मास्तरांशी आणि शिरूभाऊंच्या वाङमयीन कुटुंबाशी. सर्व मराठी वाचकांप्रमाणे मलाही या सर्व व्यक्तींनी भारून टाकले, आणि या अनुरोधाने त्यांचा जनक कसा असेल याचे काही आडाखे मी बांधले होते.

आणि माझे बहुतेक आडाखे बरोबर होते. व्यक्तिशः माझी आणि शिरूभाऊंची ओळख आमच्या प्रकाशनाचे नवे पुस्तक मुंबईला देण्यासाठी मी जेव्हा गेलो तेव्हा झाली. मला बाबांनी त्यांच्याकडे जाऊन ये असे सांगितले होते, म्हणून मी गेलो, आणि आता मला जाऊन ये असे सांगावे लागत नाही. त्यावेळी मी आमच्या प्रकाशनातर्फे नुकताच बाजारात हिंडू लागलो होतो. महादेवशास्त्री जोशी यांचा मुलगा म्हणून मला 'या बसा'ही होत होते. एखादा चहाचा कप अपेक्षा नसतानाही पुढे येत होता. पण शिरुभाऊंच्या घरी माझे 'अशोक' म्हणून स्वागत झाले. शिरूभाऊ बाबांशी जसे बोलले तसेच माझ्याशीही बोलले.

शिरूभाऊ फार कमी बोलतात. एखादा माणूस लोकलमध्ये भेटला आहे आणि शिरूभाऊंची नि त्याची मैत्री जमली आहे हा सुटसुटीत प्रकार शिरूभाऊंच्या बाबतीत मला तरी अशक्य वाटतो. कुणालाही मित्र म्हणविण्यापूर्वी ते ज्याला पारखून घेतील आणि यातून त्यांची जर खात्री झाली की या माणसाचे नि आपले जमू शकेल' तर मग ते त्याचे जिवाभावाचे मित्र बनतील. त्यांच्या 'या अशा स्वभावामुळे लोकांत त्यांच्याविषयी बरेच गैरसमज पसरले आहेत. याची कल्पना शिरूभाऊंनाही आहे. अर्थात त्याची ते फारशी पर्वा करीत नाहीत.

एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू या कादंबऱ्यांनी त्यांना साहित्यिक म्हणून मानाचे स्थान दिले. मुंबईची प्रोफेसर टीकाकार मंडळीही त्यांच्या 'अधिपती'ने भान हलविलेली दिसताच शिरूभाऊंना मानू लागली. 'मौजे'ने त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित केल्याने यावर शिक्कामोर्तबच झाले. पण यामुळे शिरूभाऊंच्यावर फारसा परिणाम झाला नाही. त्यांना आपल्या गुण-दोषांची पूर्ण कल्पना होती. ते कुणालाही (अर्थात् मित्र सोडून) माझी कादंबरी कशी वाटली म्हणून विचारणार नाहीत. एका विशिष्ट परिस्थितीत आयुष्य काढल्यामुळे स्तुतीही ते पारखून घेतात.

शिरूभाऊंच्या स्वभावाला खूप कंगोरे आहेत. कंगोरे कुणाला नसतात? पण शिरूभाऊंच्या बाबतीत फरक हा की ते हे कंगोरे लपविण्याच्या भानगडीत पडत नाहीत. 'मग आता जेवूनच जायचं' असे परिचिताला म्हणणारा हा माणूस 'कवाडीत पाय टाकलास तर तंगडं मोडीन' असे एखाद्या द्वाडाला म्हणायला कमी करणार नाही.

पु. लं. च्या अंतू बर्व्यासारखी माणसे जिथे घरोघरी आढळतात, अशा कोकणात १९१३ साली त्यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मस्थानाचे नाव मुर्डी. रँग्लर परांजपे यांच्यानंतर मुर्डी या नावाला शिरूभाऊंनीच उजाळा दिला. मुरूड येथे शिरूभाऊंचे मामा राहतात, महर्षी कै. अण्णासाहेब कर्वे, रा. सा. मंडलिक ही मंडळी मुरूडचीच.

**कोकणस्थ–लेखक !**

शिरूभाऊंचे बालपण दापोलीला गेले. मुर्डी, मुरुड, दापोली या त्रिकोणात शिरूभाऊंची सर्व पात्रे आढळतात. त्यांना या प्रदेशाचे विलक्षण आकर्षण आहे. ते मुंबईत असले तरी त्यांचे मन या परिसरातच रेंगाळते. सवड झाली की लोणावळा किंवा महाबळेश्वरला न जाता ते मुरूडला आपल्या मामाकडे जातात. वणदेचे पाणी चाखतात, व्याघ्रेश्वराचे दर्शन घेतात आणि मठात विसावतात. तिथे त्यांच्या चित्तवृत्ती बहरतात. गतस्मृतींना उजाळा मिळतो आणि एवढ्या शिदोरीवर पुन्हा तिथे परत येईपर्यंतचा काळ ते मुंबईत काढतात.

ज्यांनी 'गारंबीचा बापू' वाचून हा परिसर पाहिला त्यांची फार मोठी निराशा झाली. त्यांची कल्पना, इथे सतत निसर्ग फुललेला असेल, सगळीकडे हिरवेगार गालिचे पसरले असतील; सर्व कोंकणावर निसर्गाचा वरदहस्त आहे, पण हे कोकण दुर्दैवी आहे. इथे सुंदर हिरवे माळ नाहीत. इथे सर्व खडकाळ आहे. इथे पाण्यासाठी कोर्ट-कचेऱ्या होतात. इथे उजाड आहे, भकास आहे आणि तरीही शिरूभाऊंचे मन इथे रमते. का? काहीही कारण नाही. श्रद्धेला कारण नसते.

१९२६ मध्ये दापोली सोडून ते मुंबईस आपले मामा श्री. ग. पु. दामले यांचेकडे शिक्षणासाठी आले. दादर येथील छबिलदास हायस्कूलमध्ये ते शिकू लागले. १९३१ साली ते मॅट्रिक झाले. १९३३ साली ऐन परीक्षेच्या वेळी आजारी पडल्यामुळे त्यांना इंटरच्या परीक्षेला पूर्णपणे बसता आले नाही. त्याच वर्षी जनरल एज्युकेशन सोसायटीच्या ठाणे येथील शाळेत त्यांनी फ्रेंच शिक्षकाची नोकरी पत्करली. तिथे त्यानी १९३७ पर्यंत काम केले.

१९३७ मध्ये त्यांचे वडील एकाएकी निवर्तले.

शिरूभाऊंच्या जीवनातील ठळक प्रसंगापैकी हा एक प्रसंग आहे. शिरूभाऊ अजून संपूर्णपणे मार्गाला लागले नव्हते. जवळ शिल्लक असलेली माया शून्य. दोन भावांचे शिक्षण आणि दोघां बहिणींची शिक्षणे नि लग्ने व्हायची होती. ही सर्व जबाबदारी अवघ्या पंचविशीतच शिरूभाऊंच्या अंगावर पडली होती.

### मुंबईतील धडपड

शिरूभाऊंच्या पायात जी कोकणची रग दिसते, जिद्द दिसते ती उसनी नाही, अस्सल आहे याचे प्रत्यंतर शिरूभाऊंच्या इथून पुढच्या जीवनात येते. लहानपणी अबोल नि बुजरे असलेले शिरूभाऊ आता परिस्थितीशी निधड्या छातीने टक्कर देऊ लागले. या काळात त्यांच्या मामाची त्याना बहुमोल मदत झाली.

अशा विकट परिस्थितीतही त्यानी शिक्षण सोडले नाही. १९४२ साली ते बी. एस्सी. झाले. त्यावेळी ते म्युनिसिपल शाळेत शिक्षकाचे काम करीत होते. नंतर त्याना बी. ई. एस्. टी. मध्ये नोकरी लागली. सकाळी एकदोन शिकवण्या, साडे दहा ते पाच कारकुनी, रात्री दहा-साडेदहापर्यंत रात्रीच्या शाळेत शिकविणे असा त्याचा दिवसाचा नकाशा होता. इतके करूनही थोडेफार लेखन ते या काळातही करीत असत.

सस्कृतमध्ये एक सुभाषित आहे—

मो दारिद्रय, नमस्तुभ्यम् ।
सिद्धोऽहं त्वत्प्रसादत : ।।
पश्याम्यह जगत्सर्वम् ।
न मां पश्यति कश्चन ।।

[ हे दारिद्र्या, तुला माझा नमस्कार असो. तुझ्यामुळे मी सिद्ध झालो आहे (मला सिद्धी मिळाली आहे). मी सर्व जगाला पाहतो पण मला कुणी पाहात नाही.]

या काळात शिरूभाऊंनी जग पाहिले, माणसाच्या निरनिराळया तऱ्हा पाहिल्या. काही जण येत. त्याच्या परिस्थितीबद्दल कणव दाखवीत. त्यांना मदतीचे आश्वासन देत. पण अशा कनवाळू लोकांच्या मागे शिरूभाऊ कधीच लागले नाहीत. हा काळही त्यानी मोठ्या मस्तीत घालवला.

दारिद्र्यातही मस्ती यायला कुटुंबात फार मोठी एकी लागते. शिरूभाऊ या बाबतीत फार भाग्यवान ठरले. या परिस्थितीतही शिरूभाऊंना कौटुंबिक सुख होते. एक प्रसंग फार हृदयस्पर्शी आहे.

सर्व दिवस शिरूभाऊ आपल्या कामात गर्क असत. घरात लक्ष द्यायला त्यांना फारशी फुरसत नसे. गरिबी असल्याने काही वेळा त्यांच्या भावंडांचे कपडे फाटलेलेच असायचे. एकदा निजानंद नावाचा त्यांचा भाऊ वाडीतल्या मित्रावरोबर खेळत असताना एकाने त्याला डिवचले.

" एहे, काय भिकारड्यासारखे कपडे घातले आहेस ? "

त्यावरोबर निजानंदने त्याला चमकावले—

" तोंड संभाळून बोल. पुन्हा बोललास तर चपलेन मारीन ! "

झाले. त्या मुलाने आपल्या आईकडे कागाळी केली. ती बाईही भांडायला आली. निजानंद तिच्याशीही भांडला. शेवटी ती बाई शिरूभाऊ आल्यावर रात्री पुन्हा आली. तिने प्रथम शिरूभाऊंना पडत असलेल्या कामाबद्दल अपार सहानुभूती दाखविली, आणि नंतर निजानंदाला निंदायला सुरुवात केली. 'थोरल्या भावानं मर मर मरावं आणि धाकट्या दिवट्यांनी हवं तसं उधळावं—' हा तिचा सूर होता. शिरूभाऊंना काही कळेना. त्यानी काय झाले म्हणून चौकशी केली. सर्व कळल्यावर थोडा वेळ ते काहीच बोलले नाहीत. नंतर त्या बाईला ऐकू जाईल अशा सुरात निजानंदला म्हणाले,

" तिला जाऊन सांग की निजानंद नुसताच चप्पल मारीन म्हणून थाबला. मी मारलीच असती ! ! ! "

ती बाई काय समजायचे ते समजून निघून गेली. असे कितीतरी प्रसंग. पेंडशांची भावंडे आपल्या मोठ्या भावाला अजूनही मानतात. आता सर्वजण आपआपल्या मार्गाला लागले आहेत. प्रत्येकाच्या मनात शिरूभाऊंविषयी अपार प्रेम आहे.

### संसार आणि साहित्य

अशा परिस्थितीतच त्यांचे लग्न झाले.

---

**व्यथा...**

वाट क्षणांची चाहूल
डंखे फुटती स्मृतिना
कुणी अंगी गोजारत
व्यथा जपते डोळ्यांना
सारे लेवून डोळ्यांत
साठवावे काही तरी
पंक्ती ओल्या घरांच्या
वळवाच्या कांठावरी
वाटा वळता नीजेत
शिंपू लागतो आषाढ
उगी अगाई म्हणून
तुझे हात थोपटत

—वसंत गुर्जर

---


महाराष्ट्राचे आद्य कादंबरीकार हरिभाऊ आपटे
यांच्या पुण्यस्मृतीस नम्र अभिवादन

**सरदारगृह**

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २ ( टे : ३८३३७ ) राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण. आमचीं वैशिष्ट्यें :
★ हीरकोत्सवानिमित्त अद्यावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
★ टिळक जन्म-शताब्दिदिनीं लोकमान्याचे सरदारगृहात केलेले स्मारक.

लग्न झाल्यावर शिरूभाऊंनी कमलताईंना सांगितले की आपली अशी अशी परिस्थिती आहे आणि आपल्याला असे असे वागायचे आहे. कमलताईंनी काहीही विचार न करता ' हो ' म्हटले आणि त्या संसाराला लागल्या.

या सर्व धकाधकीत वेळ मिळेल तेव्हा ते लिहीत असत. लोकल यायला अजून वेळ आहे, ती येईपर्यंत थोडे लिही, ऑफिसमध्ये सुटीत काही सुचले – लिहून टाका. अशा तऱ्हेने त्यांचे लिखाण चालले होते. १९४१ साली त्यांचा " खडकावरील हिरवळ " हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. यांत " गारंबीचा बापू " आणि " हद्दपार " या कादंबऱ्यांची कथानके बीजरूपाने आढळतात.

माणसांप्रमाणेच आपल्या कलाकृतीही शिरूभाऊ पारखून मग रसिकांपुढे ठेवतात. त्यांची " संक्रमण " नावाची एक कादंबरी अर्धीअधिक लिहून पुरी झाली होती. पण एक दिवस त्यांच्या काय मनात आले कुणास ठाऊक, कादंबरीच्या हस्तलिखितावर त्यांनी त्या दिवशीच्या आंघोळीचे पाणी तापविले ! स्वतःच्या कृतींकडे ते एक टीकाकार म्हणून पाहतात. त्यांच्या कसोटीला त्या कृती उतरल्या तरच त्या वाचकांपुढे येतात. ' मागणी तसा पुरवठा ' किंवा ' चला, आता आपलं नाव झालं आहे, काहीही ठोकायला हरकत नाही ' असला शिरूभाऊंचा खाक्या नाही.

' एल्गार 'मधील रघू, कादर; ' हद्दपार '-मधील राजे मास्तर; ' गारंबीचा बापू 'मधील अफाट बापू, दिनकर, अण्णा ; ' रथचक्र 'मधील मी, थोरली, लखनौवाला इ. पात्रे वाचकांच्या मनांत कायम घर करतात. पात्रे imported वाटत नाहीत. त्यांचे प्रश्न, त्यांची सुखदुःखे, त्यांच्या भावना हे सर्व आपले वाटते. त्यांची पात्रे कोकणची आहेत पण ती कोकणापुरती मर्यादित नाहीत. शिरूभाऊंना आपल्या कादंबऱ्यांना प्रादेशिक म्हटलेले आवडत नाही. चांगल्या साहित्याला प्रादेशिकता ही अपरिहार्य आहे. कुणी खानदेशचा मागोवा घेईल, कुणी माणदेशात रमेल तर कुणी कुळागरांचे वर्णन करील. शिरूभाऊ वणदेच्या खोऱ्यात रमतात.


शिरूभाऊंचा आणखी एक विशेष म्हणजे प्रभावी स्थलवर्णने ! शिरूभाऊंचा परिहार आपल्या डोळचांपुढे हुबेहुब उभा राहतो. महर्षी कर्वे यांच्या शताब्दिनिमित्त आम्ही मुरूडला गेलो होतो. तिथे एक दिवस गु. अण्णांच्या दर्शनाला गेलो. शिरूभाऊंची ओळख करून दिल्यावर ते म्हणाले,

" ' गारंबीचा बापू ' तुमचीच ना ? "

" हो. "

" वाचली; तिथे फिरून आल्यासारखं वाटलं. "

शिरूभाऊंच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. आणखी प्रशस्तिपत्रकाची काय गरज होती ?



' रथचक्र 'च्या निमित्ताने होणाऱ्या दिल्लीवारीत कोकण कसे बसवावे ?

' गारंबीच्या बापूने 'तर शिरूभाऊ रॉकफेलर फाउंडेशनतर्फे जगाचा प्रवास करून आले. पण ते आपले कोकण विसरले नाहीत. कुठे समुद्रकिनाऱ्यावर गेले की त्यांना मुरूडची पुळण आठवे. अर्धा युरोप ते पालथा घालून आले पण आल्यावर जी सुटी उरली होती तेवढी त्यांनी कोकणात घालविली. ' रथचक्र 'च्या निमित्ताने होणाऱ्या दिल्लीवारीत कोकण कसे बसवावे या विवंचनेत सध्या ते आहेत.

शिरूभाऊंना आपल्या कोकणचे विलक्षण वेड आहे. या वेडापायी त्यांनी एक योजना आखली होती. कमलताई, छोटा अनिल आणि सरोज यांना त्यांनी दापोलीला पाठवून दिले होते. मोठी मुलगी नंदा कॉलेजला असल्याने यातून सुटली होती. अनिल व सरोज यांना दापोलीच्या शाळेत घातले होते. कमलताईंनीही तिथेच नोकरी धरली होती. सर्व ठाकठीक होते आहे असे बघून शिरूभाऊही मुंबई सोडून तिथे येणार होते. पण झाले काय ? शिरूभाऊंचे बालपण कोकणात गेले असले तरी त्यांच्या मुलांचे बालपण मुंबईत गेलेले. त्यांनी हा बेत संपूर्णपणे हाणून पाडला. शिरूभाऊंनीही यशस्वी माघार घेतली. त्यांनी मुलांचा दर्द ओळखला. मुलांची मने मारून त्यांना कोकणात राहायचे नव्हते. प्रथम शिरूभाऊंनी मुलांना सक्तीने वर्षभर दापोलीला ठेवून पाहिले. परंतु दिवाळीच्या सुटीनंतर मुंबईहून पुन्हा दापोलीला जाताना धाकटचा अनिलने जे रुदनास्त्र सोडले ते शिरूभाऊंच्या जिव्हारी लागले. त्यांनी ताबडतोब निर्णय घेतला की पुढच्या वर्षी मुंबई !

पुन्हा शिरूभाऊंचे ' दहा-पंचवीस ' आणि ' पाच-पन्नास ' सुरू झाले आहे. यात त्यांचे मन रमत नाही. पण मुलांसाठी त्यांनी हेही आनंदाने स्वीकारले आहे.

*


## परसूच्या पशुकथा

**ले. वसंत सबनीस**

मूल्य : दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

## : २ :

# चांगल्या-वाईटाचे अधिक वास्तव स्वरूप

**चंद्रशेखर मराठे**

मराठी कादंबरीच्या विषयात श्री. ना. पेंडसे हे एक विद्यमान मातवर नाव ! मराठीत कादंबरीचे पीक उदंड असता—त्यातल्या त्यात 'महिन्याला एक प्रकरण' हे प्रकरण वाढत असता कादंबरी या प्रकाराची चर्चा काही मोजक्या नावातच घोटाळते. विस्मृत झालेल्या लेखकाची संख्या बहुधा या प्रकारात सर्वात जास्त असावी. अशा परिस्थितीत कादंबरीशी आपले नाव ठळकपणे निगडित करून ठेवणे ही गोष्ट सामान्य नाही.

सांगण्यासारखे काही असले तरच लिहावे असे मानणाऱ्या पठडीतील या कलावताने स्वत.चे असे कादंबरीविश्व निर्माण केले आहे. त्या विश्वाला स्वतःची अशी गती आहे—प्रकृती आहे. काहीशा हिशेबी, अचूक आणि तीव्र (कट) अशा शैलीने पेंडशांनी जीवनाचा एक ठाशीव आलेख आपल्या कादंबऱ्यांतून उभा केला आहे. रघू, कादर, राजेमास्तर, बापू, हत्या, सिंधू आणि रथचक्रमधील "ती" अशी जिवंत व्यक्तिरेखाची एक प्रभावळ निर्माण केली आहे वाचकाना त्यांच्या सुखदु खात, आशा—आकाक्षांत आणि कर्तृत्वात वा अपयशात सहभागी करण्यात मोठेच यश मिळविले आहे. या व्यक्तीची जीवनगाथा जेथे घडते तो कोकणचा भूप्रदेश त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह साहित्यात चिरंतन करण्याचा चमत्कार पेंडशांनी केला आहे.

### पेंडशांचे वेगळेपण

पेंडशांचे हे यश सर्वमान्य आहे; या ठिकाणी त्याबद्दल नव्याने काही लिहावे असे नाही. येथे त्यांच्या कादंबरीचे वेगळेपण नेमके कशात आहे याची चर्चा अभिप्रेत आहे. चागले व वाईट यातील सनातन सघर्षास अधिक वास्तव स्वरूप प्राप्त करून देण्यात पेंडशाना यश आले व त्यामुळेच त्याच्या साहित्यास काही वेगळेपणा प्राप्त झाला हा यापुढील चर्चेचा प्रमुख निष्कर्ष आहे. साहित्य—त्यातल्या त्यात कादंबरी—चांगले व वाईट यांच्या संघर्षात तटस्थ राहू शकत नाही. चांगल्याचा वाईटाविरुद्ध, शुभाचा अशुभाविरुद्ध आणि सत्चा असत्विरुद्ध जय होतो आणि तसा तो झाला पाहिजे. हा प्रवाह साहित्यात पूर्वीपासून दिसतो. मराठी कादंबरीनेही या संघर्षाचा वेध घेतला. गुणाचे प्रतिनिधित्व नायकाकडे, दुर्गुणांचे खलनायकाकडे असा साधारण मराठी कादंबरीचा आराखडा असे. चांगले काय अगर वाईट काय याविषयी मतभेद होते. परंतु चागलेच शेवटी विजयी होते किंवा व्हावे ही भूमिका मराठी कादंबरीने केव्हाही सोडलेली नाही. परंतु चागल्याचे प्रतिनिधित्व कोणा एका व्यक्तीने करणे व वाईटाचे प्रतिनिधित्वही कोणा एका व्यक्तीने करणे ही गोष्ट मुळातच कृत्रिम आहे. चागलेपणाच्या कल्पनेचे साक्षात् प्रतिनिधित्व करू शकेल व शिवाय वास्तव वाटू शकेल अशी व्यक्तिरेखा निर्माण करणे मानवी मनाच्या शक्तीबाहेरचे आहे. जुन्या मराठी कादंबरीत जी कृत्रिमता आढळते तिची उपपत्ती ही अशी आहे. चागले व वाईट अशी ठसठशीत वर्गवारीही या कृत्रिमतेत भर घालणारी ठरली.

### वास्तव संघर्ष

पेंडशांची कथानके कोकणात घडतात यामुळे वरील समस्येस काहीशा अभावितपणाने उत्तर मिळाले. व काही अशी पेंडशानी हेतुपुरस्सरही ही कृत्रिमता टाळण्याचा प्रयत्न केला. पेंडशाची चागल्या-वाईटाची वर्गवारीही पूर्वीप्रमाणेच ठसठशीत आहे. परतु कोकणच्या पार्श्वभूमीमुळे त्यांच्या कादबरीतील चागल्या-वाईटाचा सघर्ष व्यक्तिव्यक्तीत न राहता व्यक्ती व व्यक्तिसमूह (व काही मर्यादित अर्थाने समाज) या पातळीवर आला. कोणा एका व्यक्तीच्या सपूर्ण वाईटपणावर विश्वास ठेवणे यापेक्षा व्यक्तिसमूहाच्या वाईटपणावर विश्वास ठेवणे अधिक सोपे आहे. तेव्हा चागलेपणाचे प्रतिनिधित्व व्यक्तीकडे व वाईटाचे प्रतिनिधित्व समाजाकडे, असे स्वरूप पेंडशाच्या कादंबरीस प्राप्त झाले. चागलेपणाच्या व्यक्तिगत प्रतिनिधित्वाबद्दल जी काही अवास्तवता उरली असती ती पेंडशानी निराळ्या तऱ्हेने नाहीशी केली. कादंबरीतील प्रधान पात्रे त्यानी विश्वास बसू नये इतकी असामान्य केली नाहीत. ती सामान्यपणे चागली दाखवून त्याच्या भोवतालची माणसे त्यांच्याहून एकत्रितपणे कमी चागली दाखविली.

कोकणच्या पार्श्वभूमीतून पेंडशाना याप्रकारे काहीशा अयाचितपणे शुभाशुभातील संघर्ष वास्तव करण्याचा मार्ग सापडला असे म्हणावे लागते. त्याच्या कादंबऱ्या पूर्वीच्या कित्येक कादंबऱ्यापेक्षा प्रभावी व वास्तव का वाटतात याची आता संगती लागण्यास हरकत नाही. पेंडशांच्या या नव्या वास्तवतेमुळे त्याना पूर्वीची कृत्रिमता टाळता आली, संघर्षास थोडे भव्य स्वरूप देता आले व तो परिणामकारक करण्यासाठी आवश्यक ती नाटयमयताही आणता आली. पेंडसे यांच्या कादबऱ्यातील सर्व प्रधान व्यक्ती सापेक्ष, चागलेपणाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. त्याच्यावर आजूबाजूच्या व्यक्तीकडून अन्याय होतो, त्याच्या अतरीची व्यथा कोणी जाणून घेत नाही, त्याच्याविषयी गैरसमजाची वादळे उठतात—कधी त्याचे मर्यादित विश्व बहुतांशी असंबद्ध अशा सामाजिक प्रक्षोभानी उध्वस्त होते. त्यातून जी विषण्णता निर्माण होते, जी अगतिकता जाणवते ती पेंडशाचे साहित्य व्यापून जाते. त्यातून साकारते ती व्यथेची कथा—रघूची, कादरची, राजेमास्तराची, हत्याची—भुत्याची आणि रथचक्रमधील "ती-" ची. एका अर्थाने या व्यथा सापेक्ष आहेत. या व्यक्तीच्या साध्यासुध्या आकाक्षा व इच्छा आणि समाजाची धारणा यातील विरोधातून त्या निर्माण होतात. हा विरोध नसता तर हत्या पळाला नसता, बापू माणसातून उठला नसता आणि रथचक्रमधील 'ती' जिवतपणी लोबकळत राहिली नसती. परतु हा विरोध केवळ व्यक्ती व व्यक्तिसमूह यातीलच नाही तर चागले व वाईट यातील आहे हे जाणवले की त्याची अपरिहार्यता लक्षात येते.

त्याचबरोबर हेही लक्षात येते की ही अपरिहार्यता पेंडशाची कादबरी कोकणात घडते तोवरच आहे. व्यक्ती (चागले) व समाज (वाईट) यात सघर्ष येण्यासाठी समाज अतिशय तरलस्पर्शी असावयास पाहिजे. प्रधान व्यक्तीच्या आसपासची माणसे

थोडीफार रिकामटेकडी आणि हिमती असावयास पाहिजेत. ही अट पुरी झाली नाही तर पेंडशांचे कथानक आकारत्र घेऊ शकणार नाही. उदाहरणार्थ, मुंबईत काय होते ? तेथे दुसरा काय करतो हे पाहण्याची उसतच कोणाजवळ नाही आणि दुसऱ्यास आपल्याबद्दल काय वाटते यावर विचार करण्याचे त्राणही कोणाजवळ नाही. म्हणूनच 'हत्या' कोकणात असेपर्यंत त्याची व्यथा काळजास भिडते—तो मुंबईत गेला की त्याच्यात सामान्यत्वाखेरीज दुसरे काही शिल्लक राहात नाही. म्हणजे ज्या प्रादेशिकतेने पेंडशाच्या कादबरीविश्वाला शुभाशुभाचा अधिक वास्तव संघर्ष दिला ती प्रादेशिकता गृहीत घरल्याशिवाय व्यक्ती व समाज आणि चागले व वाईट यातील सघर्षाचा मेळ बसू शकत नाही. यामुळे पेंडशाच्या साहित्यास मर्यादा पडल्यासारखे होते.

**"रथचक्र'—यश ?**

याची स्वतः पेंडशानाही जाणीव असावी. म्हणून त्यानी 'रथचक्र'मध्ये प्रादेशिकता टाळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. एवढेच काय पण सपूर्ण रथचक्र कादबरीत पात्राना स्थलकालनामरूपनिरपेक्ष बनविण्याचा त्यानी आटोकाट प्रयत्न केला आहे. तो यशस्वी झाला असूनही त्या कादंबरीस विश्वात्मकपणा आल्याचे जाणवत नाही. उलट नियतीसारखा अगातुक घटक तेथे आपला प्रभाव पाडू पाहतो. प्रादेशिकता व तिची मर्यादा टाळली तरी पेंडसे याची कादबरी अधिक उच जाऊ शकत नाही याचे कारण काय ?

याचे कारण असे दिसते की पेंडशांच्या कादबरीने व्यक्ती व समाज यातील सघर्षापासून [अपवाद व सामान्यत्व यातील संघर्षापर्यंत] नकळत प्रवास केला आहे त्याच्या प्रधानव्यक्तीचे चागलेपण त्यांच्या 'अपवाद' असण्यावर अवलबून आहे. म्हणजे ते केवळ (अॅब्सोल्यूट) चागलेपण नाही. सामान्यत्वाचे प्रतिनिधी तर नाहीच नाही. त्यामुळे जुन्या कादबऱ्यातील चांगलेपणा अप्रातिनिधिक असे म्हणून त्या ज्याप्रमाणे कृत्रिम वाटत असत, ज्याप्रमाणेच पेडशांच्या आता वाटू लागल्या आहेत. अपवादस्वरूप चागलेपणा हे जुन्या व पेंडशाच्या कादबऱ्याचे समान अपयश आहे. जुन्या कादबऱ्यात निदान चागले व वाईट दोन्ही परकोटीला नेलेले

## पेंडसे साहित्यातील विनोदाचा झरा

विनोदाचा एक छोटासा झरा हसत फेसाळत, धपकन् कोसळत आणि गिरक्या घेत पेंडशांच्या ह्या नंदनवनातून मोठ्या मजेने वाहत गेलेला आहे. ह्या प्रवाहामुळे त्यांच्या साऱ्या भावविश्वाला एक प्रकारचा ताजेपणा आला आहे. त्याला एक निराळीच सपन्नता आली आहे. त्याला एक प्रकारची सूक्ष्मता आणि गहिरेपण प्राप्त झाले आहे. हा विनोद निरनिराळ्या कारणांनी निर्माण झालेला आहे. 'हाय स्पिरिट्स्' किंवा एक प्रकारचा चंडपणा हा मुळी पेंडशांच्या वृत्तीचा मूळ गुण आहे. ह्या चंडपणातूनच त्यांचा विनोद निर्माण झाला आहे. कधी विनोद निर्माण झाला आहे तो निव्वळ सरळपणे खरे काय ते सागितल्यामुळे. कोकणी माणसाचा फटकळपणा पेंडशांजवळ भरपूर प्रमाणात आहे. आणि तो फटकळपणा पुष्कळदा हसू आणतो. कधी आपल्या भाबड्या पात्रांकडे पेंडसे मिश्किलपणाने डोळ्यांच्या कोपऱ्यातून पाहतात आणि मग हसू येण्यासारखे प्रसंग सहजच त्यांच्या दृष्टीस पडतात. दिनकर आणि राधा बापूवर टीका करण्याच्या ऐन रंगात येतात. तेव्हा राधा बोलून जाते, "अगदी मूर्ख आहे बापू म्हणजे"——

दिनकरला ते एकदम मान्य होते. आणि मग काही तरी चुकले आहे हे त्याच्या ध्यानात येते. आणि तो म्हणतो, "शू ऽऽ ! हे काय वहिनी ? अगो तुझा तो नवरा ना ? वाटेल ते काय बोलत्येस ? माझ्या पण लक्षात येत नाही." राधा लाजते आणि म्हणते, "तुमच्याजवळ म्हणून बोलले. इतरांजवळ बोलताना 'अहो-जाहो'च म्हणते."

तेव्हा दिनकर म्हणतो, "म्हणत्येस ना ? मग चांगलं आहे." त्यावेळी त्याने समाधानाने कशी मान हलवली असेल हे माझ्या डोळ्यासमोर येते आणि हसू येते.

—गंगाधर गाडगीळ ("खडक आणि पाणी")


## वेळेचा क्षण आणि धनाचा कण

फुकट घालवण्याचा काळ संपला
हें पटत असेल तर

सर्व तऱ्हेची होजियरी, लहान-मोठ्यांचे अद्यावत तयार कपडे, तसेंच कोणत्याही प्रकारच्या टोप्या, खरेदी करणें असेल तेव्हां

**एन्. व्ही. गोखले,**

प्रार्थनासमाजजवळ, मुंबई ४ येथेंच खरेदी कराव्या.

वाजवी किंमत व खात्रीचा माल हें वैशिष्ट्य.

## पत्रलेखन

" पत्र ना लिहायचं आहे ? "

" खरंच लिहिणार आहेस का ? मला वेडीला लिहिता येत नाही म्हणून तुमच्या गमजा ? "

" लौकर सांग --"

" लिही—कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष--"

" हं. "

" एवढ्यात झालं ? "

" सगळ सांग. माझ्या भाषेत जमवून लिहीन--"

" अरे, मघापासून तोच तर घोटाळा चालला आहे. बरंच लिहायचं आहे; बसलं की काही आठवत नाहीस होतं. सगळं त्याना कळवायचं. आपण ह्या ठिकाणी आलो ते का ? खरं म्हणजे घरच्या माणसांची परवानगी घेतली तशी त्यांची घ्यायला हवी होती. "

" कशाला—? "

" कशाला असं नाही; बरं वाटलं असतं त्यांना. घरच्यांची परवानगी कशाला घेतली ? तू म्हणशील, घरचे तांदूळ देतात—"

" होयच. "

" ते सुद्धा देतील. आपण काही मागितलंच नाही तर कसं देतील ? तुला माहित आहे ? भावजी मला लखनौला न्यायला तयार होते. शिकून मी आपल्या पायावर उभं राहावं असं त्याचं मत होत. पण घरचं एक माणूस परवानगी देईना.

" दहा वर्षं झाली ह्या गोष्टीला. एव्हाना बी. ए. झाल्ये असत्ये. निदान आजची पाळी तरी आली नसती. तूं शिकशील, सवरशील, तोपर्यंत दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायचं. "

" हे लिहायचं आहे ? " ती हसली आणि पुन्हा बोलू लागली,

" तू पास झालास, पहिला आलास येथपासून सगळं लिहायचं. "

" आणखी ? "

" तुम्ही आलात तेव्हा गर्दीत होतात. नाहीतर त्याच वेळी आई सांगणार होती. जायच्या वेळी आईची आठवण काढलीत त्यानं आम्हाला चुकचुक लागली—"

" चुकचुक लागली ? " वाकडं तोंड करीत त्यानं विचारलं.

" ठुसठुस म्हण. आपल्याला वाईट वाटलं एवढं त्यांना कळलं पाहिजे. पण आयत्या वेळी आईला परसाकडला जावं लागलं—"

" काय ? "

" भावजी गेले तेव्हा मी तेथे नव्हत्ये. ते नको का सांगायला ? खरा प्रकार त्यांना सांगायचा म्हणजे—आता मी बोलत नाही. आठव कसा वागलास ते. तावडतोब उठला असतास तर भावजी नक्की भेटले असते. "

" हे पत्र लिहितंय् कोण—तू की मी ? " —" रथचक्र "

[ ' रथचक्र ' मधील स्वैंपाकीणबाईचे हे पत्रलेखन. पत्र सांगणे निराळे— लिहिणे निराळे, यातली गमत पेंडशानी छान पकडली आहे—]

असे. दोन्ही खऱ्या अर्थाने अप्रातिनिधिक वा असामान्य असे. पेंडसे मात्र चांगलेपणाचे प्रतिनिधित्व अपवादभूत—व्यक्तीकडे सोपवितात व वाईटपणाचे प्रतिनिधित्व सामान्याकडे सोपवितात. हे करताना ' चांगल्याचा वाईटावर जय झाला पाहिजे ' ह्या भूमिकेचे रूपांतर " अपवादाचा सामान्यावर जय झाला पाहिजे " यात होते याची जाणीव त्यांना होत नसावी. याला आणखी एक बाजू आहे. सर्वसाधारण साहित्यात असामान्यत्व म्हणजे सामान्य चांगलेपणाहून अधिक चांगलेपणा ही भूमिका आढळते. पेंडशांच्या कादंबऱ्यांत मात्र प्रधान व्यक्तिरेखा वास्तव वाटण्यासाठी ' सामान्यपणे चांगल्या ' रंगविल्या जातात. परंतु वर सांगितल्याप्रमाणे अपवाद असण्यावर त्याचा चांगलेपणा अवलंबून असण्याने त्याच्या भोवतालची माणसे वाईट दाखविली जातात. थोडक्यात म्हणजे चांगलेपणाचा ' कस ' पेंडशाच्या कादंबरीविश्वात कमी झाला आहे. त्यामुळे सापेक्ष आणि मर्यादित व्यथांच्या कोंडीत पेंडशांची कादंबरी सापडली आहे. जो चांगलेपणा अपवादस्वरूप असण्यावर अवलंबून आहे त्याचा जय झाला किंवा पराजय झाला तरी त्यास काही महत्त्व राहात नाही. त्यामुळे पेंडशाच्या कादंबरीतील शुभाशुभाचा संघर्ष सामान्य वाचकाला निरर्थक वाटू लागल्यास नवल नाही.

### अपेक्षा

पेंडसे यांना वेदनांचे विश्व साकार करण्याची तळमळ आहे— त्यांच्या लेखणीत ते सामर्थ्य आहे. अशा सापेक्ष व्यथांची कोंडी ते केव्हातरी फोडतीलच. जीवनातील सामान्यत्वाचा वेध घेतील आणि त्यांना असे आढळून येईल की सामान्यत्व कसेही असले तरी त्यातून सुटका नाही. अपवादांना देखील सामान्यत्वाच्या संदर्भातच अस्तित्व असते. त्याना हे जाणवेल की, अपवाद चांगले असतात तसे वाईटही असतात. पण सामान्यत्व हे जीवनाशी तडजोड करीत करीत चांगलेपणाचा आकार घेते— चालत्या लोकलमध्ये चढू पाहणाऱ्या अनामिकाला हात देऊन वर घेते— या सामान्य चांगलेपणाची काही व्यथा असते— आणि त्या व्यथेचीही कथा होऊ शकते.

• • •

# असा मी—

# ‘ असामी ’



फारसं पुढं जायला नको – मागंही राहायला नको !

जुने संपूर्णपण सोडू नये. संस्कृतीचा वारसा सांगतच त्यातले नको तेवढे टाकून त्या जागी नव्याचा स्वीकार करावा. कळीचे फूल बनते तसे जुन्यातून नवे निघाले, हे पु. ल. देशपाण्डे यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचे ‘ सांगणे ’ ह्याही कार्यक्रमात दिसते.

‘ बटाटयाची चाळ ’ मधला बहुरूपी हा ‘ चला काकु चला काकु लग्नाला चला ’ म्हणणारा होता. चाळीतली माणसे त्यात दिसली. ह्या बहुरूप्याने नंतर Review ह्या परकीय कल्पनेवर आधारलेली परन्तु आपल्या ‘ वगा ’ सारखी सूत्रधार, नट एकच असलेली ‘ वाऱ्यावरची वरात ’ आणली. त्यातील मुख्य पात्र प्रेक्षकांना उद्देशून काही वाक्ये सहज बोलत असे, त्यांना विश्वासात घेऊन आणखी एक पाऊल पुढे टाकले ‘ असामी ’ मध्ये. हा बहुरूपी कीर्तनकार होऊन येतो. कीर्तनकाराने लावलेय् आख्यान स्वत:चेच ! थोडासा प्रवचनकाराचा आवेश आहे. त्यामुळे कथा कुठेतरी जात असते. कथानकातून उपकथानके दृष्टान्त निघतात आणि जितक्या नकळत आपण हमरस्त्यापासून दूर गेलो होतो तितक्याच नकळत मूळ कथेपाशी आणले जातो. सारे चालले आहे हशांच्या, टाळयांच्या जल्लोशात. आणि कीर्तनकार हा आवाजाच्या फेकीने, स्वरांच्या फरकाने, आंगिक अभिनयाने कथानायकाचे व त्याच्या आयुष्यात आलेल्या व्यक्तींचे दर्शन घडवतो.

### कारकुनी विश्व

पूर्वरंग आहे “ बेन्सन जॉन्सन ” मधल्या कारकुनाविषयी आणि उत्तररंग तोच कारकून बदलत्या काळानुसार बदलला आहे त्याविषयी. आणि कीर्तनाचा समारोपही विलक्षण केला आहे. जुन्या नाटकांप्रमाणे नांदी आहे यमनकल्याणात. देशपांडयांनी ‘ या कुदेन्दु ’…हे सरस्वतीचे स्तोत्र म्हटले आहे. वातावरण आपोआप निर्माण होते. सौ. सुनीता देशपान्डे ‘सूत्रधारा ’प्रमाणे पडद्यामागून ह्या असामीविषयी थोडेसे सांगतात न सांगतात तोच हा हडबडून उठतो आणि बोलायला सुरवात करतो. थोडया वेळाने आपल्या लक्षांत येते, की कार्यक्रम सुरू झाला आहे आणि जोशी कुलोत्पन्नाने आपले आख्यान सुरू केले. विनोदांची बरसात होते. रत्नांग्रीचा ब्राह्मण तसा बावळट असला तरी हुशार आहे. कुणीही त्याला काहीही सुनवावे. एक सरळ, सुस्वभावी, निरुपद्रवी (व निरुपयोगी) अशा ह्या कारकुनाला स्वत:विषयी बोलताना संकोच वाटतो. परन्तु सुरवात “ राजहंसाचे चालणे । जगी झालिया शाहणे ।। म्हणौनि काय कवणे । चालोचि नये ।। ” ह्या ओवीच्या आधारे करतो. आणि पहिल्या वाक्यालाच (“ छत्रपति शिवाजीमहाराजांप्रमाणेच माझ्या जन्मतिथीविषयी–आषाढी की कार्तिकी एकादशी–दोन मते आहेत ) प्रचंड हशा घेऊन सुरुवात होते. कोकणी माणसाचे अनुनासिक बोलणे अगदीं नैसर्गिक वाटावे इतके तादात्म्य पावून पु. लं. नी उच्चारले. नंतर इतर गोष्टी सांगत बायकोबरोबरची खरेदी, प्रा. ठिगळेनामक शिंपी व कपडे शिवण्याची चर्चा, नानू सरंजामे ह्याचे (ऑफिसची स्टेशनरी फुकट घालवणारा नाटककार) पहिले नाटक पाहायला सहकुटुंब सहपरिवार जातात. त्याची कथा व शेवटी गोपाळराव कायकिणी ह्यांच्याबरोबर कुणा गुरुदेवाकडे जातात त्याचे कथन होऊन पूर्वरंग संपतो. ह्यात स्त्रियांची, इंग्रजी न येता ती उगीच वापरून चुका करणाऱ्या शिंपी लोकांची, ऑफिसमध्ये कामचुकारपणा करणाऱ्यांची, ढोंगीपणे परमार्थ करणाऱ्यांची व फसवणाऱ्यांची अशा अनेकांची व्यवस्थित उडवली आहे. प्रत्येक पात्राचा उल्लेख झाला की डोळे, भुवया, चेहरेपट्टी बदलून, चालून, माना हलवून त्या पात्राचे स्वरूप समोर उभे करण्याची विलक्षण हातोटी पु. लं.नी साधली आहे. प्रा. ठिगळे, सौभाग्यवती, नानू सरंजामे व मुख्य म्हणजे ‘ मी ’ चे वडील हे सर्व वेगळे दाखवणे किती कठीण आहे हे जाणत्यास उमजावे. परन्तु पु.ल.नी अगदी सहज ही गोष्ट केली आहे.

उत्तररंगाची सुरुवात होते तीच मुळी पाश्चात्य सुरांनी. त्या बेन्सन जॉन्सन कं. ची बेन्सन जॉन्सन् अॅण्ड मंगळदास कंपनी कशी झाली याची सुरुवात करून धोतरातून सुटात ‘ मी ’ चा वस्त्रपालट कसा झाला याची हकीकत ‘ मी ’ सांगण्यास सुरुवात करतो. आणि जुने आणि नवे ह्यांच्यातील फरकाचे दिग्दर्शन लहानसहान घटनांतून होऊ लागते. मग चिरंजीव शंकरच्या मुख्याध्यापिकेशी भेट होते, शंकरशी गप्पा होतात, ‘ फादर ’ ‘ फादर ’ म्हणणाऱ्या शंकरचा सिनेमाचा व्यासंग पाहून ‘ मी ’ला न्यूनगंड निर्माण होतो आणि त्याला चौपाटीवर स्वत:च्या प्रियाशी झालेला संवाद आठवतो. त्याला त्याचे शिक्षक आठवतात. आणि आता ‘ मागे राहणे नाही ’ असा निर्णय घेऊन forward

व्हायचे 'मी' ठरवतो. मग शेवटी Friends Badminton Club चा चेअरमन होतो. हे ऐकून बायको अशी पाहते की आणखी दोनदा जरी तिने पाहिले असते तर 'जगी सर्व सुखी असा कोण आहे' चे उत्तर 'मी' असे त्याने दिले असते.

ह्या सर्व प्रवचनात आधारास वाक्ये कुणा सताची नसून 'बेम्टया, शिच्या' अशा संबोधनाने सुरवात होणारी 'मी'च्या वडलांची आहेत. त्याचा दूरदर्शीपणे पु. ल.नी उपयोग करून घेतला आहे.

पु. लं.च्या लेखनात काय आणि नाटचात काय, कुठलीही कल्पना व वाक्ये उगीच नसतात. त्याची मुळे खोल गेलेली असतात आणि कुठे तरी नतर त्याचा संदर्भ लागतो. त्याचा ह्या प्रयोगातही अनेक वेळा अनुभव येतो. "जोशांच्या घरात कुणालाही पाळण्यातल्या नावाने हाक मारली नाही." हे सुरुवातीचे वाक्य दोन तीन जोशांबाबत उदाहरण देऊन सिद्ध केलेच. पुन: गाण्याबाबत सागताना 'नवऱ्या' जोशी उमा केला. आणि अगदी सहज ( उत्तररगात ) सरोज खरे समोर लक्षात येते की शंकरचे पाळण्यातले नांव 'कुमार गिरीश' असते! असेच पत्नीने नाव घेतल्याचे सागताना 'समोरच्या कोनाड्यात उभी हिन्दमाता' अशी सुरुवात केली आणि त्याचा उपयोग उत्तररंगाची सुरुवात करताना 'ती समोरच्या कोनाडयातली हिन्दमाता स्वतंत्र झाली' असा केला. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

### असाध्य ते साध्य

त्याचे निरीक्षण अतिसूक्ष्म. व त्याचा नेमकेपणाने योग्य वापर करण्याचे विलक्षण कसब त्यांच्याकडे आहे. पट्टेवाला कसा बोलतो, मद्रासी माणसाचे इंग्रजी बोलणे, बगाली बोलणे ह्याच्या त्यांनी केलेल्या नकला ह्या दृष्टीने पाहण्याजोग्या आहेत. निरनिराळे देव त्यांच्याच भाषेत कसे बोलतील ही कल्पना मोठी रम्य आहे. यात कल्पना व निरीक्षण यांची कशी सांगड पु. ल. घालतात हे लक्षात येईल. 'साहेब गेला आणि आमचे ऑफिस पूर्ण विलायती झाले!' ह्या वाक्याला दाद किती दिली तरी कमी वाटेल आणि अशा वाक्याची पखरण योग्य प्रमाणात सर्व कार्यक्रमात आहे.

ह्यातील बराचसा भाग लेखरूपाने पूर्वी प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे ज्यांनी वाचला होता त्याना काही भागाची पुनरुक्ती जाणवेल. परतु तीन तासांचा हा कार्यक्रम कुठेही कटाळवाणा होत नाही. कुठेही अश्लील विनोद नाही. सारे अतिशय व्यवस्थित. नवेपणाच्या ढोंगीपणावर, दिखाऊपणावर कोरडे ओढताना, त्यातील गुणाविषयी त्यांनी चागले म्हटले आहे. कुणालाही दुखवण्याजोगे काही नाही. मात्र प्रत्येक अयोग्य गोष्टीवर टीका आहे. सामाजिक, राजकीय ढोंगावर अत्यंत खुमासदार टीका केली आहे. तीन तास सहाशे प्रेक्षकाना सतत हसत ठेवणे हे 'असाध्य ते साध्य' मोठ्या अभ्यासाने त्यानी साध्य केले आहे. या यशाचा अर्धा वाटा सौ. सुनीता देशपाडे याचा आहे हे सर्वज्ञात आहेच.

ह्या प्रयोगाचे भरतवाक्य अतिशय चटका लावणारे आहे, चिन्तन करायला लावणारे आहे. 'मी' ला कळत नाही की ते जुने चित्र चागले होते की हे नवे? तो पिता-पुत्र सवाद योग्य की हा आजचा?

शेवटी घडयाळाच्या सदर्भात तो सागतो: "घडयाळाचे काय आणि माणसाचे काय, तवकडचा नि काचा तेवढचा बदलतात. आतलं तोल सामाळणारं यंत्र चांगलं असलं म्हणजे झाल-फारसं पुढं जायला नको व मागही पडायला नको!"

बाहेर पडणारा प्रत्येक रसिक तृप्त मनाने बाहेर पडतो. एक उच्च प्रकारची करमणूक झाल्याचा आनंद त्याच्या तोंडावर दिसत असतो- आणि पु. लं. वरचा लोभ आता अधिकच वाढलेला असतो.

-सुरेश गजेन्द्रगडकर

• • •


## दि राजाबहादूर मोतीलाल पूना मिल्स लि.

कुशल तंत्रज्ञ, अद्यावत मशिनरी व उत्कृष्ट मार्गदर्शन या त्रिवेणी संगमातून आमचे मिलमध्यें तयार झालेले मर्सराईज्ड-आकर्षक रंगाचे पॉपलीन, उत्कृष्ट दर्जाचे शर्टिंग, मनोवेधक लॉंगक्लाथ, चित्तवेधक छापील छींट, तरतऱ्हेचे रंगीत लीनो, धुवट मलमल, धोतरजोड्या, सुंदर नाईट पट्टा, पलंगपोस, हरक, वगैरेकरितां

आजच आमच्या "शो-रूम" ला भेट द्या.

टेलिफोन नंबर २४३३४

"शो-रूम" व दुकान-
जिल्हा परिषद बिल्डिंग
ससून रोड, पुणे

स्वादिष्ट मिठाईसाठी

## शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी
मंडई रस्ता, पुणे २



कु. लीला फडके

# क्रीडा विहार

समीक्षक
**प्रभाकर गुजराथी**

: १ :

## पुणेकर महिला क्रीडाक्षेत्रात मागे नाहीत

दिवसेदिवस पुणेकर महिला क्रीडाक्षेत्रात प्रगतीची पावले टाकीत आहेत. खोखो, हुतुतू, टेबल टेनिस व मैदानी स्पर्धा आदि क्रीडाक्षेत्रात पराक्रम गाजविण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. ही घटना अभिनंदनीय अशीच म्हणावी लागेल. पुण्याच्या स. प. महाविद्यालयाच्या महिला हुतुतु संघाने दाखविलेल्या पराक्रमाचा मी प्रामुख्याने उल्लेख करीन. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धात विजयी ठरलेल्या या संघाने मुंबई येथे झालेल्या सुवर्णकप स्पर्धेत उपविजेतेपद मिळविण्याची कौतुकास्पद कामगिरी केली. या संघाच्या कप्तान कु. लीला फडके यांची त्यांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे यंदा भरणाऱ्या राष्ट्रीय हुतुतू स्पर्धांसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असल्याने मी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी नुकतीच त्यांची गाठ घेतली. स. प. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणप्रमुख श्री. भगवानराव जोशी यांच्या सहकार्यामुळे झालेल्या या भेटीत अनेक प्रश्नांवर मनमोकळी चर्चा झाली. त्यातील काही महत्त्वाची प्रश्नोत्तरे वाचकांसाठी देत आहे.

प्र०—मुंबई येथील सुवर्णकप हुतुतू स्पर्धाबद्दल आपण काही माहिती देऊ शकाल काय ?

उ०—मुंबई येथील हुतुतू सामन्यांना खास असे महत्त्व होते. भारताचे पंतप्रधान या सामन्यांचे उद्घाटन करणार असल्याने या सामन्यांना आगळेच स्वरूप प्राप्त झाले होते. या महत्त्वपूर्ण सामन्यांत भाग घेण्याची संधी लाभल्याने मी आनंदून गेले होते. सेंट झेविअर कॉलेजच्या भव्य मैदानावर या सामन्यांची दंगल भरली होती. महाराष्ट्रांतील अनेक भागांतून या सामन्यांत भाग घेण्यासाठी संघ आले होते. या स्पर्धेत आपणांस किती यश मिळेल याबद्दल मन साशंकच होते. आतापर्यंत महाविद्यालयीन सामन्यांत समवयस्क मुलींबरोबर आम्ही सामने खेळलो होतो. परंतु मुंबई येथील सामने सर्व वयांच्या व वजनांच्या महिलांना खुले होतें. शारीरिक पात्रतेत आम्हांस भारी असलेल्या खेळाडूंवर आम्ही मात करू असे मला मुळीच वाटत नव्हते. परंतु माझ्या संघातील खेळाडूंनी दाखविलेली जिद्द, सांघिक ऐक्य या गुणांमुळे आमच्या अल्पवयीन संघाने अंत्य सामन्यापर्यंत मजल मारली.

प्र०—आपण कोणत्या संघावर मात केलीत ?

उ०—स्पर्धेत आमच्या संघाची प्रथम गाठ पडली बलाढ्य बडोदा संघाशी. हा संघ आमचा सहज पाडाव करील असे सर्वत्र बोलले जात होते. सहाजिकच आम्ही सर्व खेळाडू काहीसे नाउमेद झालो होतो. परंतु प्रत्यक्षात उलटेच घडले. आमच्या संघाने बडोदा संघावर मात केली. मी एका चढाईत ६ गडी बाद केले, तेव्हा सर्वांनी माझे कौतुक केले. अनेक वृत्तपत्रप्रतिनिधींनी व प्रेक्षकांनी आमच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. बडोदा संघापाठोपाठ आम्ही समर्थ मित्रमंडळ (औरंगाबाद), विश्वशांती (मुंबई) यांचा पराभव केला.

प्र०—अंत्य सामन्यांत आपला संघ पराभूत होण्याची कारणे कोणती ?

उ०—अंत्य सामन्यांत आमची गाठ पडली मुंबईच्या युवक संघाशी. या सामन्यांत आम्ही प्रतिपक्षाशी निकराची झुंज दिली. परंतु आम्ही विजय प्राप्त करू शकलो नाही. या सामन्यांत पराभव होण्याचे प्रमुख कारण जर कोणते असेल तर ते प्रतिपक्षाने स्वीकारलेला बचावात्मक पवित्रा होय. संघाची कर्णधार लीला नायडू व तिच्या साथीदारांनी वेळ घालविणे, व कोणत्याहि परिस्थितीत प्रतिपक्षावर चढाई करावयाची नाही असे धोरण स्वीकारले. मला सोलापूर येथे सामन्यांत भाग घेण्यासासाठी जावे लागल्याने मी अंत्य सामन्यांत खेळू शकले नाही. विद्या मालेगावकरने कर्णधारपद योग्य प्रकारे सांभाळले. आमच्या संघाने शेवटपर्यंत चढाईचा मार्ग स्वीकारला होता. परंतु प्रतिपक्षाची बचावाची फळी आम्ही मोडू शकलो नाही. मुंबई संघाने असे दुबळे धोरण स्वीकारावे याबद्दल मला वाईट वाटले. मुंबईकरांनी चढाई स्वीकारली असती तर हा अंत्य सामना शेवटच्या क्षणापर्यंत अटीतटीने खेळला गेला असता.

प्र०—आपल्या संघातील खेळाडूंची प्रमुख वैशिष्टये कोणती ?

उ०—माझ्या संघातील सर्वच खेळाडू कुशल आहेत. विद्या मालेगावकर, (प्रसंगी संघाचे नेतृत्व करणारी), विजया रानडे, जयश्री गोखले, विद्या आपटे, सुशीला वापट, मंगला ओक, लता महाबळेश्वरकर, रोहिणी जोशी, या सर्व खेळाडूंचा सराव चांगला असून चपळता हा त्यांचा प्रमुख गुण होय. विशेषतः सुशीला वापट — विजया रानडे ही जोडी कड धरण्यात, तर विद्या आपटे — विद्या मालेगाव-

कर कव्हर करण्यात तरबेज आहेत. विजया रानडे चढाई करण्यात वाकबदार आहेत.

प्र०— आपल्या जीवनाविषयी काही विशेष असल्यास सांगाल का?

उ०— बालपणापासून मला खेळांची आवड आहे. घरातून मिळणाऱ्या उत्तेजनामुळे क्रीडाक्षेत्रात आपण चमकावे असे मला सतत वाटत असे. हुजुरपागेत व महाराष्ट्र मंडळात माझ्या प्राथमिक क्रीडा-जीवनास आरंभ झाला. सौ. जोशी व कु. मंदा सोहनी यांचे मला कुशल मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयीन जीवनात सौ. कटकर, श्री. भगवान जोशी व श्री. बंडू देखने यांचे मला प्रोत्साहन मिळाले. आताापर्यंत मी सोलापूर, कोल्हापूर येथील राज्य क्रीडामहोत्सवांत भाग घेतला आहे. बंगलोरला झालेल्या नॅशनल बास्केटबॉल स्पर्धेत व जबलपूर येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत माझा महाराष्ट्र संघात समावेश झाला होता. यंदा होणाऱ्या राष्ट्रीय हुतुतू सामन्यांत भाग घेण्यासाठी महाराष्ट्र संघात निवड करण्यांत आली आहे.

प्र०— क्रीडाक्षेत्रात पुणेकर महिला मागे आहेत काय?

उ०— (त्वेषाने) कोण म्हणतो आम्ही क्रीडाक्षेत्रात कमकुवत आहो? अनेक पुणेकर महिला क्रीडाक्षेत्रात पराक्रम करीत आहेत. मीना परांडे, स्टेफि डिसुझा यांनी तर आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली आहे. नीला कुलकर्णी या तरुणीने राष्ट्रीय टेबल टेनिसमध्ये अजिंक्यपद मिळविले आहे. आशा आकटेने आंतरमहाविद्यालयीन व तसेच राष्ट्रीय मैदानी स्पर्धातही अनेक पराक्रम गाजविले आहेत. अगदी अलीकडचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास हुजुरपागेच्या वसुंधरा कोकीळ या बालिकेचा उल्लेख करणे अगत्याचे ठरेल. आंतरशालेय सामन्यांत तिने अनेक विक्रम केले आहेत. इतकेच काय पण कलकत्ता येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने गोळाफेकीत व थाळीफेकीत प्रथम क्रमांक मिळविण्याचा अपूर्व मान मिळविला आहे. तिने गाजविलेले पराक्रम पहाता तिचे क्रीडाक्षेत्रातील भवितव्य उज्ज्वल आहे यात मुळीच शंका नाही. तेव्हा पुणेकर महिला क्रीडाक्षेत्रात मागे असल्याचा आरोप मी कधीच मान्य करणार नाही.

मी विचारलेल्या अनेक प्रश्नांची कु. लीला फडके भराभर उत्तरे देत होत्या. त्यांनी विचारपूर्वक दिलेल्या मुलाखतीबद्दल मी त्यांचे आभार मानले. व 'माणूस' तर्फे भावी काळात क्रीडाक्षेतात यश लाभो अशी इच्छा व्यक्त करून भी त्यांचा निरोप घेतला.


५ वर्षे व अधिक
मुदतीच्या ठेवीवर आतां
५½
टक्के व्याज मिळवा...
घरच्यापेक्षां महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून व्याजहि भरपूर मिळतें. सेव्हिंग्ज खात्यावरहि ३% व्याज. चेकनें पैसे काढण्याची सोय. मुदतीच्या ठेवीवर ४½% ते ५½% व्याज मिळतें. विविध बचत योजनांचे माहितीपत्रक मागवा.
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
११७७, बुधवार पेठ, पुणें-२
644


: २ :

## न रंगलेली २१ वी राष्ट्रीय मैदानी स्पर्धा

ऑलिंपिक स्पर्धांच्या तयारीसाठी भारतात आता हालचाली सुरू झाल्या आहेत. सदरहू स्पर्धांसाठी योग्य खेळाडू निवडण्यासाठी अनेक स्पर्धा भरविण्यात येत आहेत. कलकत्ता येथे पार पडलेल्या २१ व्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धांचाही ऑलिंपिक सामन्यांची रंगीत तालीम म्हणून उल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. परंतु यंदा झालेल्या स्पर्धामध्ये रसिकांची चांगलीच निराशा झाली. जागतिक स्पर्धांमध्ये भाग घेण्यास योग्य असा एकही पराक्रम केला गेला नाही. या स्पर्धामध्ये दिसून आलेला दर्जा पहाता 'ऑलिंपिकमध्ये भारतीय संघाचे भवितव्य काय?' असा प्रश्न सहाजिकच भेडसाविल्याशिवाय रहात नाही. जागतिक खेळाडूंची बरोबरी आपले वीर करू शकणार नाहीत हे कलकत्त्यास सिद्ध झाले. सहाजिकच टोकियोस जाणाऱ्या भारतीय संघाची निवड कशी करावी असा गंभीर प्रश्न निवड समितीपुढे उभा राहिल्यास नवल नाही.

या स्पर्धेतील काही पराक्रमांचा विचार करू. महाराष्ट्राच्या स्टेफी डिसुझा हिने २०० मी. धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळविला तर १०० मी. शर्यतीत ती दुसरी आली. मुलींच्या गटात पुण्याच्या वसुंधरा कोकिळने थाळीफेकीत व गोळाफेकीत प्रथम क्रमांक पटकाविला. गेल्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताचा आशादीप म्हणून गाजलेला व वायुपुत्र म्हणून गौरविला गेलेला मिल्खासिंगवर पंजाबच्या माखनसिंगने केलेली मात. ही घटना अनपेक्षित अशीच होती. एलिझाबेथ डावेनपोर्ट (पंजाब), स्टेफी डिसुझा (महाराष्ट्र), गुरुबचनसिंग (पंजाब), एन. तीर्के (बिहार), प्रवीणकुमार (पंजाब), जी. वाकेफिल्ड (दिल्ली) यांनी नवीन विक्रम प्रस्थापित केले.

वक्रमांचा तपशील खालीलप्रमाणे—

एलिझाबेथ डावेनपोर्ट (पंजाब) हिने ११.१४ मी. गोळा फेकून पूर्वीचा स्वतःचाच ११.०६ मी. चा विक्रम मोडला.

महाराष्ट्राच्या स्टेफी डिसुझाने ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीतील आपला पूर्वीचा २ मिनिटे २२.९ सेकंदचा विक्रम मोडला. यंदा हे अंतर धावण्यास तिला २ मि. ३२.६ सेकंद लागले.

गुरुबचनसिंग (पंजाब) : ११० मीटर्स अडथळ्याची शर्यत ११.४ सेकंदांत जिंकून, पाकिस्तानच्या जी. रझीक याने केलेल्या एशियन

विक्रमावर मात केली.

एन. तीर्के (बिहार) : कनिष्ठ गटातील ४०० मी. शर्यत ५.११ सेकदात जिंकून नवीन विक्रम केला.

हातोडा (Hammer throw) फेकीत पंजाबच्या प्रवीणकुमाराने पूर्वीच्या लखासिंगने (सर्व्हिसेस) प्रस्थापित केलेला विक्रम मोडला. जी. वाकेफिल्ड (दिल्ली) हिने २०० मी. शर्यत २१.१ सेकंदात जिंकून नवा विक्रम केला.

पजाब सघाने ९ सुवर्ण, ५ रौप्य व ८ ब्रांझ पदके मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. त्याखालोखाल महाराष्ट्राने ७ सुवर्ण, ४ रौप्य व ८ ब्रांझ पदके मिळवून दुसरा क्रमाक मिळविला.

: ३ :

## क्लेने लिस्टनचा विजयमुकुट हिरावला

मिआमी-बीच येथे खेळल्या जाणाऱ्या लिस्टन-क्ले या मधील मुष्टि-युद्धाकडे साऱ्या जगाचे लक्ष केंद्रित झाले होते. पॅटरसन या विश्व-विजयी मुष्टिमल्लाचा पाडाव करून ३२ वर्षांच्या सॉनी लिस्टनने मस्तकी विजयी मुकुट धारण केला होता. परंतु अवघ्या १७ महिन्यानी सॉनी लिस्टनचे वैभव नष्ट झाले. क्ले ह्या ३२ वर्षांच्या नीग्रोने लिस्टनला आव्हान दिले. 'मी लिस्टनचा सहज पराभव करीन', अशा गर्जना क्ले करू लागला. सर्वजण त्याच्या या गर्जनाकडे पाहून हसत होते. वायफळ बडबड करणारा क्ले लिस्टनला पराभूत करणे अशक्यच आहे, असे अनेकाचे मत होते. परतु प्रत्यक्षात घडले वेगळेच. क्लेने आपले बोल खरे केले. लिस्टनला त्याने अवघ्या ६ व्या फेरीत पराभूत केले. क्लेच्या तुफानी व झंझावाती माऱ्यापुढे लिस्टनला माघार घ्यावी लागली. ६ व्या फेरीत लिस्टनचा खांदा दुखावला व त्याने पुढे खेळावयाचे नाकारले. हजारो प्रेक्षकांनी क्लेचा जयजयकार केला. रक्ताने न्हाऊन निघालेला क्ले विजयाने उन्मादून गेला होता. लिस्टनचा पाडाव करताच रिंगणामध्ये तो हर्षभराने नाचू लागला. आपला शब्द आपण खरा करून दाखविल्याचा आनद त्याच्या चेहऱ्या-वर विलसत होता. विचारा लिस्टन ! अवघ्या १७ महिन्यात त्याला आपले मुष्टिसम्राटपद सोडावे लागले. क्ले विजयानद साजरा करीत असताना बिचारा रिंगणात एका कोपऱ्यात बसून दु:खाश्रू ढाळीत होता. आणि हजारो प्रेक्षक त्याची हुर्यो करीत होते. या लढतीत क्लेने


भारत सरकारकडून 'रजिस्टर्ड' केलेलें

# पांढरे डाग

अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले व नित्य मिळतात. औष-धाची किंमत ६ रुपये. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यापासून सावध राहावें.

अिसबाचें औषध – किंमत रु. ५

वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन ( माणू )

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला ( महाराष्ट्र )


### स्टेफी डिसुझाचे अभिनंदनीय यश

दरवर्षी मैदानी स्पर्धेत विशेष प्रावीण्य दाख-विणाऱ्या वीरांना भारत सरकारतर्फे 'अर्जुन-पदक' हे मानचिन्ह देण्यात येते. यंदा हे पदक सात जणांना देण्यात आले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुण्याची क्रीडाकन्या स्टेफी डिसुझास हा बहुमान मिळाला आहे. तसेच कुस्तीतील प्रावीण्याबद्दल गणपतराव आंदळकरांनाही हे पदक देण्यात आले आहे. उभय महाराष्ट्र वीरांनी मिळविलेल्या यशाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन !

६००,००० डॉलर्स (२,१४,२८० पौंड) रक्कम मिळविली ! दोन नरराक्षसाची चित्ताथरारक लढत सपली. रक्ताची कारंजी उडाली, प्रेक्षकाची हृदये भीतीने दडपली गेली. या प्रसगी मनात एक विचार निर्माण झाल्याशिवाय रहात नाही, आणि तो म्हणजे एकमेकाचा जीव घेण्याच्या ईर्षेने व हिंसात्मकतेने खेळले जाणारे मुष्टियुद्ध कायद्याने बद होईल का ?

: ४ :

## महोत्सवी सामने आता बंद करा

मुबई येथे राष्ट्रीय सरक्षण-निधीच्या मदतीसाठी एक महोत्सवी सामना आयोजित केला होता. या निमित्ताने जागतिक क्रिकेटपटूचा कुंभमेळा मुबईस भरला होता. हट, बुचर, कन्हाइ, ग्रिफिथ, हॉक, बेली, इव्हान्स, मॉरिस आदि अनेक विश्वविख्यात खेळाडूनी भाग घेतला. परतु मुबईकरानी या सामन्याबद्दल दाखवावा तेवढा उत्साह दाखविला नाही. या सामन्यास प्रेक्षकांची उपस्थिती अगदीच अल्प होती. ही स्थिती प्राप्त होण्याचे कारण काय ? माझ्या मते मुंबई-कराना आता अशा प्रकारच्या सामन्यामध्ये काहीच रस राहिलेला नाही. राष्ट्रीय निधीसाठी पूर्वीही मुबईस सामने झाले होते. नुकताच कसोटी सामन्यासाठी खर्च करावा लागल्याने महोत्सवी सामन्याचे तिकीट घेण्यास मुबईकर क्रिकेट रसिक उत्सुक नव्हता. तसेच कसोटी सामन्यात दृष्टीस पडणारी जिद्द महोत्सवी सामन्यात दिसत नसल्याने त्याबद्दल मुबईकराना आता फारसे आकर्षण राहिलेले नाही. या साम-न्याच्या निमित्ताने एकच गोष्ट निदर्शनास आणून देणे योग्य ठरेल. माझ्या मते, अल्पबचत किंवा राष्ट्रीय निधीसाठी भरविण्यात येणारे क्रिकेट सामने, सांस्कृतिक कार्यक्रम काही काळ बंद करावेत. सर्व-सामान्य प्रेक्षकाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता हा प्रयोग आवरता घ्यावा असेच आता कोणीही म्हणेल.

• • •

## विदेशी चित्रपट

# 'दि होल ट्रुथ अँड नथिंग बट-'

अमेरिकेत चित्रपटसृष्टीला वाहिलेली अनेक नियतकालिके आहेत. त्यांपैकी सुमारे दहा-बारा मासिके आपल्याकडे नेहमी पहावयास मिळतात. मासिके आणि साप्ताहिके केवळ चित्रपटसृष्टीवर लिहून हजारो वाचक मिळवीत असतात. याच कारणाने चित्रपटसृष्टीवर लिहिणारा लेखकवर्गहि हळूहळू वाढू लागला आहे. त्यातील काही बातमीदार तर प्रत्यक्ष कलावंतांच्या बरोबरीने प्रसिद्ध आहेत. त्यांची आर्थिक बाजूही तितकीच मक्कम. एवढेच नव्हे तर या सृष्टीतील बातमीदारांना सर्वत्र मानाची वागणूक मिळते.

हॉलिवुडच्या बातमीदाराचे जग काही लहान नाही. कोणते चित्रपट तयार होत आहेत आणि त्यांत कोण कसली भूमिका करणार आहे एवढी साधी बातमीदारी तेथे नाही. एकादा कलावंत पुढे येऊ लागला, तर त्याचा ते नदीचे मूळ शोधण्याच्या हिरीरीने पाठपुरावा करतात. यांतून गंमती निर्माण होतात. प्रसिद्धी मिळालेला कलावंत आपले पूर्वायुष्य सांगताना कल्पनाविलासावर जगतो. बातमीदार आधी ते छापतात आणि मग पोतडीतून खरीखुरी माहिती छापतात. हे झाले की चर्चा सुरु होते. चर्चा सुरू झाली की बातमीदार आपण कशी बातमी मिळविली हे छापू लागतो. त्याच्यावर पुन्हा जोरदार चर्चा. मग संपादकाची पाळी. तो म्हणतो, मी बातमीदाराकडून आलेली बातमी प्रथम कशी गुप्त ठेवली, त्यावर कशी मेहनत केली, कसे काम केले आणि का बातमी छापली हे महत्त्वाचे. मग संपादक हे सारे छापून काढतो. फोटोग्राफर लागलाच सरसावतो. त्यालाही आपण कुठला फोटो कशा युक्तीने घेतला हे सांगायचेच असते. तेही मग छापले जाते. बातम्यांचा आणि बातमीदारांचा संसार असा चालतो, वाढतो.

केवळ साप्ताहिकांतून आणि मासिकांतून लिहून संतुष्ट राहिलेला लेखक अजून जन्मायचाच. त्याला हवे असते सारे पुस्तकरूपाने दोन पुठ्ठ्यांत बांधून ठेवायला. चित्रपटातील कलावंतांची आत्मवृत्ते, चित्रपटाची सारी कथा, चित्रपट कसा तयार झाला हे आतापावेतो पुस्तकांचे विषय झालेले आहेत. पण आता हॉलिवुडची प्रसिद्ध बातमीदार (खरे म्हणजे एखादी व्यक्ती प्रसिद्धच असताना पुन्हा प्रसिद्ध हे विशेषण लावायला कशाला पाहिजे ? पण सगळे तसे करतात, तेव्हा अपवाद नको ! ) हेड्डा हॉपर हिने एक पुस्तक केले आहे. त्याचे नांव 'दि होल ट्रुथ अँड नथिंग बट...' असे आहे.

या नावात वैशिष्टच आहे. साक्षीदाराला शपथेवर साक्ष देताना कोर्टात शपथ घ्यावी लागते. 'आय स्वेअर दॅट आय वुइल टेल दि होल ट्रुथ अँड नथिंग बट दि ट्रुथ, सो हेल्प मी गॉड.' या शपथेला नेमका आवश्यक तो भाग घेतलाच आणि तितकाच 'नथिंग बट-' च्या पुढचा भाग गाळलाच. बाईसाहेबांना कुणी खोटे पाडू लागले तर पळवाट पाहिजेच.



हेड्डा हॉपर...वय वर्षे ?

तरी पण एक खरे की या बातमीदारीणबाई फार नावारूपाला आलेल्या आहेत. हॉलिवुडशी यांचा अनेक वर्षांचा निकटचा संबंध. बहुतेक प्रसिद्ध कलावंतांशी बैठक. गुपिते हुडकण्यात आणि फोडण्यात दोन्हीतही बाई मोठी तरबेज. तिच्या या पुस्तकाची पाने २८८ आणि सुरवातीची किंमत २५ रुपये. ही किंमत आपल्या कलावंतांपैकी कितींना परवडेल, याचा अंदाज न केलेलाच बरा. मराठी चित्रपटसृष्टीतल्या कलावंतांपैकी किती जण हे पुस्तक विकत (अरे बापरे !) घेऊ शकतील याचा विचार करायचा, तर देवाने आपल्याला हाताची बोटे जास्त का दिली असाच प्रश्न पडेल. असो. हे महागडे पुस्तक डिसेंबर १९६३ पर्यंत दोन लाख खपले. तेव्हा आता साध्या पुठ्ठ्याचे कव्हर लावून साडेचार रुपये किंमतीत नवी आवृत्ती काढली. (त्याचीच आम्ही वाट पहात होतो).

हेड्डा हॉपरला मोठी हॅट घालण्याची सवय आणि हौस आहे. बरीच गुपित संभाळायची असल्याने कदाचित् ही सोय असेल. तिचे तशा हॅटमधील बरेच फोटो पहायला मिळतात.

या बाईच्या पुस्तकात एलिझाबेथ टेलर, मार्लन ब्रँडो, ज्यूडी गार्लंड, एल्व्हीस प्रीस्ले, मर्लिन डिट्रीच, फ्रँक सिनाचा आणि मेरिलिन मन्रो यांच्याविषयी अत्यंत आपुलकीने आणि जवळीक ठेवून माहिती आहे. एलिझाबेथ टेलरला तर बाईने अगदी लहानपणापासून पाहिली आहे. तिच्या उच्छृंखल वृत्तीला आळा घालण्याचाही हेड्डा हॉपरने प्रयत्न केला आहे. रिचर्ड, बर्टन टेलरचा अगदी अलीकडचा प्रियकर, याच्यापर्यंत हेड्डा हॉपरने पाठपुरावा केला आहे.

ज्यूडी गार्लंड या नटीच्या आयुष्यातील चमत्कारिक प्रसंग आणि तिच्या लग्नांची माहिती इतक्या प्रेमळ शब्दात दुसरीकडे वाचायला मिळणे कठीण.

मेरिलिन् मन्रोचे वर्णन आतापावेतो अनेकांनी अनेक प्रकारे केले आहे. अहो, ती अनेकांच्या स्वप्नातदेखील चक्क यायची, तेव्हा वर्णनांना काय तोटा ? सुंदर स्त्रीला लागणारी सर्व विशेषणे तिच्या बाबतीत वापरून वापरून बोथट झाली. तिच्या डोळ्यांवर, तिच्या नाजुक पोटऱ्यांवर, तिच्या वक्षःस्थळावर, तिच्या चालीवर, तिच्या हावभावांवर, एवढेच काय, तिने घातलेली शीळ या विषयावरदेखील लिहून झालेय. तिचे वर्णन या बाईने आपल्या पुस्तकात असे केलेय--" ही आपल्या काळातील खरोखरीची सिड्रेला...तिची प्रसिद्धी आणि तिची दुःखं, लोकरीची लड सुटावी आणि त्याचा न सुटण्यासारखा चमत्कारिक गुंता व्हावा, इतकी मिसळली गेली होती."

या बाईच्या पुस्तकात केवळ कलावंतांच्या व्यक्तिगत जीवनाचीच माहिती नाही. त्यांची

दुःखे चितारली आहेत. त्यांच्या गुप्त इच्छांची मांडणी आहे. त्यांच्या यशाचा गौरव आहे. त्यांची लफडीकुलंगडी आहेत. त्यांची प्रेमे, त्यांची लग्ने, त्यांचे व्यभिचार––सारेसारे पुस्तकात प्रसन्न शैलीत आहे.

पण एवढ्यानेच झाले नाही. हॉलिवुडच्या या जगात किती भयंकर खलबते चालतात, कसे कट होतात, कसे डावपेच चालतात, कशी वादळे उठतात आणि शमतात याचेहि दर्शन आहे. जगाला हॉलिवुडविषयी आकर्षण वाटते हे खरे ! पण दुरूनचे हे डोंगर कसे आहेत, याचे खास वर्णन बाईच्या पुस्तकात आहे. हॉलिवुडच्या भयानक वातावरणाची वर्णने लिहूनदेखील बाई म्हणते––"हे माझं घर आहे, ही माझी माणसं आहेत. हॉलिवूडमधील कुटुंबं ही माझी आहेत. माझी सुखदुःखं इथं आहेत. घर कसंही असलं तरी त्याला चिकटून राहिलं पाहिजे, आपलं मानलं पाहिजे. अनेकदा मी वैतागते, पण मी इथेच राहाणार...ही दुनिया खोटी असली तरी पुन्हा पुन्हा जवळून पाहणार...यातच मी समरस होणार...अंतापर्यंत मी इथेच––" हॉलिवूडचे हे आकर्षण असे जबरदस्त आहे.

हॉलिवूडच्या वातावरणात रमलेली हेड्डा हॉपर हिने स्वतःबद्दल पुस्तकात मजेदार माहिती दिली आहे. पेन्सिल्व्हेनिया राज्यातील आल्टुना या उपनगरात तिचा जन्म झालेला. आईवर तिची फार भक्ती. 'माझी आई म्हणजे या भूतलावरील देवदूत. तिच्यावर माझी फार भक्ती.' आईने एका पुस्तकातील गोष्टीत नाव वाचले एल्डा. झाले. हिचे नाव एल्डा ठेवले. पुढे बाईचे डीवूल्फ हॉपरशी लग्न झाले. त्यांनी तिचे नाव ठेवले हेड्डा. त्याची पूर्वी चार लग्न झालेली, पूर्वीच्या बायकांची नावे एला, इडा, एडना आणि नेला. या बाईचे माहेरचे नाव एल्डा...ही सारी नावे एकमेकांच्या जवळची. नवरोजींना आपल्या नव्या बायकोचे नाव नक्की आठवायचे नाही आणि ते कुठल्याही नावाने हाक मारीत. हे सारेदेखील बाईने मोठ्या खेळकरपणाने सांगितले आहे.

या बाईला लहानपणापासूनच घरी फार कामे पडत. भाऊ होते, पण आळशी. सारी कामे हिला पडू लागल्यावर ही चुलत्याकडे न्यूयॉर्कमध्ये पळाली. तेथे एका ठिकाणी चार मुलींबरोबर कोरस म्हणण्याचे काम पत्करले. तेथून आयुष्याला सुरवात झाली. तिने काही चित्रपटांतही कामे केली आहेत. तिच्या नवऱ्यानेही युद्धावरून परतल्यावर चित्रपटात कामे केली.

पण या बाईचे वय किती ? फोटोत ही म्हातारी तर चक्क दिसते. पन्नाशीत असावी. पुस्तकाच्या प्रस्तावनेत तिने आपण निधन पावल्यावर आपल्या अस्थींचे काय करायचे ठरवलेय ते सांगितलेय...पण तिच्या वयाबद्दल ? बाई आणि वय सांगणार ? छट ! भलतेच ! तिने आतापर्यंत कुणाला सांगितलेले नाही. ती म्हणते, "मरणाचे आता विचार येणं अटळ आहे. माझ्या या वयात ते विचार येणारच..." पण वय किती बाईसाहेब ? उत्तर––I am still not telling.

हॉलिवुडची सृष्टी समजावून घेण्यासाठी हे पुस्तक वाचणे जरूरच आहे.

* * *

## प्रसिद्धीतील धोके

चित्रपट – कलावंतांना मिळणारी प्रसिद्धी इतकी अतोनात असते की त्याबद्दल अनेकांना हेवा वाटावा. पण या प्रसिद्धीच्या झगमगाटाची झळ चित्रपट कलावंतांना काही वेळा फारच उपद्रवकारक ठरते. कलावंतांबद्दल आपल्याकडील नियतकालिकांतून त्या मानाने फारच कमी बातम्या दिल्या जातात. इंग्रजी आणि अमेरिकन नियतकालिकांतून स्त्री–कलावंतांच्या महत्त्वाच्या मोजमापापासून ते थेट त्यांच्या काल रात्रीच्या भटकण्यापर्यंत अद्यावत माहिती एकसारखी प्रसिद्ध होत असते. एलिझाबेथ टेलर कुणाबरोबर जास्त मोकळेपणाने हिंडलीफिरली की लगेच वावड्या सुरू होतात.



कॉनी स्टीव्हन्स्

प्रसिद्धीच्या नफ्यापेक्षा तोटे काही वेळा फारच जाणवतात हे हॉलिवुडमध्ये अलिकडे घडलेल्या काही प्रकारांवरून जाणवते. तरुण मुली कुठे एकट्या सापडल्या तर त्यांच्याबाबत काही गैरप्रकार होण्याचा नेहमीच संभव असतो. परंतु हॉलिवुडमध्ये तर तरुण मुलीला इतर ठिकाणांपेक्षा अधिकच भीती असते. कारण तिच्याबद्दल आधीच वर्तमानपत्रांतून माहिती आलेली असते. व तिच्याबद्दलचे आकर्षण निर्माण झालेले असते.

सांटा मॉनिका येथे राहात असलेल्या एका नटीला असा अनुभव आला की ती स्वतःच्या गॅरेजमध्ये मोटार काढायला गेली असता, आधीच मोटारीत एक जण लपलेला होता. त्याने तिला जिवाची भीती दाखवून मोटार दूर आडवाजूला न्यायला लावली व तेथे तिच्यावर अत्याचार केला ! हा प्रकार पोलीसांना कळवून गुन्हेगाराला पकडता येणे शक्य होते. परंतु तिच्या दृष्टीने हा प्रकार सार्वजनिकदृष्ट्या जाहीर करणे हिताचे असले तरी व्यवसायांतही भवितव्याच्या दृष्टीने ते चांगले नव्हते. कारण त्याचा इतका वेडावाकडा गाजावाजा झाला असता की तिला सारे असह्य झाले असते ! सामान्य बाईला ही भीती वाटली नसती.



डायना बेकर

असा प्रकार काही नवीन वा क्वचित् घडणारा नाही. कॉनी स्टीव्हन्सला अलिकडेच असा अनुभव आला की स्टुडिओतून ती



कटी घरी येत होती. वाटेतच तिच्या असे लक्षात आले की दोनतीन तरुण तिचा पाठलाग करीत आहेत. ती जोरात चालू लागली तशी त्या मुलानीही आपली गती वाढवली. ती थांबली, तसे तेही थांबले. ती हळूहळू चालू लागली, तर तेही हळूहळू मागे येऊ लागले. शेवटी तिने जीव मुठीत घेऊन पळण्यास सुरवात केली व कशीबशी ती निसटली. लाखो रुपये मिळविणाऱ्या प्रसिद्धीच्या झगमगाटात असलेल्या स्त्रीची ही हकिगत.

लिंडा ख्रिश्चन ही एकदा टॅक्सीतून येत असताना, साधारणपणे बऱ्या दिसणाऱ्या ड्रायव्हरच्या लक्षात आले की आपली पॅसेंजर म्हणजे एक नामांकित नटी आहे. त्याने तिला विचारून खात्री करून घेतली आणि तावडतोब रस्ताच बदलला. परंतु प्रसगावधान राखून लिंडा ख्रिश्चन जोराने किंचाळली, तेव्हा ड्रायव्हर तिला सोडून पळून गेला.

जगप्रसिद्ध नटी एलिझाबेथ टेलर हिला पळवून नेण्याचा काही इटालिअन तरुणांनी मध्यतरी कट केला होता. परतु त्याचा आधी सुगावा लागल्यामुळे ती वाचली.

डायना बेकर या नटीलाही मध्यतरी असाच अनुभव आला. मला तुझ्याशी दहा मिनिटे बोललेच पाहिजे असे म्हणून एका तरुणाने तिला स्वतःच्या घरात नेले तेथे घाणेरडी मासिके, उत्तान चित्रे वगैरे पाहताच डायना सावध झाली व तेथून निसटली. तिने देखील हा प्रकार अनेक दिवस कुणाला कळू दिला नाही.

या तरुण कलावतावर जसे हे प्रसग येतात तशीच त्यांना अत्यत घाणेरडी पत्रे नेहमी येत असतात. परंतु बहुतेक नट्या ही पत्रे पहातच नाहीत, कारण त्यांचे चिटणीस त्यांच्यापर्यंत अशी पत्रे जाऊच देत नाहीत.

या साऱ्या प्रकारामुळे हॉलिवुडच्या तरुण नट्या अलिकडे स्वतःजवळ काहीतरी वारकी शस्त्रे-चाकू, रिव्हॉल्वर, छुपी स्प्रिंगची काठी वगैरे बाळगतात.

• • •

## नवे चित्रपट

**हू हॅज बीन स्लीपिंग इन माय बेड ? –** नावावरूनच चित्रपट विनोदी आहे हे लक्षात यावे. हॉस्पिटलचे व टेलिव्हिजनभोवतालचे वातावरण. नायक टेलिव्हिजनवर काम करतो. तो प्रेयसी आणि त्याच्याबरोबर स्वत.ला हरवून बसतो, त्याची गंमतीदार कथा. डीन मार्टीन, एलिझाबेथ मॉंटगोमेरी आणि केरॉल बर्नेट हे कलावंत काम करीत आहेत.

**पाम स्प्रिंग्स् वीकएंड–**एक हलका फुलका चित्रपट. ईस्टरची सुट्टी घालवायला तरुण मडळी जातात हा विषय. कॉनी स्टीव्हन्स, ट्रॉय डोन्हॉं, टॉय हार्डीन, स्टीफन पॉवर्स यासारखे दर्जेदार कलावंत. वॉर्नर ब्रदर्सने या चित्रपटाची जाहिरात फार केली आहे.

**लेडीज हू डू –** नावावरून वाटत नसले तरी हा ब्रिटिश चित्रपट फार विनोदी आहे. ऑफिस साफ करणाऱ्या चार बाया शेअर बाजारात उलथापालथ करायला जातात. त्याभोवती गुफलेले कथानक. रॉबर्ट मोर्ले, पेगी माऊट आणि मिरीअम कार्लीन याच्या भूमिका.

**' दि सोर्ड इन् दि स्टोप ' –** वॉल्ट डिस्नेनिर्मित कार्टून चित्रपट. पदव्या मिळतात त्यावर उपहासगर्भ विनोद. जुन्या काळात एक जादुगार एका लहान मुलाला राजा कसे व्हावे हे शिकवतो ही कथा. नेहमीच्या वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटासारखाच एक.

• • •

के. अमरनाथकृत–

# ' इशारा '

## फुटक्या मण्यांत एक वैजयंती !

१९६० च्या अखेरीस सत्यजित राय हे मुंबईस आले असता त्याच्याभोवती काही हिंदी बॉक्स ऑफिस हिटवाले निर्माते जमा झाले. त्यातील एकाने सत्यजित रायला विचारले, " हिंदीमें फिल्में क्यों नही बनाते?" रायबाबू उत्तरले—" हिंमत नही होती !" रायबाबूंचे हे उत्तर किती सार्थ होते याची प्रचीती हिंदी सिनेसृष्टीत सध्या जो लोफर निर्मात्याचा धागडधिंगा सुरू आहे त्यावरून पुन. पुनः होते. असाच एक नवा चित्रपट म्हणजे ' इशारा !' याचे निर्माते आहेत के. अमरनाथ ! मरू घातलेल्या हिंदी सिनेमासृष्टीचे हे आणखी एक नाथ !

काही वर्षांपूर्वी के. अमरनाथ यांनी 'फिल्मफेअर' मध्ये 'I believe in escapist films' या शीर्षकाचा लेख लिहून करमणुकीसाठी करमणूक असे ध्येय बाळगणाऱ्या पलायनवादी चित्रपटाचे समर्थन केले होते. के. अमरनाथ यानी ' बडा भाई ' नावाचा चित्रपट तदनतर काढला तो मात्र समस्या–कम्–कौटुंबिक चित्रपट. विशेष म्हणजे तो चित्रपट बरा होता नि चाललाही बरा कारण माफक कौटुंबिकपणा फडतुस बोलपटांनाही थोडा तारतो. वस्तुत. कौटुंबिक चित्रपट हा शब्दप्रयोग आमच्या अकलेबाहेरचा आहे. कौटुंबिक म्हणजे काय ? स्टट चित्रपट हा देखील तसा कौटुंबिक असतो. मारामाऱ्या करणाऱ्या नायकाला आई, बाप, प्रेयसी वगैरे असतातच ! सध्या हिंदी चित्रपटात पूर्वीच्या बगदाद-अरबस्तानच्या पार्श्वभूमीऐवजी काश्मीर–सिमल्याची पार्श्वभूमी चालू आहे. डोके नसलेला 'राजा' जाऊन तसाच 'शेठ' आला. 'दरवेशा'ऐवजी तसाच रिकामटेकडा कॉलेजशिक्षित ' तरुण ' आला, राजवाड्यात बदिस्त राहणारी नायिका पोनीटेल नि स्कर्ट घालून थड हवेच्या ठिकाणी वातावरण गरम करू लागली.

आता अशी कल्पना करा, एस. के. प्रभाकर नावाचा हिंदी कथालेखक सत्यजितबाबूंना म्हणाला–" बाबूजी, कहानी सुनो !" कथा सुरू झाली––

**कहानी**

शेठ खेमचंदांची मुलगी माला, दहा वर्षानंतर शिक्षण घेऊन परत येते. त्यांची इतर दोन मुले पैसे उधळण्यात नि स्वच्छंदीपणात गुंग असतात. ही मालाची सावत्र भावंडे. माला ही नायिका असल्याने निर्मळ, सद्‌वृत्तीची आणि गुणांची कोलारी खाण असते. नायिकेवर प्रेम करण्यासाठी एक कामधंदा नसलेला तगडा नायक असतो. सुरेश नावाचा एक वाईट माणूस असतो. हा मालाची सावत्र बहीण शशी हिच्याशी चाळे करतो. लग्न करू इच्छितो. (क्या सिच्युएशन !) पुढे खेमचंद कसल्यातरी खोटया व्यापारात सापडतात नि त्यांना सात वर्षांची शिक्षा होते. रावाचे रंक होतात. माला आणि कंपनी निराधार होते. नायकाला हे कळते. तो स्वतःची भाडयाची जागा सोडून ती त्यांना देतो. शशी-सुरेश भानगड चालू राहते—धाकटा सावत्र भाऊ आता पैशासाठी चोऱ्यामाऱ्या करतो. 'गरिबी बुरी होती है!'

मध्यंतरी नायक एक गॅरेज उघडतो. त्यासाठी पैसे कुठून तरी आणतो ! माला तिथेच नोकरी आणि प्रेम करू लागते. पण त्यांना सुखेनैव प्रेम कोण करू देणार ? गरिबीला कंटाळलेली मालाची भावंडे नी सावत्र आई तिला ती नोकरी सोडून थिएटरमध्ये नर्तकीची नोकरी करून पैसा मिळवायला भाग पाडतात, नव्हे त्यांची इच्छा पुरी व्हावी व सुरेशपासून त्यांचा बचाव व्हावा म्हणून ती तसे करते. नायकाला, 'मजबूर हूँ' असे सांगून त्याचा निरोप घेते. नायक कुठला निरोप द्यायला ?

सुरेश शशीला फसवतो. ती गरोदर असताना त्यांचा एका देवळात झालेला गांधर्वविवाह नाकारतो. घराण्याची इज्जत वाचविण्याकरिता माला आणखी त्याग जाहीर करते. 'आपण कुठंतरी परगावी जाऊ व शशीला मूल झाल्यावर ते माझं म्हणून जाहीर करू.' असे म्हणून सारे बालंट आपल्यावर घेण्याची तयारी दाखवते. आपल्याला मूल होणार आहे असे ती खुद्द नायकालाही सांगते. नायक चाट होतो. पण तेवढ्यांत शशी त्याला सर्व काही खरी हकीगत सांगते. ती ऐकताच नायकाच्या अंगात मारुती संचारतो. सुरेश मालाला पळवून नेतो. मग काय विचारता ? नायक तिथे जातो. मारामारी करतो. मालाही त्याला मारामारीत मदत देते. बरीचशी मारामारी झाल्यावर आतल्या खोलीत सुरेश नायकावर पिस्तुल रोखतो. इकडे तुरुंगातल्या खेमचंदांनाही सगळी हकीगत कळल्यावर ते तिथून पसार होतात व मारामारीच्या स्थळी पिस्तुल घेऊन अवतरतात. तुरुंगाच्या पोशाखात नव्हे तर अगदी आपल्या पूर्वीच्या पँट-टायमध्ये ! ! ते पिस्तुल झाडून सुरेशच्या हातातील पिस्तुल उडवून देतात. सुरेशला एक व्याख्यान देतात. सुरेशला पश्चात्ताप होतो. 'तुम बडी महाकाली हो' म्हणून तो मालाला साष्टांग प्रणिपात घालतो."

कहानी संपल्यावर एस. के. प्रभाकर वर पहातात. रायबाबू खुर्चीवर नसतात.

वस्तुतः या कथानकाचा फार विचार करण्याचे धारिष्टच न करणेच बरे. परंतु के. अमरनाथ यांनी यावर चित्रपट काढला. मजहर सुलतानपुरीना गाणी करावयाला सांगितली. सोहनलालला संगीत घालावयाला सांगितले. आणि मुख्य म्हणजे वैजयंतीमालेला नायिका केली. जॉय मुकर्जी, आगा, प्राण ही कंपनी आहेच. लेखकाने निर्माण केलेला सर्व मूर्खपणा ही नामवंत मंडळी इमानेइतबारे पडद्यावर दाखवतात.

पण चित्रपट तरीही पहावत नाही असे नाही ! तसे नयनसुख बरे आहे. वैजयंतीमालेला अपेक्षेप्रमाणे या नयनसुखात-मुख्य वाटा दिला आहे. नृत्य तर आहेच पण अभिनयही काही वाईट नाही. जॉय मुकर्जी तसा कोवळा आहे. जोडी बरी आहे.

भावंडांच्या भूमिकेत अझरा आणि सुविराज यांनी जेवढे त्यांच्या वाटयाला आले आहे तेवढे केलेय. प्राण हा इतका मुरलेला खलनायक आहे की त्याने वाईट-वाईट म्हणून केलेले कामही बरेच वाटते. त्याचे श्रेय मात्र त्याचे त्यालाच.



'इशाऱ्या'तील नयनसुख

कुतुबमिनार का बांधला ? प्रेमात पडलेल्या मुलींना जीव देण्याच्या धमक्या देता याव्या म्हणून ! असा कल्पकपणा चित्रपटात आहे. के. अमरनाथ यांची चित्रणपद्धती जुनीही नाही नि नवीनही नाही. लोंबकळते मध्येच कुठेतरी. त्यामुळेच की काय, चित्रपट धड 'हिट्ट' होत नाही की धड 'पडत'ही नाही. कारण सिच्युएशन मूर्ख असली तरी कुतुबमिनार पाहावासा वाटतो.

'चोरी हो गयी—' व "मैं अब्दुल्ला—" ही दोन गाणी लोकांच्या ओठावर काही काळ तरी घोळतील.

छायाचित्रण, ध्वनिमुद्रण, कलादिग्दर्शन, संकलन ठाकठीक.

आता प्रश्न उरला "इशारा" कसला ? ते आम्हांला समजले नाही. के. अमरनाथाना विचारले तरी त्यांना सांगता येणार नाही.

—महेश

* * *

## बायकी हट्ट

त्रिंबकरावांना ऑफिसच्या कामासाठी मुंबईला जायचे होते. सौ. रमाबाईंनी त्यांच्याबरोबर जायचा हट्ट धरला. "अग, पण मी दिवसभर कामासाठी बाहेर असेन. तू एकटी करणार तरी काय तिकडे ?" त्रिंबकरावांनी विचारले.

रमाबाई म्हणाल्या, "मी आपली कापड वगैरे खरेदी करण्यात वेळ घालवीन—"

"मग तेवढी खरेदी करण्यासाठी तुला मुंबईला कशाला जायला हवं ? कापडचोपड काय इथेही पुण्यात घेता येईल—" त्रिंबकरावांनी मोडता घातला.

"माझं काही म्हणणं नाही. पैसे देऊन ठेवा जाताना म्हणजे सगळं कापडचोपड इथेच घेईन.—" रमाबाईंनी हट्ट सोडला.

आणि त्रिंबकरावांना मूर्च्छा आली.

*

# गं गा ज ळी

## व्यापारधंद्यांत पिढ्या गेल्या पाहिजेत

आम्हा महाराष्ट्रीय व्यापाऱ्यावद्दल जनतेचा एक आक्षेप आहे व तो पुष्कळ अंशी खरा आहे, असे प्राजळपणे कबूल करण्यास मलाही काही हरकत वाटत नाही. आमचे काय होते की आम्ही वस्तू साधारण योग्य भावाने विकतो व मोठ्या माणसापासून लहानापर्यंत सर्वांना एकच भाव सांगतो. अशा वेळी एखादे गिऱ्हाईक आम्हाला म्हणते की अमक्या दुकानात अमुक भाव आहे, तमक्या दुकानात तमुक भाव आहे. तर ते त्यावेळी आम्हाला न पटून आम्ही त्या गिऱ्हाइकाची फारशी समजूत घालण्याचा प्रयत्न करीत बसत नाही व त्याबद्दल आम्ही ग्राहकाच्या रोषाला थोडे पात्र होतो. परंतु याला जी कारणे आहेत त्यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे इतर व्यापारी पिढीजाद व्यापारी असतात. कित्येक पिढ्या त्याचे घराण्यात व्यापारच चालू असतो. त्यामुळे घरीदारी नेहमी व्यापाऱ्याच्याच भाषा चालतात व त्या अगदी गर्भावस्थेपासून तो ते मूल व्यापारात पदार्पण करीपर्यंत त्या धद्याच्या सर्व खाचाखोचा, आडाखे इत्यादीचे ज्ञान बहुतेक तो मुलगा ज्यावेळी व्यापारात पदार्पण करतो त्यावेळी त्याला झालेले असते. आमच्यात तसा प्रकार नसल्यामुळे साधारणपणे आमची पिढी हीच पहिल्याने व्यापारात पडलेली पिढी आहे, अशी माझी समजूत आहे.

आपल्या मुलाबाळाना नेहमी नोकरपेशाच्या लोकांचे सघटण लाभते व त्यात प्रामुख्याने चर्चिले जाणारे विषय 'साहेब डॅमफूल' म्हणाला,' 'सुवर' म्हणाला, तसेच हेडक्लार्क काहीतरी म्हणाला, मी कामात कशी चुकवाचुकव करतो' असल्या प्रकारच्याच गोष्टी नेहमी कानावर येतात. त्यामुळे नोकरपेशाच्या व्यवसायातील खाचाखोचा जरी सहजपणे कळत असल्या तरी व्यापारधंद्यातील खाचाखोचा लहानपणापासून कळत नाहीत म्हणून आम्ही पिंडाचे व्यापारी नसून व्यापारात पडलो असल्यामुळे हे एकदोन पिढ्या असे होणारच. माझी तरी अशी समजूत आहे की माझ्यापासून तिसरी पिढी, ही व्यापारातले बरेचसे ज्ञान संपादन केलेली निघेल. मला दुसरे असेही वाटते की, ही पिढी थोडी ज्ञानी निघेल व ती आमच्याप्रमाणेच सत्प्रवृत्तीचीही असेल अशी माझी भावना आहे.

('वेंडेकर [ मसालेवाले ] जीवनवृत्तांत'—यातून उद्धृत)

### १५८ वर्षांचा अझरबैझानी गिरिजन—!

अझरबैझानमधील सर्वांत वयोवृद्ध रहिवासी शिराली मुस्लिमोव हे १५८ वर्षांचे झाले आहेत. त्याच्यासबंधी माहिती अझरबैझानी सामाजिक विमा खात्याने भारताच्या मध्यवर्ति समाज—कल्याण मंडळाकडे पाठविली आहे. सदर मंडळाने ११ प्रश्नांची एक यादी मुस्लिमोव यांना पाठविली होती. त्या प्रश्नांना उत्तरे देतांना मुस्लिमोव म्हणतात. की, बालपणापासूनची अंगमेहनत हे आपल्या दीर्घायुष्याचे प्रमुख कारण होय. आजही पेन्शनर शिराली फळबागेत काम करतात. आणि जनावराचे संगोपन करतात. शिराली रोज पहाटे उठतात, दुधाच्या पदार्थांची आणि भाजीपाल्याची न्याहरी आणि चहा घेतात. सूप, मास, ताक, पनीर वगैरे दुधाचे पदार्थ याचे जेवण घेतात. मद्यपान किंवा धूम्रपान ते करीत नाहीत. रोज ७–८ तास झोपतात. आणि बाकीचा वेळ उघड्यावर घालवितात.

एस. एम. सुरतकर

### सूर्यास्त आणि उकडलेले अंडे

मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत पेंटिंग्जचे प्रदर्शन भरले होते. भारतातील विख्यात चित्रकाराची चित्रे तेथे लावून ठेवली होती. स्वत:ला चित्रकलेतील दर्दी समजणाऱ्या मालतीबाई प्रदर्शन बघायला गेल्या. प्रदर्शन पाहताना त्या एका चित्राजवळ थांबल्या. जवळून, लांबून, तीस अंशाचा कोन करून त्यांनी चित्र पाहिले.

"अय्या ! किती वास्तववादी चित्र !" बाईच्या तोडून उद्गार निघाला.

जवळच चित्रकार उभा होता. बाईचे उद्गार ऐकून तो उत्साहाने बाईला म्हणाला, "आवडल तुम्हाला ?"

"माझ्या तोडाला तर पाणी सुटलय् बघा !" बाई म्हणाल्या.

"पाणी सुटलय् ?" चित्रकार गोंधळल्या मुद्रेने म्हणाला, "सूर्यास्ताचं चित्र पाहून पाणी सुटल तुमच्या तोडाला ?"

"अय्या ! सूर्यास्त का !" मालतीबाई किंचाळल्या, "मला वाटलं ते उकडलेलं अडच आहे म्हणून !"

### हजामत, पण कोणी कोणाची ?

एक वयस्क गृहस्थ एका लहान मुलाला घेऊन न्हाव्याच्या दुकानात गेला, प्रथम त्याने आपले केस, दाढी करून घेतली, डोक्याला तेलाचे चागले मालीश करून घेतले. नंतर न्हाव्याने त्या मुलाचे केस कापावयास घेतले. तेव्हा तो गृहस्थ म्हणाला, "तू मुलाचे केस काप; मी सिगरेट घेऊन येतो. असे सागून तो गृहस्थ तेथून निघून गेला.

मुलाचे केस कापून झाल्यावर न्हाव्याने मुलाला विचारले, "अरे तुझा बाप जाऊन बराच वेळ झाला !"

"नाही," मुलगा म्हणाला, 'तो माझा बाप नाही, मी रस्त्याने जात होतो तेव्हा तो गृहस्थ मला भेटला व म्हणाला, "मुला, तुझे केस फारच वाढले आहेत, तू माझ्याबरोबर आलास तर तुझे केस फुकट कापून देईन !'"

अनंत गडकरी

### हातांत बांगड्या भरा !

पुण्याच्या टिळक स्मारक मदिरामध्ये हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांचे एक शिबिर भरले होते. सभेच्या प्रगतीचे वर्णन श्री. अण्णाराव भोपटकर करीत होते, "या अडचणीमुळे हीच गोष्ट करता येत नाही, त्या अडचणीमुळे ती गोष्ट करता येत नाही. यामुळे फार वाईट वाटते,"

इतक्यात श्रोत्यांपैकी उसळणाऱ्या रक्ताचा एक तरुण उभा राहून म्हणाला,—"हे जमत नाही, ते जमत नाही—नाहीपेक्षा हातात बागड्या भरा...बांगड्या—"

या अचानक आहेराने एखादा वक्ता तर शरमून गेला असता, पण श्री. भोपटकर शांतपणे त्या तरुणाकडे पहात म्हणाले, हात पुढे करा, तयार आहेत."

रजनी मनोहर

• • •

६ चांगली पुस्तके

जी सहा वर्षे मिळत नव्हती

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर


आग्रा

लेखक

ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे

मूल्य : प्रत्येकी दोन रुपये केवळ

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २



# शिवचरित्र प्रसार योजना

**आजच्या आणीबाणीच्या प्रसंगी**

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे.


'राजहंस प्रकाशन संस्थे'ने श्री. ब. मो. पुरंदरेकृत 'राजा शिवछत्रपति' या दशखंडात्मक शिवचरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

आमच्या असंख्य हितचिंतकांना
या योजनेत
सहभागी होता येण्यासारखे आहे.

*कृपया पत्राने वा समक्ष चौकशी करावी.*

**राजहंस प्रकाशन संस्था**

४१९ नारायण पेठ, पुणें २.



STUSA KM 18/63

# भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारो वर्षे परंपरागत पद्धतीनें केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हें या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयिस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

किर्लोस्कर




**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,** किर्लोस्करवाडी, जि. सांगली, महाराष्ट्र

# यंत्रसामुग्रीच्या अधिकाधिक कारखानदारांचीं


# विश्वसनीय

**किर्लोस्कर**


## डिझेल एंजिनें




टाइप एव्ही आणि जेव्ही
५ ते १५ हॉर्स पॉवर




टाइप बी २–२० ते २४ हॉर्स पॉवर





टाइप बी ४–४० ते ४८ हॉर्स पॉवर



टाइप आर ए. हवेनें थंड होणारीं
१७ हॉर्स पॉवर ते ६४ हॉर्स पॉवर

देशांत तयार होणाऱ्या, पुढील कितीतरी प्रकारच्या यंत्रसामुग्रीच्या बाबतींत हमखास शक्ति पुरवठ्याचें साधन म्हणून किर्लोस्कर एंजिनें विश्वासास पात्र ठरलीं आहेत – कॉंक्रीट मिक्सर्स, कॉम्प्रेसर्स, टार मिक्सर्स, रोड रोलर्स, पंप, क्रशर्स, जनरेटर्स इत्यादि.

सर्वश्रेष्ठ दर्जा आणि कितीहि खडतर परिस्थितींत कोणत्याहि कटकटींवांचून उत्तम कामगिरी या त्यांच्या गुणांमुळें यंत्रसामुग्रीचे अधिकाधिक कारखानदार ही एंजिनेंच प्रथम पसंत करतात.

## किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.

रजिस्टर्ड ऑफिस : एल्फिन्स्टन रोड, पुणें – ३ (भारत)

TOM & BAY/KOEL/M-9/63


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. संपादक : श्री. ग. माजगावकर